


काश्मीर प्रश्न

ले. श्री. वि. गाडगीळ

लेखक व
प्रकाशक :

श्री. वि. गाडगीळ,

एम. ए. एल. एल. बी.
ॲडव्होकेट

प्रकाशन व प्राप्तीस्थळ

७ ई। २ सदाशिव
साहित्य परिषदेशेजारी
टिळक रस्ता, पुणे २.

लेखनकाळ :

२५ जून ते २५ नोव्हेंबर
१९६८

मुखपृष्ठ छपाई :
परशराम प्रोसेस पुणे.

मुद्रक :

शरद काळुराम हगवणे, बी. ए.
२०३ सदाशिव, पुणे २.
सचीन प्रेस,


प्रास्ताविक—

दर दत्तजयंतीस काहीना काही वाङमयोपहार आपल्याकडे येणाऱ्या मंडळीस देण्याचा प्रघात १९६० पासून चालू केला. त्याप्रमाणें काव्यश्री रोजनिशीची पाने, कवडसे, अर्थो हि कन्या परकीय एव अशी पुस्तके लोकांना दरवर्षी भेट म्हणून देत आलो. यंदा आम्हीं मे मध्ये काश्मीरच्या प्रवासास गेलो होतो. त्याचवेळी काश्मीरविषयी एक पुस्तक लिहिण्याचा विचार मनात आला. त्याप्रमाणे आमचं प्रवासवर्णन आमचे मित्र श्री. पां. र. अंबिके यांच्या महाराष्ट्र मासिकातून प्रसिद्ध झाले. त्याचवेळी काश्मीरच्या प्रश्नाविषयी पुस्तक लिहिण्याच्या दृष्टीने अभ्यासास सुरुवात केली. वकिलीच्या दैनंदिन व्यवसायातून वेळ काढून अभ्यास करावयाचा म्हणजे प्रथम अडचण येते ती त्या विषयावरील पुस्तके जमा करण्याची. पण गीतेत ज्ञानसंपादनाचे मार्ग सांगताना, अभ्यासेन तु कौंतेय, परिप्रश्नेनच सेवया या मार्गापैकी परिप्रश्नाचा आवलंब केला व त्यामुळे अनेकांनी अनेक पुस्तकांची नावे सांगितली व पुष्कळांनी ती पुस्तके आणुनहि दिली. मग काही पुस्तके खरेदीही केली. अशा रीतीने अनेक पुस्तकांच्या साहाय्याने हे पुस्तक तयार केले आहे. ज्या मित्रमंडळीनी पुस्तके आणून देण्याची तत्परता दाखविली त्या सर्वांचा मी फार आभारी आहे. चित्रकार श्री. विष्णु सखाराम कुलकर्णी यांनी चित्राच्या सजावटीचे काम आपुलकीने केल्याबद्दल त्यांचे खास आभार मानणे जरूर आहे. १९६८ च्या दत्तजयंतीस हे पुस्तक भेट देण्यास मिळत आहे, ही फार आनंदाची गोष्ट आहे. काश्मीरचा प्रश्न अद्यापहि अधूनमधून डोके काढतोच आहे. परवाच २२ नोव्हेंबर १९६८ ला आपल्या संसदेत घटनेमधील काश्मीरबाबतचा खास अनुच्छेद ३७० काढून टाकण्याविषयी वादविवाद झाला. पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री हा प्रश्न संयुक्तराष्ट्र संघटनेत उपस्थित करण्याची भाषा याच नोव्हेंबरात अद्याप करीत आहेत. तेव्हा या प्रश्नाची अद्यावत कल्पना येण्याच्या दृष्टीने या पुस्तकाचा उपयोग सर्वांना होवो अशी प्रभूचरणी प्रार्थना करून हे प्रास्ताविक संपवितो.

साहित्य परिषदे शेजारी
टिळक रस्ता, पुणे २.

श्री. वि. गाडगीळ
दत्तजयंती ४–१२–६८

अनुक्रमणिका



काश्मीरचा प्रश्न

काश्मिरचा प्रश्न हा काश्मिरचा प्रश्न नसून काश्मिरने उत्पन्न केलेला हिंदुस्थान व पाकिस्तान यांच्यापुढील प्रश्न आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. १९४७ पर्यंत काश्मीर हा हिंदुस्थानचे स्वित्झर्लंड म्हणून निसर्गरमणीय स्थान व हिंदुस्थानचे नंदनवन एवढीच आपणांस माहिती

होती व काश्मीरचे गुलाब आपल्या वाङ्मयात गुलाबी जागा पटकावून बसले होते. परंतु १९४७ साल उजाडले व आपल्या भारताच्या इतिहासातील सोनेरी व रक्तरंजित पान लिहिले गेले व त्या पानावर काश्मिरची सावली किंवा सांवड जी पडली ती अद्याप पडली आहे.

संस्थानांचे सामीलनामे

१४ ऑगस्ट १९४७ पर्यन्त जम्मू व काश्मीर हे संस्थान ब्रिटिश हिंदुस्थानमधील ५६२ संस्थानांपैकी एक संस्थान होते. त्या संस्थानावर इतर संस्थानांप्रमाणे ब्रिटिश बादशहाचे सार्वभौमत्व होते, परंतु ते संस्थान ब्रिटिश हिंदुस्थानप्रमाणे ब्रिटिशांचे अंकित नव्हते. आपापल्या संस्थानांत आपापल्या मर्जीप्रमाणे राज्यकारभार करण्यास ही संस्थाने मोकळी होती. आंतरराष्ट्रीय राजकारणात मात्र त्यांना स्वतंत्रपणे भाग घेता येत नव्हता.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबाबत जेव्हा १९४६ पासून बोलणी चालू झाली तेव्हा संस्थानाचा प्रश्न साहजिकच प्रामुख्याने पुढे आला. हिंदुस्थानांतून ब्रिटिश निघून गेल्यावर संस्थानांवर इंग्लंडच्या बादशहाचे सार्वभौमत्व राहणार का, हा मोठा प्रश्न होता. त्याचे उत्तर त्या वेळच्या मुत्सद्यांनी हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर संस्थानावरचे ब्रिटिश राजमुकुटाचे सार्वभौमत्त्व नाहीसे होईल व नवीन येणाऱ्या राजवटीबरोबर आपले संबंध ठरविण्यास ती संस्थाने पूर्ण स्वतंत्र राहतील, अशा शब्दांत दिले. त्या वेळचे व्हाईसरॉय लॉर्ड मौंटबॅटननी संस्थानांना दोन मार्ग दाखविले. एक सामीलनाम्याचा व दुसरा जैसे थे कराराचा. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा कायदा १९४७ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटमध्ये पास झाला व त्या कायद्याच्या कलम ७ (१) (ब) मध्ये इंग्लंडच्या बादशहाचे संस्थानांवरील सर्वभौमत्व नष्ट करण्यात आले व त्यांच्याबरोबर ब्रिटिशांनी केलेले सर्व तहनामे व करार रद्द समजण्यात आले. त्याच कलमाच्या परंतुकामध्ये असे म्हणण्यात आले की, वरीलप्रमाणे जरी तहनामे व करार रद्द करण्यांत आले तरी त्या तहनाम्यांचे

जे विषय ते सर्व संस्थानिकांनी अमान्य करी पर्यंत तसेच चालू राहतील किंवा जी दुसरी राजवट येईल त्यांनी व संस्थानिकांनी नवीन करार करीपर्यन्त पूर्वीचेच करार चालू राहतील. या तरतुदीनुसारच वर लिहिल्याप्रमाणे सामीलनामा व जैसे थे करार या दोनपैकी कोणत्यातरी एका मार्गाचा अवलंब करण्यास व्हाइसरॉय लॉर्ड मौंट बॅटननी संस्थानिकांना सांगितले. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या मुत्सद्दीपणाच्या धोरणाने ५६२ संस्थानांतील तीन-चार संस्थाने वगळून सगळयांनी हिंदुस्थानात सामील होण्याचे कबूल केले व त्यांच्याबरोबर तनख्याबाबत करार करून हिंदी संस्थानिकांचा सर्व मुलूख आपल्या भारतात समाविष्ट करण्यात आला.

जोधपूरच्या महाराजांनी आपले संस्थान पाकिस्तानशी जोडण्याचा प्रयत्न केला होता. परंतु लॉर्ड मौंटबॅटनने त्यांना इशारा दिला की, कायद्याप्रमाणे तुम्ही पाकिस्तानमध्ये सामील होण्यास काहीच अडचण नाही. परंतु तुम्ही स्वतः हिंदू आहात व तुमची प्रजाही हिंदू आहे. तेव्हा तुम्ही पाकिस्तानात गेल्यास हिंदू-मुसलमानांचे दंगे होण्याची फार मोठी भीती आहे. " या इशाऱ्यानंतर जोधपूर भारतात सामील झाले. परंतु हैदराबाद व जुनागड ही दोन संस्थाने काश्मीरप्रमाणे सामील झाली नाहीत. परंतु शेवटी सर्व संस्थाने हिंदुस्थानात सामील होऊन आता काश्मीरसह सर्व हिंदुस्थान अखंड झाला आहे. सर्व हिंदुस्थानच्या आंबोळीतील सर्व भोके बुजली गेली आहेत व हिंदुस्थान हे जाळीचे कापड राहिले नाही. परंतु काश्मीरचे भोक जरी बुजले तरी ते चिघळत राहिले आहे व म्हणूनच काश्मिरचा प्रश्न हा हिंदुस्थानला भेडसावणारा एक बागुलबोवा होऊन बसला आहे.

काश्मिरचा प्रश्न चिघळत का राहिला ?

काश्मीरचा प्रश्न चिघळत राहायला मुख्यतः कोण जबाबदार असेल तर काश्मीरचे महाराज हरिसिंग हे होत. महाराजांकडे हिंदुस्थानचे व्हाइस-

रॉय लॉर्ड मौंटबॅटन स्वतः गेले होते. त्याबाबत ते म्हणतात : जुलै १९४७ मध्ये मी स्वतः चार दिवस महाराजांबरोबर घालविले व प्रत्येक दिवशी मी त्यांच्या मनावर एकच गोष्ट बिंबवीत होतो व ती म्हणजे, "तुम्ही आपल्या जनतेच्या मनाचा अंदाज कोणत्याही पद्धतीने घ्या व १३ ऑगस्ट १९४७ च्या आत कोणत्या तरी देशात म्हणजे हिंदुस्थानात अगर पाकिस्तानात सामील व्हा." त्यांनी तसे केले नाही व पुढे काय घडले हे आपण पाहतोच आहोत. महाराज जरी त्या वेळी पाकिस्तानात सामील झाले असते तरी भावी राजवटीच्या प्रतिनिधींनी मला असे आश्वासन दिले होते की, त्याबाबत ते काही हरकत घेणार नव्हते. १४ ऑगस्टला जर काश्मीर भारतात सामील झाले असते तर त्या वेळी पाकिस्तान अजून अस्तित्वात यावयाचे होते व म्हणून त्यांना काही हात घालता आला नसता. परंतु दोहोंपैकी कोणामध्येच सामील न झाल्याने घोटाळा होणार होता व तो शेवटी महाराजांच्या वागणुकीने झालाच."

महाराजांनी पाकिस्तानबरोबर 'जैसे थे'चा करार केला व हिंदुस्थानबरोबर तसाच करार करण्यासाठी मसुदा पाठवून दिला. हिंदुस्थानने मात्र तावडतोब करार केला नाही. कराराचा विचार मंत्रिमंडळात चालू राहिला. जैसे थे कराराने दोन्ही देशांचे आर्थिक व शांतताविषयक संबंध पूर्वीप्रमाणेच राहावयाचे होते. परंतु पाकिस्तानने या दोन्हींबाबत हळूहळू काश्मीरचा कोंडमारा करण्यास सुरवात केली. पोस्ट व तारखाते, रेल्वे व बँका या सर्वांचे व्यवहार बंद पडले व त्यामुळे काश्मीरचा व्यापारधंदा थंडावला. इमारती लाकूड वखारीतून पडून राहिले व फळफळावळ नासून जाऊ लागली. पेट्रोल, तेले, अन्नधान्य, मीठ, साखर व कपडा यांची आवक पाकिस्तानने बंद केली. एवढेच नव्हे तर बिगर मुसलमानांना पाकिस्तानात येण्यास बंदी घातली. तसेच पाकिस्तानातून अशी बिगर मुसलमान मंडळी येणे दुरापास्त झाले. तसा प्रयत्न कोणी केलाच तर त्यांच्यावर गोळ्या तरी घातल्या जायच्या किंवा सुरामारीने भोसकले

तरी जायचे. लष्कराचे हल्लेही सरहद्दीवर वारंवार होत. अशा रीतीने काश्मीर आपल्यात सामील करून घेण्याचे दहशतीचे मार्ग पाकिस्तानने अवलंबिले. त्या सर्वांचा उपयोग होत नाही असे पाहिल्या-बरोबर पाकिस्तानने टोळीवाल्यांना फूस दिली व त्यांना काश्मीरमध्ये घुसवून लूटमार, जाळपोळ व स्त्रियांवर बलात्कार करण्यास संधी दिली. काश्मीरचे मुख्यप्रधान त्या वेळी काक म्हणून होते. ते पाकिस्तानला फितुर झाले व जिकडे तिकडे जिना टोप्या दिसू लागल्या. काश्मीरवरील पाकिस्तानच्या वर्चस्वाच्या या खुणा लौकरच नाहीशा झाल्या. काकची मुख्यप्रधापदावरून उचलबांगडी झाली. पाकिस्तानची हिरवी निशाणे लुप्त होऊ लागली व त्यांच्या जागी शेख अब्दुल्लांची तांबडी निशाणे फडकू लागली. बदललेल्या या घटनांनी पाकिस्तान नरमला नाही. त्याने काश्मीरविषयी गरळ ओकण्याचे काम सतत चालू ठेवले.

काश्मीरच्या नॅशनल कॉन्फरन्सतर्फे गुलाम महंमद सादीकना पाकस्तानबरोबर बोलणी करण्यास पाठविण्यात आले होते. पण त्यांना पाकिस्तानकडून एकच उत्तर मिळाले की, प्रथम शरण या, मग आपल्या म्हणण्याचा विचार करू.

काश्मिरच्या जनतेकडून ज्याप्रमाणे शरणागतीची मागणी करण्यात आली त्याप्रमाणे काश्मिरच्या महाराजांकडूनही अशीच मागणी राजा याकूबखानने केली. राजा याकूबखानने महाराजांना जी तार पाठविली तीत असे म्हटले की, " हजारा येथील जनतेवर जी जुलूमजबरदस्ती चालली आहे ती तेथील जनता यापुढे चालू देणार नाही. तेवढीच तुमची इच्छा असेल तर तुमच्या फौजेबरोबर सामना देण्यास आम्ही तयार आहोत. बऱ्याबोलाने पूंचमधील मुसलमानांवर होणारा जुलूम ताबडतोब नाहीसा करा. "

काश्मीरवर येणाऱ्या संकटाची ही छायाच होती. २९ ऑगस्ट १९४७ रोजी ही धमकी आली व ४ ऑक्टोबर १९४७ ला टॉमीगन्स

घेऊन येणाऱ्या टोळीवाल्यांबरोबर चिराला भाग व झेलम नदीचा काही भाग या भागात संस्थानच्या फौजांच्या चकमकींना सुरुवात झाली. चार ते पाच हजार हिरवा पोषाख घातलेले टोळीवाले १५ ऑक्टोबरच्या सुमारास मीरपूर भागात दिसू लागले. अशा प्रकारे सर्व बाजूंनी टोळीवाले घुसत असताना पाकिस्तानी प्रचाराचा गाडा बरोबर उलटा चालला होता. त्याला उत्तर म्हणून काश्मीर दरबारने एक पत्रक काढले व त्यात असे स्पष्ट म्हटले की, या सर्व लष्करी हालचालींचा हेतू स्पष्ट आहे व तो म्हणजे काश्मिरने पाकिस्तानात सामील होण्यासाठी दडपण आणण्याचा. काश्मिरी फौज म्हणजे शीख, डोग्रा यांचा भरणा असा खोटा प्रचार चालू केला आहे. काश्मिरचे सेनाधिपत्य ब्रिगेडियर खुदाबक्ष या मुसलमान व्यक्तीकडे आहे. पाकिस्तानबरोबर बोलणी करू लागले असता ती फेटाळण्यात आली आहेत. या सर्व प्रकारावरून काश्मीरचे चढाईचें धोरण आहे की पाकिस्तानचे आहे हे जगच ठरवील.—

२४ ऑक्टोबरला सरहद्द प्रांतातून दोन हजार सशस्त्र लोकांनी काश्मीरवर चढाई केली. मुझारफबादवर हल्ला केला, तेथील लोकांची कत्तल केली. चाल करून जाताना जी खेडी मिळाली त्यांची लूटमार व जाळपोळ केली. त्या लोकांना तोंड देणे संस्थानी फौजेला शक्य झाले नाही. तरीसुद्धा त्यांनी उरीजवळ शत्रूला थोपवून धरले व हिंदुस्थान-कडे दारूगोळ्याच्या मदतीची मागणी केली. हिंदुस्थानने ती पुरविण्याचे कबूल केले, पण ती मदत करण्यापूर्वी काही गोष्टी करून घेणे हिंदुस्थान सरकारला युक्त वाटले व त्या म्हणजे काश्मीरच्या सामिली-करणासंबंधीच्या होत्या. दरम्यान २६ ऑक्टोबरला टोळीवाल्यांनी बारामुल्ला या गावात प्रवेश केला. तेथे त्यांनी तीन हजार लोकांची कत्तल केली. त्यातच चार युरोपियन व एक सेवानिवृत्त लष्करी अंमलदार आपल्या गरोदर बायकोबरोबर मारला गेला. मसूद टोळीवाल्यांनी सेंट जोसेफ कॉन्व्हेंटवर हल्ला केला. आणि तेथे असलेल्या चर्च व इस्पतळातील

लोकांना गोळ्या घालून ठार केले. त्यांतच चार ख्रिश्चन संन्यासिनी व कर्नल डाइक्स व त्याची बायको मारली गेली. परिस्थिती इतकी भीषण झाली होती की, २४ तासांनी जेव्हा हिंदी सैन्य त्या गावात शिरले तेव्हा १४ हजार लोकवस्तीपैकी फक्त एक हजार लोकच त्या गावात शिल्लक राहिले होते. ३५० हिंदू लोकांना एका घरात कोंडून जाळून टाकण्यात आले होते. हिंदी फौजा येण्यास दोन दिवस लागले याचे कारण वर लिहिल्याप्रमाणे काश्मीरचे सामिलीकरण होणे प्रथम आवश्य होते व ते तसे झाल्यावर हिंदी फौजा काश्मीरमध्ये आल्या व त्यांनी टोळीवाल्यांच्या हल्ल्यांपासून श्रीनगर बचावले. काश्मीरचे प्रकरण इतके चिघळण्यास काश्मीरचे महाराज स्वतःच कारणीभूत झाले. त्यांनी जर इतर संस्थानिकांप्रमाणे १४ ऑगस्टच्या आत पाकिस्तान अगर हिंदुस्थानात सामील व्हावयाचे ठरविले असत तर काश्मिरी जनतेची जी ससे होलपट झाली ती झाली नसती.

काश्मीरचा सामीलनामा

परिस्थिती जेव्हा इतक्या थराला गेली तेव्हा काश्मीरच्या महाराजांनी हिंदुस्थान सरकारकडे मदतीचा धावा केला. राजा छत्रसालनी मगरीच्या तोंडात पाय सापडलेल्या गजेंद्राप्रमाणे बाजीरावाचा ज्याप्रमाणे धावा केला त्याचप्रमाणे काश्मीरच्या महाराजांनी धावा केला व गजेंद्रमोक्षाप्रमाणे काश्मीरची सुटका पाकिस्तानी मगरीच्या जबड्यातून हिंदुस्थानने केली. राजा छत्रसालने आपल्या पत्रात वरील आशयाचा पुढील दोहरा लिहिला. —

जो गति ग्राह गजेंद्रकी
सो गत भई है आज ।
बाजीजात बुंदेलकी
राखो बाझी लाज ॥

काश्मीरच्या महाराजांनी २४ ऑक्टोबरच्या संध्याकाळी एक खलिता हिंदुस्थान सरकारकडे धाडला व तातडीच्या मदतीची याचना केली. लगेच दुसऱ्या दिवशी संरक्षण समितीची सभा लॉर्ड मौंटबॅटन यांच्या अध्यक्षतेखाली भरली व त्यात श्री. व्ही. पी. मेनन यांनी काश्मीरमध्ये जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती पहावी व आपले म्हणणे सादर करावे असे ठरले. त्याच वेळी महाराजांनी आपले मुख्य प्रधान श्री. महाजन यांनाही दिल्लीला पाठविण्याचे ठरविले होते. गोष्टी इतक्या निकरावर आल्या होत्या की, महाराजांनी महाजनांना सांगितले होते की, विमान मिळाले तर दिल्लीला जा. नाहीतर पेशावरला जाऊन शरणागतीचे लोटांगण घाला. महाराजांचे म्हणणे सांगण्याकरता दोघेहि आले.

श्री. मेनन यांचे म्हणणे ऐकून लॉर्ड मौंटबॅटन म्हणाले की, "महाराज, जोपर्यंत सामीलनामा लिहून देत नाहीत तोंपर्यंत आपण आपले सैन्य काश्मीरमध्ये नेणे योग्य होणार नाही. कारण काश्मीर अद्याप स्वतंत्र आहे. काश्मीर भारतात सामील झाल्यावर तो हिंदुस्थानचा एक अविभाज्य भाग होईल व मग भारताच्या रक्षणाकरता सैन्य पाठविणे योग्य होईल. तसेच काश्मीरची मुख्य प्रजा मुसलमान आहे ही गोष्ट लक्षात घेऊन टोळीवाल्याना एकदा हुसकून लावल्यावर काश्मिरी जनतेचे मत अजमावावे व मगच सामिलनामा कायम करावा." श्री. मेनन यांनी आपल्या पुस्तकात लॉर्ड मौंटबॅटन यांचे वरील प्रमाणे मत देऊन ते नेहरू व इतर मंत्र्यांना पसंत पडल्याचे लिहिले आहे.

याच प्रसंगाची हकीकत काश्मीरचे मुख्यप्रधान श्री. महाजन यांनी अशी सांगितली आहे की, काश्मीरची परिस्थिती समजावून सांगण्याकरता मी श्री. नेहरू यांच्याकडे गेलो होतो. काश्मीरची बिकट अवस्था त्यांना कळावी म्हणून मी असे बोलून गेलो की, आपण जर तावडतोब फौजा पाठविल्या नाहीत तर मला पाकिस्तानकडे जाण्यास महाराजांनी सांगितले आहे. माझे हे उद्गार ऐकून पं. नेहरू चिडून म्हणाले,

"महाजन, चालते व्हा." मीही त्यांच्या सांगण्याप्रमाणे बाहेर निघालो. इतक्यात वल्लभभाई माझ्या कानाशी लागले व म्हणाले, "महाजन, तुम्ही काही पाकिस्तानला चालला नाहीत." इतक्यात पंडितजींच्या हातात एक चिठ्ठी आली व ते एकदम मोठ्याने म्हणाले, "शेख साहेबही असेच म्हणताहेत तर!" माझी तर अशी समजूत आहे की, आतल्या बाजूस बसून शेख अब्दुल्ला ही सर्व बोलणी ऐकत होते. त्यांच्या चिठ्ठीने लष्करी कुमक तात्बडतोब मिळविणे सोपे झाले व त्यांनी मला संरक्षणमंत्री सरदार बलदेवसिंग यांच्या घरी थांबण्यास सांगितले व आम्ही संरक्षण समितीत विचार करून निर्णय देतो असे ते म्हणाले."

संरक्षण समितीने सामीलनामा करून घेऊन फौजा पाठविण्याचा निर्णय घेतला व त्याप्रमाणे काश्मीरच्या महाराजांनी एक पत्र व सामीलनामा हिंदुस्थान सरकारकडे पाठवून दिला. हे दोन्ही कागद फार महत्त्वाचे असल्यामुळे ते अक्षरशः आपल्यापुढे असणे जरूर आहे.

काश्मीरच्या महाराजांचे पत्र

२६ ऑक्टोबर १९४७

प्रिय लॉर्ड मौंटबॅटन,

आमच्या संस्थानात गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे व आपली तातडतोब मदत मिळावी अशी आपल्या सरकारास विनंती आहे.

जम्मू व काश्मीर हे संस्थान, आपल्याला माहीतच आहे की, हिंदुस्थानमध्ये अगर पाकिस्तानमध्ये सामील झालेले नाही. भौगोलिकदृष्ट्या माझे संस्थान दोन्ही देशांना लागून आहे. दोन्ही देशांच्या आर्थिक व सांस्कृतिक साखळीचा दुवा माझ्या संस्थानामुळे जोडला जातो. त्याचप्रमाणे सोव्हिएट रशिया व चीन यांच्या राज्यांच्या सरहद्दींशी काश्मीरची

सरहद्द भिडते आहे. परराष्ट्राशी जडल्या जाणाऱ्या संबंधांच्या दृष्टीने दोन्ही देशांना ही गोष्ट कानावेगळी करून चालणार नाही.

दोन्ही देशांच्या हिताच्या दृष्टीने माझे संस्थान स्वतंत्र राहणे जास्त हिताचे आहे की, एका कोणत्यातरी देशात सामील होणे चांगले आहे याचा विचार करण्यास मला थोडा वेळ पाहिजे होता. मी जरी स्वतंत्र राहायचे ठरविले असते तरी दोन्ही देशांशी मैत्रीचे व जिव्हाळ्याचेच संबंध ठेवण्याचा माझा विचार होता.

माझ्या या विचारानुसार मी पाकिस्तान व हिंदुस्थानबरोबर 'जैसे थे' च्या कराराची बोलणी चालू केली. पाकिस्तानने तो करार ताबडतोब मान्य केला. हिंदुस्थान सरकारला आमच्या संस्थानच्या प्रतिनिधीबरोबर आणखी बोलणी करायची होती. खाली वर्णन केलेल्या परिस्थितीमुळे मी ती बोलणी करू शकलो नाही. तसेच म्हटले तर पाकिस्तान सरकारमार्फत आमच्या संस्थानांतील पोस्ट व तारखात्याचे काम चालूही झाले आहे.

पाकिस्तानशी जरी आमचा 'जैसे थे'चा करार झाला असला तरी पाकिस्तानने हळूहळू अन्नधान्य, मीठ व पेट्रोल यांबाबत आमचा कोंडमारा चालू केला आहे.

आफ्रिडी लोक, साध्या पोषाखातले सैनिक व गुंड या सर्वांना आधुनिक शस्त्रास्त्रे पुरवून त्यांना प्रथम पुंछच्या भागात घुसविले, नंतर सियालकोटकडे व शेवटी रामकोटेच्या हजारा जिल्ह्यात हे लोक घुसले. या सर्वांचा व्हायचा तोच परिणाम झाला. संस्थानाकडे जे तुटपुंजे लष्कर होते ते सर्वच विभागून गेले व या गुंड लोकांनी जी वित्त व प्राण यांची बेसुमार हानी केली ती वाचविता येणे शक्य झाले नाही. श्रीनगरला ज्या विद्युतकेंद्रातून वीजपुरवठा होतो ते महुरा येथील विद्युत्‌गृह जाळले गेले, ज्या अनेक स्त्रियांचे अपहरण होऊन त्यांचेवर बलात्कार झाले त्यामुळे माझ्या हृदयाचे पाणी पाणी होते आहे. सर्व संस्थानचा कब्जा घेण्याच्या

उद्दिष्टाने पुढे पुढे सरकणारे हे पुंड लोक लौकरच संस्थानची उन्हाळ्याची राजधानी असलेले श्रीनगर शहर सर करतील अशी भीती वाटू लागली आहे.

मन्सेरा-मुझाफराबादच्या रस्त्याने पुढे पुढे शिरणारे हे पुंड लोक सर्व प्रकारच्या आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज आहेत व त्यांनी हे जे अतिक्रमण चालविले आहे ते पाकिस्तान सरकार व सरहद्द प्रांत यांच्या मदतीशिवाय चालविले असणे शक्य वाटत नाही. त्या दोघांपैकी कोणीही या पुंडांना रोखण्याचा प्रयत्न करीत नाहीत उलट पाकिस्तान रेडिओ व वृत्तपत्रे या सर्व बंडखोरांच्या हकीकती व्यवस्थित देत आहेत. पाकिस्तानने तर असेही सांगावयास सुरुवात केली आहे. की काश्मीरमध्ये स्वतंत्र सरकार स्थापनही झाले आहे. माझ्या राज्यातील मुस्लीम अगर मुस्लीमेतर लोकांनी कोणीही या मोहिमेत भाग घेतलेला नाही.

माझ्या संस्थानातील हल्लीच्या प्राप्त परिस्थितीत आणीबाणीची वेळ उत्पन्न झाली आहे. अशा वेळीं भारत सरकारला मदतीची हाक देण्यापलीकडे गत्यंतर उरलेले नाही. साहजिकच माझे संस्थान हिंदुस्थानमध्ये सामील झाल्याशिवाय ते मला मदत करू शकणार नाहीत. सोबत मी सामीलनामा जोडला आहे. दुसरा एकच पर्याय उरतो तो म्हणजे या पुंडलोकांना लूटमार करण्यास सर्रास परवानगी देणे. अर्थात् अशी लूटमार करून देणे कोणत्याही सुधारलेल्या सरकारला सहन होणार नाही व मी माझ्या जिवात जीव आहे तोपर्यन्त असे कधीही घडू देणार नाही.

मी आपल्या सरकारच्या हेही लक्षात आणून देऊ इच्छितो की मी आणीबाणीचे सरकार स्थापन करीत असून शेख अबदुल्लांनी आमच्या मुख्य प्रधानांच्या जोडीने या सर्व गोष्टींशी जबाबदारीने मुकाबला करावा असे म्हणत आहे.

माझ्या संस्थानचे संरक्षण व्हायचे असेल तर तातडतोबीने मदत रवाना होणे जरूर आहे. श्री. मेनन यांना सर्व गोष्टी माहीत आहेत व आणखी जादा खुलाशाची गरज लागल्यास तो खुलासा ते करतील.

घाईत व प्रेमळ आदराने

हरिसिंग

सामीलनामा

...चा सामीलनामा,

ज्या अर्थी १९३५ चा हिंदुस्थानचा राज्यकारभाराचा कायदा नव्याने निर्माण होणाऱ्या स्वतंत्र हिंदुस्थानच्या राज्याला लागू होणार आहे व असे हिंदुस्थानचे राज्य हिंदी स्वातंत्र्याचा कायदा १९४७ ने निर्माण होणार आहे.

आणि ज्या अर्थी हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलनी दुरुस्त केलेल्या हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या कायद्यातील तरतुदीनुसार कोणत्याही संस्थानाने सामीलनाम्यावर सही करून हिंदुस्थानमध्ये सामील व्हावे असे ठरविले आहे.

त्या अर्थी मी...संस्थानचा राजा माझ्या संस्थानावर माझा सार्वभौमत्वाचा अधिकार आहे तो गाजवून मी सामीलनाम्यावर सही करून देत आहे व

(१) हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल, हिंदुस्थानचे कायदेमंडळ, फेडरल कोर्ट व इतर हिंदुस्थान सरकारचे अधिकारी हे सर्व १९३५ च्या कायद्यानुसार जे अधिकार वापरण्यास त्यास देण्यात आले आहेत ते सर्व अधिकार या संस्थानात वापरू शकतील अशी घोषणा मी या सामील-

नाम्याने करीत आहे. १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी त्यांना जे अधिकार प्राप्त झाले तेच हिंदुस्थानच्या कारणापुरते बजावू शकतील.

(२) सामीलनाम्यामुळे १९३५ च्या कायद्याने संस्थानिक म्हणून संस्थानात ज्या गोष्टी करावयास पाहिजेत त्यांची जबाबदारी मी स्वीकारीत आहे.

(३) या सामीलनाम्याच्या परिशिष्टात जे विषय हिंदुस्थानने कायदे करण्यास पात्र आहेत त्याबाबत त्यांनी कायदे करण्याचे मी मान्य करतो.

(४) हिंदुस्थान सरकार व माझे सरकार यां मध्ये जर एखादा असा करार झाला की हिंदुस्थान कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी जर मला काही गोष्टी केल्या पाहिजेत तर त्या तशा गोष्टी करण्याचे मी आश्वासन देतो व त्या गोष्टी या सामीलनाम्याचाच एक भाग असू शकतील.

(५) १९३५ च्या राज्यकारभाराच्या कायद्यात जरी काही दुरुस्त्या झाल्या अगर हिंदी स्वातंत्र्याच्या कायद्यात जरी काही फेरबदलल झाले त्यायोगे आपोआप सामीलनाम्याच्या अटीत त्या अनुरोधाने बदल होणार नाही. त्यासाठी माझ्या निराळ्या पुरवणी सामीलनाम्याची गरज लागणार आहे.

(६) माझ्या संस्थानातील जमिनी सक्तीने घेण्याबाबत कोणताही कायदा हिंदुस्तान सरकारास करता येणार नाही. मात्र अशी जमीन जर त्या सरकारास पाहिजे असेल तर त्यांच्या खर्चाने मी संपादन करून देईन अगर माझी सरकारी जमीन असेल तर त्याबाबत करार करून त्यांना देईन. जर त्याबाबत आमच्या अटी मानल्या गेल्या नाहीत तर हिंदुस्थानचे सरन्यायाधीश नेमतील त्या लवादाच्या निर्णयानुसार अशा जमिनी मिळवून दिल्या जातील.

(७) या सामीलनाम्याने हिंदुस्थानची जी भावी घटना होईल ती मी मान्य केली असा अर्थ काढावयाचा नाही तसेच त्या नवीन घटने-

प्रमाणे वागावयाचे की नाही, हे ठरविण्याचा माझा अधिकार मी आताच कुंठित करून ठेवीत नाही.

(८) माझी माझ्या संस्थानावरील सार्वभौम सत्ता मी सामीलनाम्याने घालवीत नाही व सामीलनाम्यात जे प्रत्यक्ष लिहिले असेल ते खेरीज करून संस्थानावरील माझा कायदे करण्याचा हक्क व असलेले कायदे पाळण्याचे बंधन मी नाहीसे करीत नाही.

(९) संस्थानतर्फे मी हा सामीलनामा करून देत आहे व ज्या ज्या ठिकाणी 'मी व माझे' असा शब्दप्रयोग केलेला आहे तो सर्व माझ्या वाली वारसांनाही लागू आहे.

१९४७ मध्ये...सही करून दिला.

मी हा सामीलनामा मान्य करीत आहे...तारीख
१९४७. हिंदुस्थानचे गव्हर्नरजनरल

काश्मीरच्या महाराजांनी पत्र व त्यासोबत सामीलनामा गव्हर्नर जनरलना सादर केला व तो गव्हर्नर जनरलनी स्वीकार केला. परंतु त्यासोबत एक पत्र दिले व त्या पत्रावरूनच आजपर्यंत सार्वमतासारखे प्रश्न घोंगावत राहिले, ते पत्र असे.

हिंदुस्थान सरकारचे उत्तर

२७ ऑक्टोर १९४७

माझे प्रिय महाराजासाहेब,

श्री. व्ही. पी. मेनन यांनी तुम्ही त्यांचेजवळ दिलेले तुमचे तारीख २६-१०-४७ चे पत्र पोचले. तुम्ही पत्रात जी विशिष्ट परिस्थिती निवेदन केली आहे त्यामुळे माझ्या सरकारने तुमचे संस्थान आमच्या अधिराज्यात सामील करून घेण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या ज्या ठिकाणी सामीलीकरणाचा विषय हा विवाद्य बनलेला आहे

त्या त्या ठिकाणी आमच्या सरकारने असे धोरण ठरविले आहे की असे सामिलीकरण त्या संस्थानच्या लोकांच्या इच्छा जाणून घेऊन त्या इच्छेनुसार करावे. त्या आमच्या धोरणास धरून ज्या वेळी तुमच्या संस्थानातून हे पुंड लोक बाहेर हुसकले जातील व संस्थानात कायदा व व्यवस्था प्रस्थापित होतील त्या वेळी संस्थानच्या सामिलीकरणाचा प्रश्न लोकांना विचारून सोडवावा लागेल. तुमच्या तातडीच्या मागणीप्रमाणे आजच हिंदी लष्कराच्या तुकड्या तुमच्या सैन्यास मदत करण्याकरता व तुमच्या संस्थानातील मालमत्तेचे व जीविताचे रक्षण करण्याकरता धाडल्या आहे.

तुम्ही शेख अब्दुल्लांना सरकारमध्ये स्थान देऊन त्यांची मदत तुमच्या मुख्य प्रधानाना देण्याचे ठरविल्याचे वाचून आमच्या सरकारास संतोष झाला आहे.

माँटबॅटन ऑफ बर्मा

सामीलनाम्यानंतर : हिंदची कुमक

सामीलनाम्याचे काम पूर्ण झाल्याबरोबर हिंदी सैन्याची पहिली तुकडी विमानातून कर्नल राय यांच्या आधिपत्याखाली श्रीनगरला रवाना झाली. श्रीनगरला पोहोचल्याबरोबर त्यांनी खासगी मोटारी हाताशी धरल्या व त्यात आपल्या सैनिकांना बसवून त्यांनी बारामुल्लाच्या रोखाने कूच केले. शत्रूच्या तुकड्या श्रीनगरच्या अगदी जवळ येऊन ठेपल्या होत्या. व त्यांच्याशी संरक्षणापुरताच सामना देऊन भागणार नव्हते. थोडी चढाईही करावयास पाहिजे होती. शहरापासून दोन मैल अंतरावरच शत्रुपक्षाचा फार मोठा जमाव आपल्या सैनिकांवर मारा करू लागला. त्या माऱ्यापुढे आपला फारसा निभाव लागणार नाही असे पाहिल्यावर कर्नल रायनी माघार घेण्यास सुरवात केली व ते बारामुल्ला व श्रीनगर यामधील गावाकडे आले. या माघारीच्या प्रयत्नात आपल्या

शेवटच्या तुकडीवर बंदुकींच्या गोळ्यांचा फार मोठा भडिमार झाला व त्यात अनेक लोक प्राणास मुकले. त्यात कर्नल राय गतप्राण झाले.

यापुढील सर्व हालचाली प्रामुख्याने आपल्या विमानदलाने केल्या. त्याने ठिकठिकाणी गोळीबार करून टोळीवाल्यांना सळो की पळो करून सोडले. सर्व काश्मीरमध्ये टोळीवाल्यांचा सुळसुळाट झाला होता. आपली भूमीवरील सेना मोठ्या संख्येने अजून येऊन पोचली नव्हती, आपल्या एका पलटणीची दैना झाली होती. बगडम येथे आपले एक अधिकारीही मारले गेले होते. विमानहल्ल्यांमुळे टोळीवाल्यांचे नैतिक धैर्य डळमळू लागले व आपल्या फौजांना टोळीवाल्यांचा निःपात करण्यास फार मोठे साहाय्य झाले. दिवसाढवळ्या ज्या हालचाली टोळीवाले पूर्वी करीत असत त्या बंद झाल्या व आपले बारामुल्लाच्या रोखाने चाललेले सैन्य या विमानदलाच्या छत्राखाली चालत राहिले. ८ नोव्हेंबरला आपल्या सैन्याने बारामुल्ला घेतले. १२ नोव्हेंबरला उरी घेतले. उरी गाव जरी आपण घेतले तरी त्या भागातील टोळीवाल्यांचे हल्ले काही थांबले नाहीत.

२२ नोव्हेंबरला त्या भागातील ५५०० फूट उंचीवर असलेल्या आपल्या सैन्यावर या टोळीवाल्यांनी हल्ला केला. इतक्या उंचीवर धान्यसामुग्रीचा साठा काहीच नव्हता. प्रत्येक वस्तू ५५०० फूट खाली उतरून जाऊन आणावयास पाहिजे होती. टेकडीवर झोंबणारे वारे एकसारखे वाहत होते. रात्री पाण्याचे बर्फ होत असे, इतकी कडक थंडी होती. चहा करावयाचा झाला तर बर्फाचे पाणी करून मग त्या पाण्याचा चहा करावा लागे.

टोळीवाल्यांनी ही टेकडी सर करण्याकरिता टेकडीच्या तिन्ही बाजूंनी ५०० माणसे वर चढविली. समोरच्या टेकडीवर तोफांचे मोर्चे लावले व तेथून गोळीबारास सुरुवात केली. आपल्या लोकांनी त्या गोळीबाराला

उत्तर दिले नाही. आपल्याकडून गोळीबार झाला असता तर आपले लष्करी ठाणे त्यांच्या ताबडतोब लक्षात आले असते व त्यांनी त्या रोखाने गोळीबारास सुरवात केली असती. आपल्याकडून शत्रूचे लोक टेकडीच्या जवळ जवळ सरकू लागले. ते आपल्या तोफांच्या टप्प्यात आल्याबरोबर आपल्या लोकांनी गोळीबारास सुरवात केली. व एक तासाच्या अवधीत त्यांचे १०० लोक गारद झाले. परंतु त्यांच्या तोफा धडधडतच होत्या, त्या बंद केल्याशिवाय जयाची आशा नव्हती. आपल्या सेनापतींनी बायोनेटचा हल्ला त्या तोफखान्यावर करण्याचा हुकूम दिला व नाईक चेतासिंगने आपल्या जिवाची तमा न करता त्या तोफांवर हल्ला केला व ती तोफ चालविणाऱ्या टोळीवाल्याला ठार मारून तोफ हस्तगत केली. तो ती तोफ घेऊन आपल्या तळाकडे येऊ लागला असता चारी बाजूंनी त्याच्यावर शत्रूने गोळ्यांचा वर्षाव केला. नाईक चेतसिंग ठार झाला. तोफ मिळाली पण चेतासिंग गेला ! गड आला पण सिंह गेला !

आपला विजय झाला. उरी भागावर आपला कब्जा सुरू झाला व श्रीनगरवरील संकट टळले.

ब्रिगेडियर उस्मानचा पराक्रम

श्रीनगरचा याप्रमाणे बचाव केल्यावर जम्मू प्रांतात शिरलेल्या टोळीवाल्यांना हुसकावून लावणे ही दुसरी महत्त्वाची कामगिरी आपल्या सैन्याला बजावावयाची होती. मीरपूर, कोटली, पुंच, झांझर, नौशेरा व भिंबार या शहरांतून टोळीवाल्यांनी कब्जा केला होता. त्यांपैकी नौशेरा, झांझर व कोटली यांना मदत पोचविण्यात आली व शत्रूच्या तावडीतून त्यांची सुटका करता आली. परंतु मीरपूरला मदत देता आली नाही.

हिवाळा जोरात सुरू झाल्यामुळे हिंदी सैन्याची आगेकूच फार सावकाश चालली होती. ठिकठिकाणी बर्फाचे थरच्या थर पडलेले

होते. तशातच डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात पाच हजार टोळी-वाल्यांनी झांजरवर हल्ला केला. त्या ठिकाणी आपले सारे २०० सैनिक होते. त्यांचा लगेच पाडाव झाला. या जयामुळे शेफारून टोळीवाल्यांनी नौशेरवर हल्ला केला पण तो परतविण्यात आला व हिंदी सैन्य एक एक ठाणे काबीज करीत करीत पुढे चालत राहिले. नौशेरावर हल्ला करणाऱ्यांची जातवारी पाहिली तर ती अशी आढळून येते : दरीकडचे पठाण व मुसलमान ७० टक्के, पाकिस्तानच्या लष्करातून पळून आलेले २० टक्के, पूंचमधून ५ टक्के व सुंदासपासून ५ टक्के.

काश्मीर काबीज करावयाचे म्हणजे हे एक धर्मयुद्ध आहे, जेहाद आहे अशी भावना त्या वेळी प्रज्वलित करून देण्यात आली होती. त्यामुळे या धर्मयुद्धात भाग घेण्याकरता ८८००० पठाण युद्धसज्ज झाले होते. त्यांपैकी ७५००० सैनिक पाकिस्तानात ठिकठिकाणी तळ ठोकून बसले होते व १३००० पठाण काश्मीरमध्ये आले होते.

नौशेराजवळील कोट या गावी शत्रूच्या सैन्याचा मोठा तळ खंदक खणून दबा धरून बसला होता. त्यावर ब्रिगेडियर उस्मान यांनी अचानक हल्ला करून त्यांची दाणादाण उडविली. या हल्ल्यामध्ये सहा युद्धकैदी व दारूगोळा, स्टेनगन्स, मशीनगन्स व रायफल्स अशी युद्धसामुग्री मिळाली. दोन आठवड्यांपूर्वी याच शत्रुसैन्याने ब्रिगेडियर उस्मान यांना सारखे जागते ठेवले होते. वैमानिकांनी अगदी खालपर्यंत विमाने आणून या सैन्याला एकसारखा पाठिंबा दिला होता. आपल्या सैन्याच्या माऱ्याने जेव्हा टोळीवाले पळू लागले तेव्हा आपल्या वैमानिकांनी नाल्याजवळ त्यांना गाठून त्यांच्यावर गोळीबार केला व त्यांची अतोनात हानी केली. ही सर्व हकीकत १ फेब्रुवारी १९४८ सालची आहे.

टोळीवालेही या माघारीमुळे स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी हजारांच्या संख्येने ६ फेब्रुवारी १९४८ रोजी आपल्या मशिन्सगन्सच्या पथकावर हल्ला केला पण तेथेही त्यांचे काही चालले नाही व त्यांना पुन्हा

माघार घ्यावी लागली. या सर्व हल्ल्यात ३००० टोळीवाले कामस. आले. या मेलेल्यांमध्ये मेजरच्या हुद्याचे दोन परकीय अधिका'- आढळून आले. ही जी लढाई झाली ती चांगलीच हातर घाईची झाली. समशेरी उपसून एकमेकांनी एकमेकांवर वार केली विमानदलाचे प्रमुख विंग कमांडर श्री. इंजिनिअर हे स्वत: विमानातून टेहेळणी व हल्ला करीत होते. नौशेरच्या नैर्ऋत्य दिशेला टोळीवाल्यांचा एक काफिला चालला होता. त्याच्यावर हल्ला करून ले कर्नल गिरिधारीसिंग यांनी तो लुटला. पाकिस्तानी विमानांनी टोळी- वाल्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला पण तो आपल्या हद्दीत राहूनच केला. अशा प्रकारे नौशेरची लढाई संपली व हल्लेखोरांना जम्मू प्रदेशातून हाकलून लावण्यात आले. ब्रिगेडियर उस्मान यांचे सर्वत्र अभिनंदन झाले. ब्रिगेडियर उस्मान यांचा पराक्रम आझाद काश्मीर सरकारला इतका झोंबला की, त्यांनी काश्मीरमध्ये त्यांना पकडून देणारास ५३ हजार रुपयांचे बक्षीस लावले. ब्रिगेडियर उस्मान शेवटी या टोळीवाल्यांशी सामना देत असतानाच मारले गेले. त्यांचे शव दिल्लीस आणून त्याचे लष्करी इतमामाने दफन करण्यात आले. ब्रिगेडियर उस्मान हे फक्त ३५ वर्षांचे होते. ते उत्तर हिंदुस्थानी होते. ते अविवाहित असून लष्करी नोकरीत असूनही शाकाहारी, सिगारेट न ओढणारे व दारू न पिणारे असे निर्व्यसनी होते.

काश्मीरमध्ये जे आपण एवढे यश संपादन केले त्याचा फार मोठा वाटा विमान दलाला जातो. त्यांनी अत्यंत अवघड ठिकाणी अन्न व इतर वस्तूंचा पुरवठा जीविताला धोका पत्करून केला. विमानदलाच्या हालचालींना काश्मीरची हवा तशी अनुकूल नाही. पाऊस व बर्फ यामुळे विमानतळ चांगले करता आले नाहीत. तरीही त्यांनी बहादुरीने या गोष्टी घडवून आणल्या. बनिहाल घाटासारख्या ९००० फूट उंची- वरून वस्तूंचा पुरवठा करणारे काफिले नेले. मोटारींनी वाहतूक प्रथमच या घाटातून या वेळी झाली. याप्रमाणे शत्रूला जरी काही भागातून

आपण पिटाळून लावले तरी सर्वच्या सर्व काश्मीर आपण पुनः पादाक्रांत करू शकलो नाही. दरम्यान आपण यूनोमध्ये आपली तक्रार नोंदविली व तेव्हांपासून आपले आक्रमण थांबवावे लागले. चकमकी होत होत्या. पण त्या संरक्षणापुरत्या होत्या. शेवटी १२ ऑगस्ट १९४८ ला एक तहनामा सुचविण्यात आला व शेवटी २९ जुलै १९४९ रोजी युद्धबंदी रेषेबाबत दोन्ही देशातील लष्करी प्रमुख व संयुक्तराष्ट्र संघटनेच्या तहनामा समितीचे सभासद यांमध्ये करार झाला व युद्धबंदी रेषेपासून आपल्या देशात ५०० यार्ड अंतरावर दोन्ही बाजूंनी आपली सैन्ये ठेवण्याचे ठरले. ५०० यार्डांच्या अलीकडे ज्याने त्याने आपले संरक्षक मोर्चे बांधण्यास परवानगी देण्यात आली. परंतु हे करीत असताना जादा फौज अगर कुमक कोणीही आणावयाची नाही असे ठरले. १ जानेवारी १९४९ रोजी युद्धबंदीची घोषणा झाली तेव्हाची परिस्थिती कायम ठेवावयाची. हा करार झाल्यापासून युद्धबंदी रेषा कोणी ओलांडावयाची नाही व आपापली सैन्ये ३० दिवसांचे आत युद्धबंदी रेषेच्या अलीकडे ५०० यार्डावर आणून ठेवावयाची.

हा करार कराची मुक्कामी २९ जुलै १९४९ रोजी झाला व त्यावर हिंदुस्थानतर्फे लेफ्टनंट जनरल एस. एम्. श्रीनागेश, पाकिस्तानतर्फे मेजर जनरल जे. कॉथॉर्न व संयुक्त राष्ट्रसंघटनेतर्फे हर्नांडो सँपर व एम्. डेल्हॉए यांनी सह्या केल्या व काश्मीरचा प्रश्न लष्करापुरता त्या दिवशी संपविण्यात आला.

संयुक्तराष्ट्रसंघटनेकडे धाव

हिंदुस्थानच्या सामोपचारी धोरणास अनुसरून हिंदुस्थानने पाकिस्तान-बरोबर एकदम दोन हात करण्याचे टाळले. घुसखोरांना जेवढे काश्मीरच्या बाहेर हाकलता येईल तितके हाकलले व पाकिस्तानला असे कळविले की, या घुसखोरांना फूस देऊ नये व आपल्या प्रदेशातून काश्मिरात घुसू देऊ नये. पाकिस्तानने एवढी साधी गोष्ट करावी म्हणून आपल्या

सरकारने अगदी प्रथम म्हणजे २२ ऑक्टोबर १९४७ लाच इंग्लंडच्या मुख्य प्रधानांना एक तार पाठविली व तशीच तार पाकिस्तानच्या मुख्य प्रधानांनाही २६ ऑक्टोबरला पाठविली. त्या तारेत शेवटी आपला मनोदय सांगताना मुख्य प्रधान म्हणाले की, ही गोष्ट आपल्या कानावर घालावयाचे एकच कारण की, यातून एखादे वेळी आंतरराष्ट्रीय गुंतागुंत निर्माण होईल. या तारेनंतर २८ ऑक्टोबरला म्हणजे सामील-नामा झाल्यावर एक तार खुद्द पाकिस्तानचे त्या वेळचे मुख्य प्रधान लियाकत अली खान यांना केली व त्यात असेच म्हटले की, काश्मिरात शिरून घुसखोरांनी जो धुमाकुळ घातला आहे त्याचा बंदोबस्त करणे एवढेच आमचे काम आहे असे आम्ही समजतो. तुम्हीही त्या कामात सहकार्य द्यावे. अशा घुसखोरांचा जर वेळीच बंदोबस्त केला नाही तर त्यांच्यापासून पुढे मागे पाकिस्तान व हिंदुस्थान अशा दोघांनाही धोका आहे. पाकिस्तानच्या हद्दीतून काश्मीरमध्ये येण्यास तुम्ही मज्जाव करावा अशी आमची विनंती आहे.

आम्ही काश्मिरशी जो सामिलनामा केला आहे तो लोकांचे मत अजमावून मगच पुरा व्हावयाचा आहे. परंतु लोकांचे हे जे मत अजमावयाचे आहे ते काश्मीरमधून हे हल्लेखोर पार हाकलले गेल्यावर व काश्मीरमध्ये पूर्ण शांतता व व्यवस्था झाल्यावरच शक्य आहे. तोपर्यंत याचा विचार करता येणार नाही.

अशा प्रकारच्या अनेक तारा २८ ऑक्टोबर पासून २२ डिसेंबर १९४७ पर्यंत दोन्ही देशांच्या सरकारांमध्ये दिल्या गेल्या. शेवटी २२ डिसेंबरला पं. जवाहरलालनी एक पत्र खुद्द लियाकतअलींच्या हातात दिले. त्यामध्ये हल्लेखोरांविरुद्ध तक्रार करून शेवटी पाकिस्तान सरकारला असे सांगण्यात आले की, पाकिस्तानने हल्लेखोरांना—

(अ) पाकिस्तानातून प्रवेश करू देऊ नये व काश्मिरात येण्यास पाकिस्तानचा उपयोग करू देऊ नये.

(ब) हल्लेखोरांना लष्करी मदत व इतर वस्तूंचा पुरवठा करू नये.

याप्रमाणे पाकिस्तान सरकारने वर्तन न केल्यास हिंदुस्थान सरकारला नाइलाजाने संयुक्तराष्ट्र संघटनेकडे धाव घ्यावी लागेल.

हिंदुस्थानने संयुक्तराष्ट्र संघटनेकडे जाण्याची आपली मनीषा प्रगट केल्याबरोबर पाकिस्तानने ती कल्पना उचलून धरली. कारण त्याला एवढम खात्री पटली की, हिंदुस्थान काही चाल करून पाकिस्तानच्या भूमीवर युद्ध करीत नाही. संयुक्तराष्ट्र संघटनेकडे धाव घेण्याची इच्छा प्रगट करण्याऐवजी जर पाकिस्तानवर आक्रमण करण्याची भाषा हिंदुस्थानच्या पंतप्रधानांनी वापरली असती तर पाकिस्तानला कदाचित विचार करावा लागला असता व त्यांचेकडून टोळीवाल्यांना होणारी मदत कदाचित झाली नसती. पाकिस्तानने या गोष्टीचा फायदा घेऊन ३० डिसेंबरला एक सविस्तर हकीकतीचा खलिता तयार केला व तो हिंदुस्थान सरकारच्या हायकमिशनरकडे दिला. त्यातील त्यांनी स्वतः काढलेला सारांश पुढीलप्रमाणे —

(अ) ब्रिटिश सैन्य देशाबाहेर जाण्यास उपयोगी पडावे म्हणून हिंदुस्थानने फाळणी स्वीकारल्याचा देखावा केला परंतु हिंदुस्थानच्या मनात फाळणी व्हावी असे कधीच नव्हते.

(ब) पाकिस्तान हा हिंदुस्थानचाच भाग आहे असे हिंदुस्थानी पुढारी समजत आले आहेत व त्यामुळे त्यांना पाकिस्तानचे राज्य मोडून टाकावयाचे आहे.

(क) पाकिस्तानचा नाश करण्याच्या उद्देशानेच फाळणी रद्द होण्याचे प्रयत्न, कोळसा व रेल्वे यांचा फायदा न देण्याची वृत्ति, पाकिस्तानला द्यायच्या पैशांचा वाटा नाकारणे, मुसलमान लोकांची सरसहा कत्तल या गोष्टी होत आल्या आहेत.

(ड) पाकिस्तानचा नाश हेच ज्यांचे उद्दिष्ट आहे अशा हिंदुस्थानकडन जुनागड व मानवदार या संस्थानांचा बळजबरीने कब्जा

म. ग्रं. सं.

घेण्यात आला व काश्मीरचा सामिलनामा फसवणुकीच्या मार्गाने जो घेण्यात आला त्यायोगे पाकिस्तानशी हिंदुस्थानने शत्रुत्व संपादिले आहे.

या सर्व गोष्टींचा परामर्ष घेण्याच्या दृष्टीने तुम्ही जर संयुक्तराष्ट्र-संघटनेकडे जात असाल तर ती गोष्ट स्वागतार्हच आहे.

अशा प्रकारे हिंदुस्थान व पाकिस्तान यांच्यामध्ये सामोपचाराचा मार्ग जेव्हा बंद झाला तेव्हा शेवटी हिंदुस्थानने १ जानेवारी १९४८ रोजी संयुक्तराष्ट्र संघटनेकडे आपली पाकिस्तानच्या विरुद्ध फिर्याद नोंदवली व तेव्हापासून काश्मीरचा प्रश्न सर्व जगाच्या चर्चेचा विषय बनला.

हिंदुस्थानची पाकिस्तानविरूद्ध फिर्याद :

हिंदुस्थानच्या प्रतिनिधीनी १जानेवारी १९४८ रोजी तारेने सिक्युरिटी कौन्सीलच्या अध्यक्षाना पत्र पाठविले (एस्. ६२८)

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सनदेतील कलम ३५ प्रमाणे आंतरराष्ट्रीय शांततेला धोका उत्पन्न होईल अशी परिस्थिती निर्माण झाली असता ती परिस्थिती सिक्युरिटी कौन्सीलच्या नजरेस आणता येते. हिंदुस्थानचा भाग असलेले व हिंदुस्थानमध्ये सामील झालेले काश्मीरचे संस्थानात पाकिस्तानचे नागरिक व वायव्य सरहद्दीवरचे प्रांतातील टोळीवाले यानी पाकिस्तानच्या मदतीने चढाई केली आहे. या आमच्या खलित्यात यापुढे काश्मीरने कोणत्या परिस्थितीत आमचेशी सामीलनामा केला, काश्मीरवर हल्ला करणाऱ्यांविरूद्ध हिंदुस्थानला लष्करी मोहीम कशी करावी लागली व या हल्ला करणाऱ्याना पाकिस्तानकडून कशी मदत मिळाली व अजूनही मिळत आहे या सर्व गोष्टी विस्ताराने सांगितल्या आहेत. सिक्युरिटी कौन्सीलला हिंदुस्थानचे सरकार अशी विनंति करीत आहे की पाकिस्तानने अशी कोणतीही मदत या हल्लेखोराना देऊ

नये; कारण अशी मदत करणे म्हणजे हिंदुस्थानवर चढाई करून जाणे आहे. पाकिस्तानने मदत देण्याचे बंद केले नाही. तर हल्लेखोरांची खोडकी मोडण्याकरता व स्वसंरक्षणाच्या दृष्टीने पाकिस्तानी मुलुखात जावे लागेल. वेळ अत्यंत आणीबाणीची व तातडीची आहे. आंतरराष्ट्रीय शांततेचा धोका टाळण्याचे दृष्टीने या गोष्टीकडे सिक्युरिटी कौन्सीलने तातडतोब लक्ष द्यावे.

(यानंतर या पुस्तकात आतापर्यंत काश्मीरच्या परिस्थितीचे जे वर्णन आले आहे ते विस्ताराने सांगितले असून काश्मीरच्या सामीलनाम्याविषयी पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे)

(५) २६ ऑक्टोबर १९४७ रोजी काश्मीरचे राजे महाराजा सर हरिसिंग यांनी हिंदुस्थानकडे संरक्षणाची व सैन्याची याचना केली व त्याच वेळी जम्मू काश्मीरमध्ये सामील करण्यास परवानगी मागितली. त्यावेळी शेख महंमद अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या नॅशनल कॉन्फरन्सनेही अशीच मागणी केली. या कॉन्फरन्सला लोकांचा बऱ्याच मोठ्या बहुमताचा पाठिंबा आहे.

(६) काश्मीरमधील लोकांच्या वित्ताचा व माणसांचा होणारा नाश टाळण्याकरता हिंदुस्थानसरकारला तातडतोबीचा मार्ग म्हणून या दोन्ही मागण्या कबूल कराव्या लागल्या. परंतु काश्मीरमधील या परिस्थितीचा उपयोग हिंदुस्थान सरकारने आपल्या फायद्याकरता केला असा दोषारोप कोणी करू नये म्हणून आम्ही त्याचवेळी हे स्पष्ट केले की काश्मीरमधून एकदा हे हल्लेखोर बाहेर पिटाळले गेले व काश्मीरमध्ये नेहमीप्रमाणे शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित झाली म्हणजे तेथील लोकाना आपले भवितव्य आपल्या मनाप्रमाणे ठरवितां येईल. लोकांचे हे मत सर्वमान्य असलेल्या सार्वमत अगर लोकमत (प्लेबिसाईट किंवा रेफेरेंडम) या मार्गांनी ठरविता येईल व हे सार्वमत निःपक्षपाती अशा आंतरराष्ट्रीय संघटनेच्यामार्फत घेण्यात येईल.— ”

याप्रमाणे सामीलनाम्याबाबत हिंदुस्थान सरकारने खुलासा करून पुढे हल्लेखोरांच्या हल्ल्यांची आकडेवार माहिती दिली आहे. वाचकांच्या हे ध्यानात आले असेल की सार्वमत किंवा लोकमत हे शब्द प्रथमच अधिकृतरीत्या या फिर्यादीत उपयोगात आणले गेले. यापूर्वी लॉर्ड मौंट बॅटनने सामीलनामा स्विकारताना लोकांची इच्छा लक्षात घेतली जाईल एवढेच म्हटले होते. पाकिस्तानला पहिल्याप्रथम ता. २८ ऑक्टोबर १९४७ रोजी जे पत्र लिहिले आहे त्या पत्रातही लोकांच्या इच्छेला पात्र राहून एवढाच शब्दप्रयोग केला आहे. त्या शब्दप्रयोगामुळे काश्मीरमध्ये ज्या निवडणुका झाल्या त्या लोकमत निदर्शक अशा म्हणता येत असत. परंतु सार्वमत किंवा लोकमत असा प्रयोग केल्याबरोबर व ते सार्वमतही आंतरराष्ट्रीय संघटनेमार्फत घ्यावे असे म्हटल्याबरोबर आपण त्या सापळयात नकळत अडकून पडलो आहो. असो. अशा प्रकारे साद्यंत हकीकत निवेदन केल्यावर फिर्यादीच्या कलम १३, १४ व १५ कलमांत पुढील प्रमाणे मागणी करण्यात आली आहे.

" १३. हल्लेखोराना हिंदी मुलखातून घालवून देण्याकरता व त्यांनी पुनः हिंदी मुलखावर आक्रमण करू नये म्हणून हिंदी सैन्याला पाकि-स्तानी मुलखात जावे लागले असते. हिंदी सैन्याने असे केले असते तरच हल्लेखोराना मिळणारी रसद तोडली गेली असती. आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणे पाकिस्तानी मुलुखांतून जाऊन हल्लेखोरांबरोबर सामना करण्याचा अधिकार हिंदुस्थानला आहे परंतु हिंदुस्थानने असे काही केले असते तर पाकिस्तानेही कदाचित युद्ध पुकारले असते. परंतु हिंदुस्थानला संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेतील कलम ३५ प्रमाणे ही हकीकत संघटनेच्या कानावर घालणे युक्त वाटले म्हणून ते सिक्युरिटी कौन्सिलकडे आले आहेत. सिक्युरिटी कौन्सिलला त्यांची विनंती आहे की,

(१) जम्मू व काश्मीर संस्थानावर हल्ला करण्यापासून पाकिस्तान सरकारचे लष्करी व मुलकी नोकर याना परावृत्त करावे.

(२) जम्मू व काश्मीर संस्थानातील लढाईत पाकिस्तानी रहिवाशानी कोणत्याही प्रकारचा भाग घेऊ नये.

(३) हल्लेखोराना पाकिस्तानचा कोणताही प्रदेश काश्मीरवर हल्ला करण्याकरता वापरू देऊ नये व लष्करी व इतर मदत देऊ नये व हल्लीचा लढा लांब मुदतीपर्यंत चालू राहील अशी कोणतीही मदत करू नये. "

" १४-हिंदुस्थान सरकारच्या विनंतीप्रमाणे सिक्युरिटी कौन्सीलने ताबडतोब व्यवस्था करावी असा आग्रह हिंदुस्थान सरकार धरत आहे. हल्ला झालेल्या जागी परिस्थिती इतकी बदलते आहे की जरूर पडेल त्याप्रमाणे लष्करी हालचाली करण्याची मुभा हिंदुस्थान सरकार आपल्या कडे राखून ठेवीत आहे. "

" १५. पाकिस्तान बरोबरच्या संबंधात असा बिकट प्रसंग उत्पन्न झालेला पाहून हिंदुस्थानसरकारला खेद होत आहे. पाकिस्तान हे हिंदुस्थानचे शेजारी राष्ट्रच आहे असे नव्हे तर हल्लीची फाळणी सोडली तर त्यांचे दरम्यान अनेक हितसंबंध निगडीत झाले आहेत इष्ट व चिरंतनचे स्नेहसंबंध राखण्याचे दृष्टीने हिंदुस्थानचे सतत प्रयत्न चालू राहतील. दोन्ही राज्यांच्या दृष्टीने शांतता अत्यंत आवश्यक आहे. सिक्युरिटी कौन्सीलकडे हिंदुस्थानसरकारने जी धाव घेतली आहे त्या मागील प्रामाणिक व अंतःकरणपूर्वक हेतू एवढाच आहे की सिक्युरिटी कौन्सीलने अशी शांतता प्रस्थापित करण्याचा तातडीने प्रयत्न करावा. "

पाकिस्तानची कैफियत व उलट फिर्याद

हिंदुस्थानच्या फिर्यादीस पाकिस्तानने खालील स्वरूपाचे उत्तर देऊन आपली कैफियत मांडली व त्याचबरोबर हिंदुस्थान विरुद्धची आपली कागाळीही मांडली.

" हिंदुस्थानातील मुसलमानांची सुरक्षितता, स्वातंत्र्य, क्षेमसमाचार, धर्म, संस्कृती व भाषा ही सर्व धोक्यात आहेत. काश्मीरचे जे सामिली-

करण झाले ते लबाडीचे व सशस्त्र स्वरूपाचे होते व जम्मू–काश्मीरच्या महाराजांनी आपल्या सशस्त्र सैनिकांच्या जोरावर काश्मीरमधील मुसलमानांवर अनन्वित असे अत्याचार केले असून लुटालूट व कत्तल फार मोठ्या प्रमाणावर केली आहे. काश्मीरमधील बिगर मुसलमान लोकांचाही यामध्ये फार मोठा वाटा आहे."

पाकिस्तानने या सर्व गोष्टी नाहीशा करण्याकरता सिक्युरिटी कौन्सीलकडे अशी विनंती केली की,

"काश्मीरमधील युद्ध बंद करण्याकरिता कमिशन अगर कमिशन्स नेमावीत. काश्मीरमधून बाहेरून आलेल्या सर्वांनी बाहेर निघून जावे. बाहेरून आलेले म्हणजे पाकिस्तानी व हिंदी सैन्य हे होय व अशी सैन्ये बाहेर काढून घेतल्यावर काश्मिरच्या लोकांना स्वातंत्र्य प्राप्त होईल व मग त्यांना पाकिस्तानमध्ये यावयाचे की हिंदुस्थानमध्ये यावयाचे याबद्दल खुले मतदान घेता येईल."

अशा प्रकारे पाकिस्तानने हिंदुस्थानवर उलट आरोप करून काश्मीरमधील जनतेच्या दुःखाचा परिहार करण्याकरता कमिशनची मागणी केली.

आपल्या उत्तराच्या तिसऱ्या विभागात पाकिस्तानने काश्मीरमध्ये १५ ऑगस्ट १९४७ पासून घडलेल्या हकीकतीची आपली बाजू मांडली व पुढे असे म्हटले कीं, "अशा सर्व परिस्थितीत आपल्या मुसलमान बांधवांचा होणारा छळ वाचविण्याकरता जर स्वतंत्र टोळीवाल्यांनी व मुसलमान निराश्रितांनी की, जे पूर्वी हिंदुस्थानचेच रहिवासी होते त्यांनी काश्मीरमधील जनतेची सोडवणूक करण्याकरता चालू संघर्षांत भाग घेतला तर त्यात नवल ते काय ? आझाद काश्मीरच्या सैन्यात त्यांनी दाखल होऊन आक्रमण केल्यास ते अगदी साहजिकच आहे. आता या काश्मीरच्या सैनिकांकडे शस्त्रास्त्रे कुठून आली असा प्रश्न विचारण्यात येतो. पण त्यांच्याकडे फारशी शस्त्रास्त्रे अशी नाहीतच व जी काही आहेत

ती त्यांनी डोग्रा व हिंदी सैनिकांचा पराभव करून त्यांच्याकडून काढून घेतली आहेत व उरली सुरली शस्त्रे त्यांच्याकडे ब्रिटिशांच्या काळा पासूनच आहेत. पाकिस्तान सरकार जोराने इन्कार करते व म्हणते की, पाकिस्तान सरकारकडून या हल्लेखोरांना कोणतीही मदत झालेली नाही. व पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांनी त्यांना शिकवून तयार केलेले नाही. उलट हिंदुस्थानशी असलेले आपले स्नेहसंबंध दृढ करण्याकरता पाकिस्तान सरकारने या सर्व हल्लेखोरांना त्यांच्या बेतापासून परावृत्त करण्याचे लढाई खेरीज सर्व प्रयत्न केले आहेत. तसेच पाकिस्तानी प्रदेशाचा वापर टोळीवाले तळ म्हणून करताहेत हा आक्षेपही सर्वथैव खोटा आहे. तसेच पाकिस्तानकडून लष्करी मदत या टोळीवाल्यांना मिळते आहे हे म्हणणेही तितकेसे बरोबर नाही.

संयुक्तराष्ट्रसंघटनेतील प्रतिक्रिया

संयुक्तराष्ट्र संघटना ही २४ ऑक्टोबर १९४५ रोजी स्थापन झाली. त्यात १९६० मध्ये ८१ राष्ट्रे सामील झाली होती व या संघटनेची सनद ५१ राष्ट्रांनी जून १९४५ मध्ये मान्य करून त्यावर आपल्या सह्या केल्या होत्या. या संघटनेमार्फत शांतताप्रेमी राष्ट्रांच्या उन्नतीकरता अनेक प्रकारे काम चालते. आपल्यास राजकीय स्वरूपाचे काम कसे चालते हे पाहावयाचे आहे. या संघटनेच्या सर्वसाधारण सभेला जनरल असेंब्ली असे म्हणतात व त्यात सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधी बसू शकतात. सभासद राष्ट्रांच्या संरक्षणाचा विचार करण्याची कामगिरी या जनरल असेंब्लीला करावी लागते. राजकीय संरक्षण साधण्यासाठी सिक्युरिटी कौन्सील म्हणून एक उपमंडळ काम करते. या उपमंडळाचे कायमचे सभासद म्हणून राष्ट्रीय चीन, फ्रान्स, रशिया, इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांचे प्रतिनिधी असतात व या मंडळात काम करण्यासाठी दोन वर्षांच्या मुदतीचे आणखी सहा राष्ट्रांचे प्रतिनिधी जनरल असेंब्ली निवडते. अशा प्रकारे हे सिक्युरिटी कौन्सील ११ राष्ट्रांच्या प्रतिनिधींचे होते व

त्याचे मुख्य काम म्हणजे आंतरराष्ट्रीय शांतता राखणे व सर्व राष्ट्रांचे संरक्षण करणे. हे उद्दिष्ट साधण्याकरता तडजोड, आर्थिक दडपण अगर लष्करी साहाय्य यांपैकी ज्या गोष्टीची गरज लागेल त्याचा अवलंब करणे.

आपण हिंदुस्थानने दिलेल्या फिर्यादीची माहिती घेताना असे पाहिले की, ही फिर्याद आपण संघटनेच्या कलम ३५ प्रमाणे दिली आहे. सिक्युरिटी कौन्सिलचे कार्य काय असावे याचा विचार संघटनेच्या चौथ्या प्रकरणात केला आहे. त्यातील कलम २४ मध्ये असे सांगितले आहे की, आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था संभाळण्याची प्राथमिक जबाबदारी सिक्युरिटी कौन्सिल म्हणजेच सुरक्षा मंडळ यांचेवर टाकण्यात आली आहे व सदर गोष्टीसाठी सुरक्षा मंडळाने जर एखादी गोष्ट केली तर ती संघटनेमार्फत केली असे समजण्यात यावयाचे आहे. सुरक्षा-मंडळाने आपला अहवाल दरसाल सर्वसाधारण मंडळास द्यावयाचा असून विशेष प्रसंगी तो खास सभेपुढे ठेवावयाचा आहे.

सहाव्या प्रकरणात तडजोडीच्या शांततामय मार्गाने राष्ट्रा-राष्टातील तंटे कसे मिटवायचे याचा विचार केला आहे. त्यातील ३४ व्या कलमान्वये सुरक्षा मंडळाला चौकशीचे अधिकार दिले आहेत व ही जी चौकशी करावयाची आहे ती कोणत्याही दोन राष्ट्रातील संघर्षाबाबतची करता येईल. अशा संघर्षाने आंतरराष्ट्रीय शांततेला धोका येईल की काय हेही या मंडळानें पाहावयाचे आहे. अशी शांततेला धोका आणणारी परिस्थिती निर्माण झाली असेल तर त्याबाबत कलम ३५ प्रमाणे संघटनेकडे धाव घेऊन तो धोका टाळण्यासाठी प्रयत्न करण्याची विनंति कोणत्याही राष्ट्राला करता येते. आपणही याच कलमाचा आधार घेऊन आपली तक्रार संयुक्त राष्ट्रसंघटनेकडे नोंदली आहे. अशी तक्रार आल्यावर कलम ३६ प्रमाणे सुरक्षा मंडळाला कोणत्याही वेळी योग्य ती उपाय योजना सुचविण्याचा अधिकार आहे. दोन राष्ट्रातील वादाने आंतरराष्ट्रीय शांततेला धोका आहे असे वाटल्यास कलम ३७ मध्ये असे म्हटले आहे की कलम ३६ प्रमाणे ताबडतोब उपाय योजना सुचवावी. कलम ३८ प्रमाणे

सर्व पक्षांच्या सूचनेनुसार तडजोडीचा मार्ग सुचविण्याचा अधिकार या सुरक्षामंडळाला आहे. अशाप्रकारे शांततमय रीतीने आंतरराष्ट्रीय वाद मिटविण्याची योजना या सहाव्या प्रकरणात आहे. या प्रकरणातील पद्धतीस अनुसरून सुरक्षा मंडळाने हिंदुस्थान व पाकिस्तानच्या वादाचा शेवट करण्याचा प्रयत्न चालविला आहे परंतु त्यास यावे तसे यश अद्याप आले नाही. न्यायदानातील एक तत्त्व असे आहे की न्यायदानास विलंब लागणे म्हणजे न्यायदान करण्यास नकार देणे होय. सुरक्षा मंडळाची हीच गत झाली. १ जानेवारी १९४८ पासून आज वीस वर्षे झाली काश्मीरबाबतची आमची तक्रार काहीच निर्णय न घेता तशीच रेंगाळत राहिली आहे व दरम्यान १९६५ मध्ये पाकिस्तान व हिंदुस्थान यांच्या मध्येच प्रत्यक्ष लढाई झाली व सुरक्षामंडळाकडून काही मार्ग निघण्या ऐवजी स्वतंत्र रशियासारख्या देशाने दोन राष्ट्रांत मध्यस्थी केली व ताश्कंद करारासारखा करार १० जानेवारी १९६६ रोजी अस्तित्वात आला. हे सर्व प्रकरण असे चिघळत राहावयाचे एक कारण म्हणजे आपण सुरक्षा मंडळाकडे फार लौकर धाव घेतली. सुरक्षा मंडळाची स्वतःची कार्यपद्धति अशी अद्याप तयार झाली नव्हती. सगळीकडेच नवखेपणा होता. आपल्या पूर्वी ग्रीसमधील आक्रमणाचा असा एकच प्रश्न या मंडळापुढे आला होता. त्यामुळे मुख्य प्रश्नाला फाटे फुटत गेले व प्रश्नाचे वांगे झाले व शेवटी आपण संघटनेकडे येण्यात घोडचूक केली असे आपल्या प्रतिनिधींना वाटत राहिले. पाकिस्तानने आपल्यावर कुरघोडी केली असे कबूल करण्याशिवाय गत्यंतर उरत नाही. ती गोष्ट अशी झाली.

सुरक्षामंडळातील पहिल्या फेरी

१ जानेवारी १९४८ ला आपली फिर्याद दिल्यावर कोर्टाप्रमाणे आपल्याला १५ जानेवारी १९४८ ही तारीख देण्यात आली. आपल्या प्रतिनिधि मंडळाचे नेतृत्व श्री. गोपाळस्वामी आयंगार यांचेकडे होते. आपल्या भाषणात त्यांनी टोळीवाल्यांना पाकिस्तानची फूस व मदत

आहे हे निरनिराळे आधार देऊन दाखविले व पाकिस्तानने अशा टोळीवाल्यांना काश्मीरमध्ये शिरून धुमाकूळ घालण्यास मदत करणे हे आंतरराष्ट्रीय शांततेला धोका आणण्यासारखे आहे असे प्रतिपादन केले व पाकिस्तानने कोणतीही मदत देण्यास सुरक्षा मंडळाने रोखावे अशी विनंती केली. प्रश्न फक्त काश्मीरमधील आक्रमणाचाच आहे असेही त्यांनी स्पष्ट केले.

पाकिस्तानच्या प्रतिनिधींचे नेतृत्व पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री सर महंमद झाफरुल्लाखान यांचेकडे होते. त्यांनी आपली बाजू मांडण्यास मुदत मागून घेतली व १६ तारखेला सतत तीन तास दहा मिनिटे भाषण करून अनेक उखाळया पाखाळया काढल्या व आपल्या भाषणात काश्मीरच्या प्रश्नाला गौण स्थान देऊन हिंदुस्थानविरुद्ध आपणच कागाळी करण्यास सुरवात केली. यापूर्वी रशियाचे प्रतिनिधी अंद्रेयी व्हॅशिन्स्की यांनी दोन तास एकसारखे भाषण या सुरक्षामंडळापुढे केले होते. झाफरुल्लाखानांचे भाषण वक्तृत्वपूर्ण व स्वरांचे आरोह–अवरोह करून अत्यंत छाप पाडणारे झाले. १७ तारखेला पुनः त्यांनी दोन तास पंचवीस मिनिटे भाषण केले व एकंदर ५ तास ३५ मिनिटांपर्यंत हिंदुस्थानवर सर्व बाजूने हल्ला चढविला व हिंदुस्थानकडून तिथल्या मुसलमानांची जी गळचेपी चालली आहे त्याची चौकशी करण्याकरता कमिशन नेमण्याची मागणी केली.

सर झाफरुल्ला खानांचे भाषण संपल्याबरोबर लगेच एक ठराव ता. १७ जानेवारी १९४८ ला बैठकीत करण्यात आला व त्यात दोन्ही राष्ट्रांना असे आवाहन करण्यात आले की,

"दोन्ही देशांनी आपापल्या नागरिकांना परिस्थिती आटोक्यात राहण्याकरता व ती जास्त चिघळू नये म्हणून कोणतीही वक्तव्ये करू नयेत व आपल्या हातात या दृष्टीने जेवढे करणे शक्य आहे ते सर्व करावे. तसेच चालू परिस्थितीत सुरक्षा मंडळाने विचार करावयास

पाहिजे असा काही बदल घडल्यास तो ताबडतोब सुरक्षा मंडळाच्या निदर्शनास आणावा. ”

सुरक्षा मंडळाचा हा ठराव ९ मते अनुकूल रशिया व युक्रेन तटस्थ अशा मतसंख्येने पास झाला. अर्जेंटिनाचे डॉ. जोस आर्से यांनी असे उद्‌गार काढले की, दोन्ही पक्षांनी रणचंडीच्या तांडवनृत्याची एवढी जहाल वर्णने केली असता सुरक्षा मंडळाने दोघांनाही ‘ शांतम् पापम्, शांतं पापं ’ चा उपदेश करावा ही मोठी चमत्कारिक गोष्ट आहे.

टोळीवाल्यांना पाकिस्तानने कोणतीही मदत देऊ नये अशी हिंदुस्थानची मूळ मागणी असताना तिचे रूपांतर हळूहळू पाक हाच आक्रमक आहे व पाकनेच स्वारी केली आहे असे म्हणण्यात झाले. याचे उलट पाकिस्तानने काश्मीरमधील जनता गुलामगिरीत खितपत आहे तिला आपण त्यातून सोडविले पाहिजे अशी भूमिका घेतली. पाकिस्तान आपण काश्मीरवरील चढाईत कोणताही भाग घेणार नाही असे म्हणत असता हिंदुस्थान व पाक हे दोन पक्षकार कल्पून त्यांना तडजोड करण्यास दर खेपेस भाग पाडण्यांत आले. उलट दिशेने जाणाऱ्या दोन घोड्यांवर बसण्याची बहाद्दुरी झाफरुल्लाखान करीत होते. एका बाजूने ते म्हणत होते की, आपल्याला काश्मीरमधील काही भानगडी माहीत नाहीत व दुसऱ्या बाजूने टोळीवाल्यांची काश्मीर उद्धारकाची भूमिका आवर्जुन मांडीत होते. पाकिस्तानने स्वतःची कमिशनची मागणी करून सत्यस्थिती समजून घेण्यासाठी कमिशनची नेमणूक होऊ लागली असता २८ जानेवारी ४८ ला झाफरुल्लाखान म्हणाले,

प्रत्यक्ष परिस्थितीबाबत आमच्यात जरी मतभेद असले तरी सार्वमताबाबत एकमत आहे. तेव्हा तेवढ्याचीच योजना केली म्हणजे झाले परिस्थितीचे निरीक्षण करून सत्यस्थिती तपासून पाहण्याची काही गरज नाही.

या सर्व वादविवादात टोळीवाले काश्मीरचा जो भाग व्यापून बसले ते बसलेच. त्यांना तेथून प्रथम हुसकून काढा व मग जगाची काळजी करा असे आपल्याकडन निक्षून सांगितले गेले नाही व काश्मीरमधून आझाद काश्मीर तयार झाला तो झालाच.

१९ जानेवारी १९४८ च्या ठरावानंतर आपण मात्र आपल्या संगिनी रोखून धरल्या व प्रत्यक्ष श्रीनगर–जम्मूच्या आसपास टोळीवाले आले तर त्यांना हाकलून लावीत राहिलो पण पाकिस्तानने मात्र जेथे जेथे हात मारता येईल तेथे तेथे तो मारला व इकडे शांतं पापं शांतं पापं म्हणत सैन्याची कुमक टोळीवाल्यांना देणे चालूच ठेवले. १७ जानेवारी १९४८ च्या ठरावानंतर महत्त्वाचा ठराव १३ ऑगस्ट १९४८ रोजी युद्धबंदीचा झाला. या काळात दोन्ही राष्ट्रांना एकत्र आणण्याचे बरेच प्रयत्न झाले. पण या सर्व प्रयत्नात महत्त्वाच्या राष्ट्रांचा कल पाकिस्तानकडेच असल्याचे आढळून आले.

इंग्लंडचे सुरक्षामंडळाचे त्यावेळचे प्रतिनिधी श्री. फिलिप नोएल बेकर यांनी २४ जानेवारी १९४८ ला असे उद्गार काढले की, " काश्मीरमध्ये काय घडले व कसे घडले ही गोष्ट अजून रहस्यमय आहे. इतिहासात काही घडामोडी झाल्या यात काही संशय नाही पण त्या शेवटी इतिहासातच जमा व्हावयाच्या आहेत. आपण आता भविष्याचा विचार करू. "

आणि भविष्यात इतिहासातीलच लुटालूट, हल्ले व जाळपोळी या गोष्टी दडवून ठेवल्या होत्या. २५ ऑक्टोबर १९४८ ला पाकिस्तानच्या सरसेनापतींनी हिंदुस्थानच्या सरसेनापतींना — जनरल लॉकहार्ट यांना पाठविलेल्या संदेशात कळविले होते की, ५००० टोळीवाल्यांनी मुझफराबाद व डोमेल या ठिकाणी घुसून ती ठाणी सर केली व आणखीही मदत या टोळीवाल्यांना पुरविली जात आहे. जनरल लॉकहार्ट यांनी हा संदेश लॉर्ड मौंटबॅटनच्या अध्यक्षतेखाली काम करीत असलेल्या संरक्षण समितीच्या बैठकीत वाचून दाखविला.

काश्मीरमध्ये शिरलेल्या व शिरणाऱ्या टोळीवाल्यांचा धुमाकूळ चालू असतानाच अमेरिकेचे प्रतिनिधी वॉरन ऑस्टिन यांनी असे सुचविले की, हिंदुस्तान व पाकिस्तान यांनी आताचे सरकार बदलून त्या जागी निराळेच एक स्वतंत्र निःपक्षपाती असे सरकार आणावे व लोकमत त्यानंतर अजमावावे. कॅनडाचे जनरल मॅकनॉटन यांनी सुचविले की. कोणाच्याही कृपेची अगर भीतीची तमा न बाळगता काश्मिरी जनतेला सार्वमत कसे देता येईल याची व्यवस्था दोन्ही राष्ट्रांनी करावी, फ्रेंच प्रतिनिधिंनीही असेच सुचविले की, परकीय सैन्ये काश्मीरमधून काढून घ्यावीत व मग खुल्या व स्वतंत्र वातावरणात लोकमताचा कौल घ्यावा.

अशा रीतीने हल्लेखोरांपासून काश्मिरी जनतेचा बचाव करण्याची निकड कोणीच दाखविली नाही. हजारो लोकांच्या गेलेल्या प्राणांची कोणालाच काही क्षिती वाटली नाही व जो तो काश्मिरी लोकांनी राज्यकारभार कोणत्या पद्धतीने करावयास पाहिजे हीच गोष्ट विचारात घेत राहिला.

एकंदरीत विचारसरणीचा रोख असाच दिसला की, टोळीवाले एवढे जे बिडून काश्मीरवर आले ते काही केवळ दरोडेखोरांसारखे दरोडा घालण्याकरता आले नाहीत. त्याना काश्मीरच्या जनतेला गुलामगिरीतून मुक्त करावयाचे आहे व त्यांचा हा उद्देश लोकमताचा कौल घेऊन सफळ होणार आहे. तेव्हा त्यांनी केलेल्या अनन्वित अत्याचारांची कहाणी ही अतिरंजित आहे म्हणून सोडून द्या व त्यांचे राजकीय दुःख निवारण करा. खुद्द अमेरिकेच्या प्रतिनिधींनी वरील प्रकारचे विचार प्रकट केले व ब्रिटीश प्रतिनीधींच्या सूचनेप्रमाणे पाकिस्तान व हिंदुस्थान यांनी सुरक्षामंडळाच्या अध्यक्षांशी वाटाघाटी कराव्यात असे ठरविण्यात आले.

वास्तविक ४ फेब्रुवारी १९४८ रोजी अमेरिकेचे प्रतिनिधी वॉरन ऑस्टिन यांनी आपल्या भाषणात काश्मीरचा सामीलनामा कबूल केला व

म्हटले की, काश्मीरवर आता महाराजांची अधिसत्ता नाही. ती सत्ता हिंदुस्थानसरकारकडे गेली आहे व त्यामुळेच हिंदुस्थानसरकारने आपल्याकडे फिर्याद केली आहे.

इंग्लंडचे प्रतिनिधी नोएल बेकर यांनीही १० फेब्रुवारी १९४८ ला जे भाषण केले त्यात असे स्पष्ट कबूल केले की,

" हिंदुस्थानला पाकिस्तानने युद्ध बंद करण्याकरता जालीम उपाय योजण्याची आवश्यकता वाटते, आम्हांला सर्वांनाही तसेच वाटते. पाकिस्तानचे धोरण टोळीवाल्यांच्या विरुद्ध कसे असावे अशाविषयी आपण पाकिस्तानवर काही जबाबदाऱ्या टाकाव्यात असे हिंदुस्थान सरकारच्या प्रतितिधींना वाटते. आम्हांलाही तसे वाटते. "

अशा प्रकारे हिंदुस्थानची भूमिका कळूनही ही सर्व राष्ट्रे सार्वमताचे तुणतुणे वाजवीतच राहिली. तिकडे काश्मीर पेटले होते आणि इकडे सुरक्षामंडळ तुणतुणे वाजवीत बसले होते असे निकराचे उद्गार शेवटी गोपालस्वामी आय्यंगार यांना काढावे लागले.

१ जानेवारीपासून १० फेब्रुवारी पर्यंत म्हणजे १ महिना १० दिवस होऊन गेले तरी सुरक्षा मंडळाकडून पाकिस्तानला साधी ताकीदही जेव्हा देता आली नाही तेव्हा हिंदुस्थान सरकारने गोपालस्वामी अय्यंगारना सल्लामसलतीसाठी हिंदुस्थानला परत बोलाविले व गोपालस्वामींनी जेव्हा आपण महिनाभर परत येणार नाही असे सांगितले तेव्हा सुरक्षामंडळाने एकच गिल्ला केला की, तिकडे माणसे युद्धात मरत असता आपण सुरक्षा मंडळाचे काम तहकूब ठेवायचे म्हणजे काय ? काय हे अब्रह्मण्य.

गोपालस्वामी अय्यंगारनी शेवटी निक्षून सांगितले की हिंदुस्थानची भूमिका लक्षात न घेता पाकिस्तानच्या प्रतिनिधींशी वाटाघाटी करावयाच्या व फालतू ठरावांचे मसुदे चित्रडीत बसावयाचे यात काय स्वारस्य आहे ? पाकिस्तानवर दबाव येईल असे धोरण जोपर्यन्त आखले

जात नाही तोपर्यंत मला माझ्या सरकारशी सल्लामसलत करणेच भाग आहे.

सुरक्षामंडळाला असे उत्तर देऊन गोपालस्वामी हिंदुस्थानला परत आले व पुनः ४ मार्चला सुरक्षामंडळाच्या बैठकीस हजर राहण्याकरता हिंदुस्थानहून निघाले. १० मार्चच्या बैठकीत त्यांनी आपली भूमिका पुढीलप्रमाणे विशद केली. ते म्हणाले,

सर्वांत प्रथम एक गोष्ट व्हावयास पाहिजे व ती म्हणजे टोळीवाल्यांनी जो धुमाकूळ घातला आहे तो बंद झाला पाहिजे व त्यासाठी प्रथम तरतूद केली पाहिजे.

दुसरी गोष्ट जी सांगण्यात येते की, काश्मीरमध्ये स्वतंत्र, निःपक्षपाती सरकार स्थापन झाले पाहिजे ही गोष्ट विचारात घेण्याजोगीसुद्धा नाही. काश्मीरमध्ये लोकमतानुवर्ती राज्य स्थापन झाले आहे व ते बदलण्यास आम्ही कदापि तयार होणार नाही.

तिसरी गोष्ट जी सुचविण्यात येते की, हिंदुस्थानने काश्मीरमधून आपले सैन्य अगोदर काढून घ्यावीत व मग सार्वमत घ्यावे ही गोष्ट हिंदुस्थान सरकारला कबूल नाही. काश्मीरच्या रक्षणाकरता हिंदी सैन्य काश्मीरमध्ये ठेवण्यात आले आहे व ते तेथेच राहील. मतदानाच्या वेळी त्यांच्याकडून कोणतीही ढवळाढवळ होणार नाही एवढी खात्री मात्र आम्ही देऊ.

काश्मीर व जम्मू सरकारच्या देखरेखीखाली सार्वमताची जेवढी निःपक्षपाती सोय करता येईल तेवढी करू.

यानंतर १८ मार्च १९४८ रोजी चीनचे प्रतिनिधी अध्यक्ष असताना त्यांनी एक मसुदा सुचविला. या मसुद्याविषयी आपली प्रतिक्रिया मांडताना झाफरुल्ला खान म्हणाले आझाद काश्मीरच्या सरकारला हा मसुदा पटेल की नाही हे मला सांगता येत नाही व त्यांना जर तो पटला नाही तर ते सरकार शस्त्रे खाली ठेवणार नाहीत.

झाफरुल्लाखानांची ही प्रतिक्रिया म्हणजे आझाद काश्मीरला सुरक्ष मंडळाने मान्यता द्यावी असेच सुचविले होते. आझाद काश्मीर म्हणजे दुसरे तिसरे काही नसून टोळीवाल्यांनी तोडलेला उत्तरेकडचा लचका होय व तो लचका काश्मीरमधून बाहेरच निघालेला भाग आहे असे गृहीत धरून झाफरुल्लाखान आता बोलू लागले.

१८ मार्चच्या ठरावाचा मसुदा १७ एप्रिलला पुन: विचारात घेण्यात आला. त्यावर भाष्य करताना गोपालस्वामी अय्यंगार म्हणाले.

हिंदुस्तानने काश्मीरमध्ये चाललेल्या रक्तपाताचे रोमांचकारी वर्णन करून तो रक्तपात टाळण्यासाठी विनंति केली असता त्यांच्यावर सुरक्षा मंडळाने या चार महिन्यांत पाणी ओतून गारठून टाकण्यापलीकडे काही केले नाही. या चार महिन्यात रक्तपात सारखा चालू आहे व आर्थिक विनाशही जबर होत आहे. अशी परिस्थिती असता पाकिस्तानला दटावण्याऐवजी सुरक्षा मंडळ आपणच काही चूक केली आहे अशा रीतीने भाषा वापरत आहे ही लाजीरवाणी गोष्ट आहे."

त्यांनी याचवेळी सुरक्षामंडळाला सांगितले की, पाकिस्तान सरकारने आपले सैन्य साध्या पोशाखात आघाडीवर पाठविले आहे. त्यात १३०० लोक आहेत. काही नौशेरा भागात गेले आहेत व काही पूंचमध्ये गेले आहेत. पण या गोष्टीकडे सुरक्षा मंडळाने काही लक्ष दिले नाही.

१७ एप्रिलचा मसुदा २१ एप्रिलला सुरक्षा मंडळाने मान्य केला. परंतु त्या ठरावाला पाकिस्तान व हिंदुस्थान या दोघांनीही मान्यता न दिल्यामुळे तो ठराव तसाच बारगळला.

आणि याच सुमारास २० एप्रिलला पाकिस्तानचे सरसेनापती काश्मीरवर उघड उघड स्वारी करण्याची आपली योजना सरकारला सादर करीत होते.

ब्रिटिश व अमेरिकन प्रतिनिधींना हिंदुस्थानची बाजू कळली असूनही

आशियातील सत्ता-समतोल राखण्यासाठी त्यांनी झोपेचे सोंग घेतले व हिंदुस्थानला डोके वर काढू दिले नाही.

२२ एप्रिलचा ठराव बारगळला तरी सत्यशोधनासाठी त्यांनी एक सत्यशोधक मंडळ जुलै १९४८ मध्ये पाठविले. या मंडळात झेकोस्लोव्हाकियाचा प्रतिनिधी हिंदुस्थान सरकारच्या मताप्रमाणे, अर्जेंटिनाचा प्रतिनिधी पाकिस्तानच्या मताप्रमाणे व इतर तीन सुरक्षा मंडळाच्या सांगण्याप्रमाणे, बेल्जीयम, कोलंबिया व अमेरिका असे प्रतिनिधी नेमले गेले. या मंडळात एकंदर मताधिक्य पाकिस्तानच्या बाजूचे असलेले प्रतिनिधीच आढळून आले.

८ जुलैला ही मंडळी पाकिस्तानात आल्याबरोबर झाफरुल्लाखनांनी त्यांना सरळ सांगितले की, मेच्या मध्यापासून तीन ब्रिगेड सैन्य जम्मू व काश्मीरमध्ये लढत आहे. वायव्य सरहद्दीच्या गव्हर्नरांकडून त्यांना हे कळले की, टोळीवाल्यांनी पाकिस्तानच्या पंपावरून पेट्रोल घेतले व पाकिस्तानी ट्रक व रेल्वेचा उपयोग केला.

सत्यशोधक मंडळाने आपल्या अहवालात या गोष्टी नमूद करून दोन्ही राष्ट्रे जवळ जवळ लढाऊ पवित्र्यात उभी आहेत व टोळीवाल्यांना आझादीच्या मागे असलेले राजकीय पुढारी मदत करीत आहेत असा निष्कर्ष काढला.

अशा प्रकारे पाकिस्तान व हिंदुस्थान हे काश्मीरमध्ये लढाईच्या पवित्र्यात असलेले पाहून सत्यशोधक मंडळाने युद्धबंदीचा एक ठराव १३ ऑगस्ट १९४८ रोजी केला. तो ठराव पुढीलप्रमाणे होता :

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पाकिस्तान व हिंदुस्थान संबंधीच्या चौकशी मंडळाने दोन्ही राष्ट्रांच्या प्रतिनिधींची काश्मीर व जम्मूमधील परिस्थिती अजमावल्यावर व —

दोन्ही राष्ट्रांमधील शत्रुत्व तसेच चालू दिल्यास आंतरराष्ट्रीय

शांतता धोक्यात येईल व अशी शांतता लाभल्याशिवाय दोन्ही राष्ट्रातील तडजोड शक्य होणार नाही. म्हणून —

असा ठराव करण्यात येतो की, खालील सूचनांचा दोन्ही राष्ट्रांनी विचार करावा.

भाग १ ला

युद्धबंदीहुकूम

(अ) दोन्ही सरकारांनी ही सूचना स्वीकारल्यावर चार दिवसांत आपापल्या सैन्यांना आपापल्यापुरती युद्धबंदी अंमलात आणावी.

(ब) दोन्ही सरकारांकडील कोणत्याही प्रकारच्या फौजा दोघांनी जास्त वाढवू नयेत.

(क) दोन्ही बाजूंच्या सरसेनापतींनी काही स्थानिक बदल युद्धबंदीच्या दृष्टीने करणे जरुरीचे आहे की काय याबद्दल बोलणे करावे.

(ड) चौकशी मंडळ युद्धबंदीची अंमलबजावणी बरोबर होते की नाही हे पाहण्याकरता आपले निरीक्षक नेमील.

(ई) दोन्ही सरकारांनी पुढील वाटाघाटी सुकर करण्याकरता आपापल्या देशांत योग्य ते वातावरण तयार करावे.

भाग २ रा

तहनामा

युद्धबंदी झाल्याबरोबर तहाच्या अटी सविस्तरपणे ठरविल्या जातील. परंतु तो तहनामा ज्या कोणत्या तत्त्वावर आधारण्यात यावा ती तत्त्वे खालीलप्रमाणे आम्ही ठरवीत आहो.

अ

(१) सुरक्षामंडळापुढे भाषण करताना सांगितलेल्या वस्तुस्थितीविरुद्ध आता पाकिस्तानचे लष्कर जम्मू व काश्मीरच्या हद्दीत खडे

असलेले आढळून आले आहे. म्हणून पाकिस्तान ते आपले सैन्य त्या भागातून काढून घेण्यास संमती देत आहे.

(२) काश्मीरमध्ये जे काश्मीरचे नेहमीचे रहिवासी नाहीत व जे त्या देशात लढाईकरताच गेले आहेत असे पाकिस्तानी लोक व टोळीवाले त्या देशातून परत बोलाविण्यासाठी पाकिस्तानने पराकाष्ठेचे प्रयत्न करावेत.

(३) पाकिस्तानी फौजा निघून गेल्यावर जो प्रदेश मोकळा होईल त्याचा राज्यकारभार चौकशी मंडळाच्या नेतृत्वाखाली स्थानिक अधिकारी करतील.

(४) पाकिस्तानी फौजा व टोळीवाले हे जम्मू व काश्मीर भागातून निघून गेले आहेत असे जेव्हा चौकशी मंडळ हिंदुस्थानला कळवील त्या वेळी हिंदुस्थान सरकारही आपल्या फौजेतील मोठा भाग जम्मू-काश्मीरमधून काढून घेईल.

ब.

(२) युद्धबंदी रेषेच्या अलीकडे काश्मीरमधील भागात शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने हिंदी फौजांची जेवढी कुमक जरूर आहे असे चौकशी मंडळाच्या संमतीने हिंदुस्थान सरकार ठरवील तेवढी कुमक ठेवण्याची परवानगी हिंदुस्थान सरकारला मिळेल. चौकशी मंडळ आपले निरीक्षक जरुरीप्रमाणे या भागात ठेवील.

(३) काश्मीरमध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था नांदेल अशी खात्री काश्मीर सरकारकडून काश्मिरी जनतेला दिली जाईल अशी व्यवस्था हिंदुस्थान सरकार करील.

क

(१) दोन्ही राष्ट्रांच्या सह्या झाल्यावर वरील तहनाम्याची तत्त्वे जाहीर केली जातील.

भाग ३ रा

पाकिस्तान व हिंदुस्तान सरकारे असे खात्रीलायक पुन्हा म्हणतात की, काश्मीर व जम्मूचे पुढील स्थान ठरविण्याचे दृष्टीने लोकांच्या इच्छा समजून घेण्यात येतील व त्या दृष्टीने, तहनामा झाल्यावर, चौकशी मंडळाच्या साहाय्याने खुले इच्छा प्रदर्शन व्हावे म्हणून काय गोष्टी करावयास पाहिजेत ते ठरवील."

चौकशी मंडळाने ही जी तहनाम्याची तत्त्वे सांगितली त्याप्रमाणे लोकांची इच्छा कळेपर्यंत काश्मीर व जम्मचे राजकीय स्थान डळमळीत ठेवण्यात आले व हिंदुस्थान सरकारचा काश्मीरमधील अंमल मिळमिळीत स्वरूपाने का होईना मान्य करण्यात आला व पाकिस्तानचा काश्मीरवरील आक्रमणात भाग होता हे मान्य करण्यात आले. पण एवढ्याने टोळीवाल्यांचा बंदोबस्त कसा होणार व त्यांच्या अत्याचारांना पायबंद कसा बसणार ? तहनाम्याला काही ते पक्षकार नाहीत. याचवेळी आणखी एक तत्त्व या तहनाम्यात यावयास पाहिजे होते की, पाकिस्तानच्या प्रयत्नाने टोळीवाले मागे परतले नाहीत तर हिंदुस्थानने त्यांना पिटाळून लावावे व मग शांतपणे काश्मीरच्या भवितव्याचा विचार करावा. परंतु युद्धबंदी ही १३ ऑगस्ट १९४८ ला जेथे फौजा उभ्या होत्या तेथे झाली व त्यामुळे टोळीवाल्यांनी व्याप्त केलेला मुलुख त्यांचेकडेच राहिला व व तो अजूनही तसाच राहिला आहे व आता आपल्यापुढे जो काश्मीरचा नकाशा उभा राहातो तो युद्धबंदीच्या रेषेच्या अलीकडील जम्मु व काश्मीर मुलखाचा होय. उत्तरेकडचा भाग परकीय मुलख म्हणूनच ओळखला जातो आहे. आक्रमणाचा फायदा आहे तो असा आहे.

पं. जवाहरलाल व १३ ऑगस्टचा ठराव

१३ ऑगस्ट १९४८ रोजी जो तहनाम्याचा मसुदा दोन्ही देशांना सादर करण्यात आला त्याबाबत पं. जवाहरलालजींनी ता. २०-८-४८

रोजी पत्र पाठवून आपली प्रतिक्रिया प्रगट केली व चौकशी मंडळाच्या अध्यक्षांकडून काही बाबतींचा खुलासा करून घेतला. नव्या दिल्लीहून लिहिलेल्या आपल्या पत्रातील चौथ्या परिच्छेदात आपल्या मागण्या त्यानी समुच्चयाने पुढीलप्रमाणे मांडल्या.

भाग २ (३) मध्ये जे म्हटले आहे की, पाकिस्तानी फौजा निघून गेल्यावर जो प्रदेश मोकळा होईल त्याचा राज्यकारभार चौकशी मंडळाच्या नेतृत्वाखाली स्थानिक अधिकारी करतील याचा अर्थ या प्रदेशावर जम्मू व काश्मीरच्याच राज्याचे अधिपत्य राहील.

तसेच काश्मीरमधील हिंदी सैन्य केव्हां व कसे परत घ्यावयाचे या बाबतचा क्रम चौकशी मंडळाच्या सल्ल्याने ठरवायचा आहे व तो क्रम ठरविताना मुख्य गोष्ट जी नंजरेसमोर ठेवावयाची आहे ती म्हणजे काश्मीरचे टोळीवाल्यांकडून अगर पाकिस्तानकडून होणाऱ्या आक्रमणापासून संरक्षण हे होय.

तसेच सार्वमताने जे काश्मीरचे भवितव्य ठरणार आहे त्यात पाकिस्तानचा काहीही संबंध असता उपयोगी नाही.

" ज्या प्रदेशात हल्ली पाकिस्तानी फौजा शिरलेल्या आहेत तो सर्व काश्मीरचा भाग असाच याचा अर्थ करावयाचा आहे व त्या प्रदेशातील राज्यकारभार स्थानिक अधिकाऱ्यांनी व लोकांच्या मर्जीनुसार करावयाचा आहे." असा खुलासा २५ ऑगस्टच्या पत्राने चौकशीमंडळाच्या अध्यक्षांनी केला व बाकीच्या दोन्ही बाबीही बरोबर आहेत असा निर्वाळा दिला.

अशा प्रकारे चौकशी मंडळाकडून खुलासा झाल्यावरही पं. जवाहरलालजींनी आणखी एक पत्र २० ऑगस्टलाच लिहिले व हल्ली जो आझाद काश्मीर आहे तो सर्व भाग काश्मीरचाच आहे असे सुचविले परंतु त्याबाबत चौकशी मंडळाने पूर्ण खुलासा केला नाही.

परंतु त्यानंतर ता. २३ डिसेंबर रोजी हिंदुस्थान व ता. २५ डिसेंबर रोजी पाकिस्ताननें १३ ऑगस्टच्या ठरावाला काही पुरवणी तत्त्वांनीं

मान्यता दिली व ता. ५ जानेवारी १९४९ रोजी चौकशी मंडळाने आपला युद्धबंदीबाबतचा ठराव पास केला. या ठरावाने पुढील गोष्टी ठरल्या.

जम्मू व काश्मीरच्या सामीलनाम्याचा प्रश्न लोकमताचा कौल घेऊन ठरविण्यात येईल व हे लोकमत अजमावण्याकरता एक लोकमत–अधिकारी काश्मीर सरकारकडून नेमला जाईल व असे लोकमत संपूर्ण रीत्या स्वतंत्र व खुले वातावरणात होण्याचे दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील. अर्थात हे लोकमत अजमावण्यापूर्वी पाकिस्तान व व टोळीवाले सैनिक काश्मीरमधून निघून जातील व ते तसे गेले आहेत असा दाखला चौकशी मंडळाने दिल्यावरच सार्वजनिक मतदान घेतले जाईल व त्यासाठी विचारप्रसाराचे स्वातंत्र्य पूर्णपणे दिले जाईल. सर्व राजकीय कैदी मुक्त केले जातील व जे काश्मीरचे खरेखुरे रहिवासी नसतील अशा सर्वांना काश्मीरमधून बाहेर जावे लागेल.

अशा रीतीने १३ ऑगस्ट १९४८ च्या ठरावास पुस्ती देऊन ५ जानेवारी १९४९ चा ठराव पास झाला व तो दोन्ही देशांनी मान्य केला.

अशा प्रकारे शस्त्रसंधी पुरा झाल्यावर २९ जुलै १९४१ ला युद्धबंदी रेषा दोन्ही देशातील लष्करी प्रमुखांनी ठरविली व काश्मीरमधील चालू असलेली लढाई थंडावली व त्या मानाने संयुक्तराष्ट्रांपुढील काश्मीरचा प्रश्नही थंडावला.

युद्धबंदी रेषेनंतर

१३ ऑगस्ट १९४८ च्या ठराव मान्य केल्यावरही पाकिस्तानने आपले स्वतःचे सैन्य उत्तर काश्मीरमध्ये पाठविण्यास सुरवात केली. व जानेवारी १९४९ मध्ये उत्तर काश्मीरवर पाकिस्तानी सैन्याचा अंमल चालू झाला. तसेच आझाद काश्मीरच्या ३२ बटालियन्स म्हणजे जवळ जवळ १५ ते १६ हजार सैनिक शिकून तयार झाले. युद्धबंदी-

रेषेचा फायदा पाकिस्तानने आपली शिबंदी जास्त मजबूत करून घेण्यात उठविला व ही गोष्ट जर चौकशी मंडळाच्या लक्षात आगाऊच आली असती तर आपण तशी खास व्यवस्था १३ ऑगस्ट १९४८ च्या ठरावात केली असती अशी कबुली चौकशी मंडळाने आपल्या अहवालातील ३२५ व्या कलमात दिली. व शेवटी पाच लोकांचे चौकशी-मंडळ बरखास्त करून त्या जागी एखाद्या लवादाची नेमणूक करावी असे सुचविले व ही सूचना अमेरिका व इंग्लंड यांनी एकदम उचलून धरली. चौकशी मंडळाचा हा अहवाल सादर झाला त्यावेळी चौकशी मंडळाने हिंदुस्थानच्या सामीलीकरणाबाबत जे मत प्रकट केले ते विचारात घेण्याजोगे आहे. ते म्हणतात.

"काश्मीरच्या महाराजानीं सामीलनामा करून दिला व तो हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलनी स्वीकारला व म्हणून काश्मीर व जम्मू आपल्या ताब्यात आहे असे हिंदुस्थानचे म्हणणे आहे. हिंदुस्थान सरकारचा जम्मू-काश्मीरवरील कब्जा कायदेशीर आहे असे एकदा मानल्यावर टोळीवाल्यांनी काश्मीरवर जो हल्ला केला तो शत्रुपक्षीय ठरतो व पाकिस्तानच्या अधिपत्याखालील सैन्याचा काश्मीरमधील प्रवेश हा हिंदुस्थानवरील स्वारी ठरते. काश्मीरमध्ये हिंदुस्थानचे जे सैन्य आहे ते काश्मीरच्या रक्षणाकरता राहिले तर ते आपल्या पूर्ण हक्काने राहाते आहे व काश्मीरच्या परराष्ट्रीय राजकारणाची जबाबदारी साहजिकच त्यांच्यावर पडते व पाकिस्तानला काश्मीरमध्ये राहण्यास काही अधिकार उरत नाही व त्यांचे तेंथे काही स्थानही नाही."

"काश्मीरच्या सामीलनाम्यामुळें काश्मीरच्या संरक्षणाची जबाबदारी हिंदुस्थानवर पडते व त्यामुळे काश्मीरमधून दोन्ही देशांनी आपले सैन्य काढून घ्यावे असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा काश्मीरच्या संरक्षणाकरता हिंदुस्थानचे काही सैन्य राहिले पाहिजे या गोष्टीचाहि आपल्यास विचार करावा लागेल."

"उत्तर काश्मीरविषयी हिंदुस्थान जो आपला हक्क सांगत आहे तोही

या सामीलीकरणास धरूनच आहे. त्यामुळेच हिंदुस्थानचे किती सैन्य काश्मीरमध्ये राहावयास पाहिजे हा पाकिस्तानच्या विचाराचा प्रश्न उरत नाही हेही साहजिक आहे. पाकिस्तानने प्रथम आपले सैन्य काढून घ्यावे या गोष्टीचा त्या गोष्टीशी संबंध नाही व पाकिस्तानचा बेकायदा प्रवेश आहे हे त्यांचे म्हणणे सयुक्तिक आहे. आझाद सैन्य हे काश्मीरविरुद्ध बंडखोरी करणाऱ्यांचे आहे म्हणून ते बरखास्त केले पाहिजे. हे आंतरराष्ट्रीय तत्त्वास धरून आहे. काश्मीरमध्ये आपण हक्काने आहो व पाकिस्तानला तो दर्जा मिळणार नाही हे हिंदुस्तानचे म्हणणे आहे."

अशा प्रकारे हिंदुस्थानची भूमिका चौकशी मंडळाने जरी रास्त मानली तरी पाकिस्तानविरुद्ध कारवाई करण्यास ते धजावले नाहीत व त्यांनी वर लिहिल्याप्रमाणे लवादाचे नवे पिल्लु सोडून दिले. पण ते हिंदुस्थानने पूर्ण धुडकावले व इंग्लंड अमेरिकेची नाराजी आपल्यावर ओढवून घेतली. लवाद म्हणून अमेरिकेचे ॲडमिरल चेस्टर डब्ल्यू निमिटझ यांचे नाव सुचविण्यात आले होते.

शेवटी संयुक्त राष्ट्रसंघटनेने चौकशी मंडळाऐवजी सर ओवेन डिक्सन यांची आपला प्रतिनिधी म्हणून दोन्ही देशात काही समझोता होतो की काय हे पाहण्याकरता नियुक्ति केली. सर ओवेन डिक्सन हे ऑस्ट्रेलियन सुप्रीम कोर्टामधील न्यायाधीश होते. त्यांनी दोन्ही देशातील पंतप्रधानांच्या वेळोवेळी भेटी घेतल्या व शेवटी आपला अहवाल सादर केला त्या अहवालात ते म्हणतात.

" हिंदुस्थान सरकारचा प्रथम आग्रह असा आहे की, पाकस्तानने आक्रमण केले आहे ही गोष्ट प्रथम जाहीर करावी व मग बाकीच्या गोष्टींचा विचार करा परंतु असा ठराव संयुक्त राष्ट्र संघटनेने अद्याप-पर्यंत केलेला नाही व मी न्यायाधीश म्हणून तशी चौकशी केली नाही. पूर्वी काय घडले असेल ते घडले असेल पण मी एवढे म्हणेन की २० ऑक्टोबर १९४७ मध्ये काश्मीरमध्ये जी चढाई झाली ती आंतरराष्ट्रीय

कायद्याविरूद्ध होती व १९४८ च्या मे मध्ये पाकिस्तानचे जे सैन्य काश्मीरमध्ये घुसले तेही आंतरराष्ट्रीय कायद्याविरूद्ध होते; म्हणून पाकिस्तानने आपले सैन्य ठराविक वेळी काश्मीरमधून प्रथम काढून घ्यावे असे मी सुचविले व त्या ठरलेल्या वेळेच्या आत त्यानी तसे केल्यावर दोघानीही युद्धबंदी रेषेअलीकडील सैन्य कसे काढून घेता येईल हे ठरवावे. व त्यानंतर सार्वमत अजमावयाचा प्रयत्न करावा. यानंतर मी दोघाही पंतप्रधानाना सार्वत्रिक मतदानाच्या ऐवजी काही भागाचे मतदान सुचविले. पाकिस्तान पंतप्रधानानी ती सूचना एकदम फेटाळली परंतु हिंदुस्थानचे पंतप्रधान श्री. जवाहरलाल यांनी विचार करून कळवितो असे म्हटले. त्यांनी प्रादेशिक मत मोजणीबद्दल अशी योजना मांडली की सार्वमत घ्यावयाचेच झाल्यास ते फक्त काश्मीरच्या खोऱ्यामधील जनतेचेच घ्यावे व या भागात मुसाफरबादचा भाग यावा. तसेच जम्मूच्या युद्धबंदी रेषेच्या पूर्वेकडील भाग व लडाख हे हिंदुस्थानकडे रहावेत व युद्धबंदीरेषेच्या पश्चिमेकडील भाग व गिलगीट हे पाकिस्तानकडे रहावेत.

पंडित जवाहरलालांची ही योजना पाकिस्तानने धुडकावली व शेवटी सर ओवेन डिक्सन यानी दोघांमध्ये कोणताही समेट होत नाही असे जाहीर केले.

एवढे सगळे होईपर्यंत १९५१ साल उजाडले. १९४७ च्या ऑक्टोबर मधील आक्रमणाचा विचार करण्याकरता १ जानेवारी १९४८ मध्ये केलेल्या हिंदुस्थानच्या फिर्यादीतून युद्धबंदी रेषा तेवढी तयार झाली पण आक्रमकांचा बंदोबस्त काहीं न होता आक्रमकानी उत्तर काश्मीर मात्र व्यवस्थीत व्यापून त्यावर आझाद काश्मीर म्हणून अंमलही चालू केला.

दरम्यान हिंदुस्थानमध्येही काश्मीर विषयक घडामोडी होत होत्या. काश्मीरमध्ये घटना परिषद घेऊन त्यात काश्मीरचे भवितव्य ठरवावे असे ठरत होते. त्यानिमित्ताने ३० मार्च १९५१ रोजी सुरक्षा मंडळाने पुढील ठराव केला.

"अखिल जम्मू काश्मीर नॅशनल कॉन्फरन्सने एक ठराव करून काश्मीरचे भावतव्य ठरविण्याकरता घटना परिषद बोलविण्याचे ठरविले आहे ही गोष्ट लक्षात घेऊन, या कामासाठी ज्या निवडणूका होणार आहेत त्या एका विशिष्ट भागातूनच होणार आहेत." ही गोष्ट लक्षात घेऊन.

"घटना परिषदेचा विचार करणाऱ्या संबंधित सरकारना अशी आठवण देण्यात येत आहे की, काश्मीरचे अंतिम भवितव्य हे संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या देखरेखीखाली होणाऱ्या लोकशाही पद्धतीच्या सार्वमतानेच होणार आहे."

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या या ठरावावर पंडित जवाहरलालनी पत्रकार परिषदेत ११ जुन १९५१ मध्ये पत्रकारांना असे सांगितले की घटना परिषद ही कोणत्याहि दृष्टीने संयुक्त राष्ट्रसंघटनेमार्फत जे सार्वमत होईल त्याच्या आड येणार नाही.


संयुक्त राष्ट्रसंघटनेनें आपले आणखी एक प्रतीनिधी दोन्हीं राष्ट्रात काही समझोता होतो की काय हे पाहण्याकरता पाठविले. त्यांचे नांव डॉ. फ्रँक ग्रहम व त्यांनी १९५१ ते १९५३ पर्यंत या बाबतीत प्रयत्न केले. त्यांनीं या काळात एकंदर पाच अहवाल सुरक्षा मंडळाला सादर केले. त्यांनीं ७ सप्टेंबर १९५१ रोजी आपली १२ कलमी योजना दोन्ही देशांना सादर केली. त्यापैकी ८ मुद्दे दोघानाही पसंत पडले. परंतु सैन्य काढून घेण्याबाबत दोघांचें मतैक्य होऊ शकले नाही. व डॉ. ग्रॅहमना फक्त सैन्य माघारी घेण्याच्या प्रश्नाचाच फक्त विचार करावयाचा होता. त्यांनी आपल्या शेवटच्या अहवालात असे म्हटले की,

"चौकशी मंडळाने जे दोन ठराव केले त्याप्रमाणे हिंदुस्थानवर काश्मीरच्या रक्षणाची जास्त जबाबदारी आहे व त्या दृष्टीने शांततामय कारवाईची हिंदुस्थानची तयारी आहे."

परंतु एवढा सर्व अभिप्राय देऊनही त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सैनिक काश्मीरमध्ये आणण्याची सूचना केली व ती सूचना अमेरिकेच्या व इंग्लंडच्या दडपणाने केली असे म्हणण्यास हरकत नाही. ६ नोव्हेंबर १९५२ मध्ये इंग्लंडचे प्रतिनिधी सर ग्लॅडविन जेब यांनी भाषण करताना आतापर्यंतच्या काही निश्चित भूमिकांनाही बगल दिली व हिंदुस्थानचे लष्कर काश्मीरच्या रक्षणाकरता का होईना जास्त ठेवण्यास विरोध केला.

अशा प्रकारे पाकिस्तानने काश्मीरमध्ये तर आक्रमण केलेच पण काश्मीरच्या प्रश्नातही आस्ते कदम आक्रमण करून आपले आक्रमण आंतरराष्ट्रीय चावडीसमोर पचविले.

१९५२ नंतर काश्मीरचा प्रश्न सुरक्षा मंडळापुढे पाकिस्तानने १९५७ च्या जानेवारीत आणला. काश्मीरच्या जनतेने घटना परिषद बोलावून आपल्या राज्याचा कारभार लोकशाही पद्धतीने चालविण्याचा ठराव सुरक्षा मंडळाला पसंत पडला नाही. याच सभांमध्ये श्री. कृष्ण० मेनन यांनी आपले सडेतोड व एकसारखे अनेक तास भाषण केले व असे भाषण करताना एकदा तर त्यांना मूर्च्छाही आली. पण त्या कशाकडेच लक्ष न देता त्यांनी अमेरिका व इंग्लंड यांच्या पक्षपाती धोरणाचा खरपूस समाचार घेतला व पाकिस्तानने केलेल्या युद्धबंदी रेषेच्या भंगाबद्दल सुरक्षा मंडळातील अकरा राष्ट्रांनी पाकिस्तानला काय जाब विचारला असा सवाल टाकला. त्याला उत्तर फिरोजखान नून यांनी दिले व दोघांनीही आपली सैन्ये काढून घेऊन सार्वमत घ्यावे या मताचा आग्रह धरला व तो त्यांचा आग्रह रशियाखेरीज इतर सर्व राष्ट्रांनी मानला व २४ जानेवारी १९५७ मध्ये असा ठराव मांडला की, संयुक्तराष्ट्र संघटनेच्या देखरेखीखाली होणारे निःपक्षपाती सार्वमत हेच फक्त काश्मीरचा प्रश्न सोडवू शकेल व घटना परिषदेने बनविलेल्या घटनेने काश्मीरच्या सामीलीकरणाचा प्रश्न सुटणार नाही व संघटनेला तो निकाल मान्य होणार नाही.



ही रेषा आझाद काश्मीरची आहे.

रशियाची भूमिका

२४ जानेवारी १९५७ च्या ठरावाला रशियाने विरोध केला व सुरक्षा मंडळातील हिंदुस्थानची बाजू थोडी मजबूत झाली. इतकी वर्षे म्हणजे ९ वर्षे आपला प्रश्न जगाच्या वेशीवर आपण टांगला असता कोणीही आपल्या बाजूने बोलत नव्हता. अंतर्यामी मात्र त्यांना हिंदुस्थानच्या सच्चेपणाची खात्री पटली होती.

२४ जानेवारीनंतर पुनः एक ठराव २० फेब्रुवारी १९५७ मध्ये आणण्याचा प्रयत्न सुरक्षा मंडळाने केला. त्या वेळी रशियाने असे स्पष्ट मत मांडले की, काश्मीरच्या जनतेने आपण हिंदुस्थानचे एक अविभाज्य घटक आहोत असे म्हणून आपला प्रश्न केव्हाच सोडविला आहे. अशा परिस्थितीत सार्वमताचे तुणतुणे पुनः वाजवण्यात काहीच अर्थ नाही. तसेच संघटनेचे सैनिकही तेथे आणण्याचे प्रयोजन नाही. ठराव बाकीच्यांनी मंजूर केला परंतु रशियाने तो पुन्हा फेटाळला.

संयुक्तराष्ट्र संघटनेचे प्रतिनिधी जारिंग यांनी २९ ऑक्टोबर १९५७ मध्ये आपले निवेदन सभेपुढे मांडताना सांगितले की,

ताबडतोब अंमलबजावणी व्हावी म्हणून ज्या योजना आपण मांडतो त्यांची अंमलबजावणी तशी झाली नाही तर परिस्थितीमध्ये असे काही बदल घडून येतात की, त्यामुळे ती योजना रद्दबातल ठरते. काश्मीर-मध्ये सार्वमत घेण्याकरता जी अनुकूल परिस्थिती निर्माण व्हावयास पाहिजे होती ती सैन्य माघारी घेण्याच्या नकारामुळे झाली नाही व आता सार्वमताने काही ठरावयाऐवजी गोंधळच जास्त होणार आहे. अशा परिस्थितीत ठरावाची अंमलबजावणी किती झाली आहे हे पाहण्या-करता एखादा लवाद नेमल्यास चांगले होईल."

जारिंग हे स्वीडन देशाचे सभासद होते. तरी त्यांच्यावर इंग्लंड–अमेरिकेचा पगडा बसलाच व निर्भेळ मार्ग ते दाखवू शकले नाहीत.

त्यांचेनंतर ग्रॅहॅम यांची हिंदुस्थान व पाकिस्तानमध्ये संघटनेचे प्रतिनिधी म्हणून पुनः पाठवणी करण्यात आली. त्यांचीही गाडी पाकिस्तानने सैन्य काढून घेतले पाहिजे या अटीवरच अडली व त्यांनी आपली असमर्थता प्रकट केली.

१९६२ मध्ये हिंदुस्थानने गोव्यामध्ये पोलिस कारवाई करून तो आपले ताब्यात घेतला. तेव्हा पुन्हा एकदा काश्मीरचा प्रश्न सुरक्षा मंडळापुढे पाकिस्तानने मांडला. या वेळी पाकिस्तानतर्फे श्री. झाफरुल्लाखान हे पुन्हा प्रतिनिधी म्हणून आले. १९४७ मध्ये त्यांनीच आपल्या करामतीने काश्मीरची गाडी भलत्या रुळावर घातली व आताही तोच प्रयत्न चालू केला. परंतु पहिल्या खेपेची चलाखी आता चालू शकली नाही, परिस्थितीत या १५ वर्षांच्या काळात खूपच फरक पडला होता. त्यांनी खूप उलट्या सुलट्या कोलांट्या उड्या मारल्या परंतु आता त्याचा प्रभाव फारसा पडू शकला नाही. चौकशी मंडळाचे ठराव एकदा मान्य केल्यावर चढाई कोणी केली या मुद्याला आता फारसे महत्व राहत नाही असे सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनी पाकिस्तानच्या गळयात लष्कराचे घोंगडे अडकविले व असे दाखवून दिले की, चौकशी मंडळाच्या ठरावाप्रमाणे फौजा मागे घ्यायचे तर दूरच राहिले, परंतु पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये लष्करी तयारी जोरात चालू करण्यात आली. अमेरिकेच्या मदतीने जम्मू-काश्मीरच्या पश्चिम सरहद्दीवर नवीन लष्करी तळ उभारण्यात आले व त्या ठिकाणी चिलखती गाडयाच्या सैन्याच्या तळाचा मुक्काम टाकण्यात आला. काश्मीरमधील डोमेल गावी एक कॅन्टोन्मेंट स्थापण्यात आले. विमानतळ स्कार्डू, गिलगिट व अस्काईस या ठिकाणी नवीन तरी चालू केले किंवा असलेले जास्त वाढविले. दळणवळणाच्या सोयीसाठी सर्व ऋतूत चांगले राहणारे नवीन रस्ते व पूल बांधण्यात आले. या सर्व लष्करी तयारीचा परिणाम व्हावयाचा तोच झाला व पाकिस्तानच्या प्रतिनिधींनी आम्ही आक्रमक नाही ही भाषा सोडून नव्या चढाईची धमकी

उघड उघडपणे दिली. तसेच पाकिस्तानने चीनशी हातमिळवणी केल्या-मुळे काश्मीरच्या सरहद्दीवर आता दोन शत्रू — पाकिस्तान व चीन— निर्माण झाले. पाकिस्तानने आपण व्यापलेल्या काश्मीरच्या सरहद्दीचा चीनबरोबर सौदा केला.

पाकिस्तानच्या या वागणुकीने अमेरिकेबरोबर पाकिस्तानचे संबंध दुरावू लागले. सुरक्षा मंडळाने या काश्मीरप्रकरणी १९६२ पर्यंत २०० सभा घेतल्या पण त्या सर्व निरुपयोगी ठरल्या.

२२ जून १९६२ रोजी आयर्लंडने दोन्ही राष्ट्रांनी आपापसांत तडजोडीची बोलणी करावीत व त्यांना जी काही मदत लागेल ती संघटनेच्या सेक्रेटरी जनरलनी पुरवावी असा ठराव मांडला. पण त्यास रशियाने विरोध केला व कोणताही ठराव पास न करता सुरक्षा मंडळाची बैठक तहकुब झाली. काश्मीरच्या प्रश्नात कोणताही ठराव पास न करता तहकूब झालेली अशी सुरक्षा मंडळाची ही पहिलीच बैठक होय. श्री. कृष्ण मेनन यांनी १९५७ मध्ये जे ठासून भाषण केले तेव्हापासून देशोदेशींच्या प्रतिनिधींची मते बदलू लागली होती व पाकिस्तानच्या आक्रमक वृत्तीचा दाखला त्यांना पटू लागला होता.

१९६४ मध्ये हजरत बाल प्रकरणामधून काश्मीरचा प्रश्न सुरक्षा मंडळापुढे उपस्थित करण्याचा प्रयत्न पाकिस्तानने केला. या वेळी पाकिस्तानतर्फे श्री. भुट्टो हे प्रतिनिधी होते व हिंदुस्तानतर्फे बॅरिस्टर छगला हे प्रतिनिधी होते. त्यांनी आपल्या मुद्देसूद भाषणांनी सर्व राष्ट्रांना असे पटवून दिले की, पाकिस्तान सुरक्षा मंडळाचा उपयोग आपली जाहिरातबाजी करण्याकरता व हिंदुस्थानविरुद्ध गरळ ओकण्या-करता करीत आहे.

श्रीनगरमधील हजरतबाल मशिदीतून हजरत बाल चोरीला गेला. तो बाल म्हणजे महंमद पैगंबरचा केस असून या मशिदीत तो आज अनेक वर्षे जपून ठेवलेला होता. त्याची चोरी झाल्याची बातमी पसरल्याबरोबर साहजिकच काश्मीरमध्ये फार मोठी खळबळ उडाली. परंतु त्या चोरीशी

हिंदूंचा काही संबंध नव्हता. हिंदुस्थान सरकारच्या गुप्त पोलिसांनी शेवटी तो केस शोधून काढला व तो पुन्हा हजरत बाल मशिदीत ठेवण्यात आला. परंतु या सर्व प्रकरणाचा मोठा बाऊ करण्यात आला. व सुरक्षा मंडळाची बैठक घेण्यात आली. त्या बैठकीपुढे ५ फेब्रुवारी १९६४ मध्ये श्री. छगला यांनी भाषण करताना हिंदुस्थानात मुसलमानांवर बिलकुल अन्याय होत नाही असे ठासून सांगितले.

मुसलमानांच्या संख्येविषयी बोलताना ते म्हणाले, हिंदुस्थानात ५ कोटी मुसलमान आहेत व सर्व जगात हिंदुस्थान हे मुसलमानांच्या संख्येच्या दृष्टीने तिसरे राष्ट्र आहे. पहिले इंडोनेशिया, दुसरे पाकिस्तान व तिसरे हिंदुस्थान हे आहे.

सार्वमतवादाचे वैयर्थ

सार्वमताच्या प्रश्नाविषयी बोलताना ते म्हणाले, लोकांच्या इच्छा समजून घेण्याचा सार्वमत हा एकच लोकमान्य मार्ग नाही. ब्रिटिश सरकारने गेल्या वीस वर्षांत अनेक वसाहतींना स्वातंत्र्यदान केले. परंतु त्यासाठी केव्हाही सार्वमत अजमावले नाही. खुद्द हिंदुस्थानला कोणी विचारले नाही की स्वातंत्र्य त्या देशाला हवे का ? तसेच मुसलमानांना कोणी विचारले नाही की, पाकिस्तान पाहिजे का ? ब्रिटिश सरकारला असे वाटले की, काँग्रेस ही सर्व लोकांची प्रतिनिधी आहे व मुस्लीम लीग ही मुसलमानांची प्रतिनिधी आहे व त्यांच्या मागणीनुसार हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्यात आले व पाकिस्तान निर्माण करून फाळणी करण्यात आली. काश्मीरमध्येही तसेच घडले. काश्मीरच्या महाराजांच्या निर्णयाला नॅशनल कॉन्फरन्सने पाठिंबा दिला व काश्मीर हिंदुस्थानात सामील झाला. या सर्व घडामोडीत लोकमत अजमावण्याचा प्रश्नच कोठे उत्पन्न होतो ?

१९४९ मध्ये जेव्हा सार्वमताचा प्रश्न स्वीकारण्यात आला त्यावेळी काश्मीरमध्ये निवडणुका होतील असे वाटले नव्हते. परंतु त्यानंतर

आता तीन सार्वत्रिक निवडणुका झाल्या आहेत व त्यात वयात आलेल्या प्रत्येकास मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे व या निवडणुका हिंदुस्थानातच काश्मीरला सामील व्हावयाचे आहे ही घोषणा देऊनच झालेल्या आहेत. १९६२ मध्ये झालेली निवडणूक ही हिंदुस्थान सरकारच्या निवडणूक मंडळाच्या देखरेखीखाली झालेली आहे. अशा रीतीने लोकांच्या इच्छाच समजावून घ्यावयाचा प्रश्न असेल तर तो एकदा सोडून तीनदा आम्ही सोडवून दाखविला आहे. या निवडणुका जितक्या निर्भेळ व्हावयास पाहिजेत तितक्या झाल्या नाहीत असा आक्षेप पाकिस्तानकडून घेण्यात येतो. परंतु तो किती फोल आहे हे मँचेस्टर गॉर्डियनसारख्या ब्रिटिश वर्तमानपत्रांतील उताऱ्यावरून पटण्याजोगा आहे. त्या पत्रात म्हटले आहे की,

काश्मीरमधील निवडणुका संपल्या. जम्मूमध्ये नॅशनल कॉन्फरन्सच्या उमेदवारांबरोबर हिंदू प्रजापरिषदेने चांगला सामना दिला व नॅशनल कॉन्फरन्सने तरी सुद्धा दोनतृतियांश जागा जिंकल्या. ३२ जागा जरी बिनविरोध निवडून आल्या तरी ३९ जागा अत्यंत चुरशीची निवडणूक होऊन जिंकल्या गेल्या आहेत.

काश्मीरमध्ये सार्वमत घ्यावे असा आग्रह धरणाऱ्या पाकिस्तानमध्ये अजून साधी लोकशाहीही सुरू झालेली नाही.

श्री. छगला यांनी आपल्या भाषणात शेवटी सुरक्षा मंडळाच्या आतापर्यंतच्या वर्तणुकीचा आढावा घेतला व म्हटले, " मी स्पष्टपणे सांगतो की, सुरक्षा मंडळाने ज्या पद्धतीने काश्मीरचा प्रश्न हाताळला ती पद्धत हिंदुस्थानला अत्यंत दुःखदायक वाटते आहे. या सर्व कालावधीत सुरक्षा मंडळाने पाकिस्तान हा आक्रमक आहे असे एकदाही म्हटलेले नाही. मंडळापुढे आलेल्या महत्त्वाच्या प्रश्नाबाबत मंडळाकडून काहीच उत्तर मिळालेले नाही. मी आपल्यापुढे पुनः एकदा चार प्रश्न मांडतो व त्यांची उत्तरे सुरक्षा मंडळाने द्यावीत. (१) काश्मीरचा दोन

पंचमांश भाग पाकिस्तानने कसा व्यापला व कोणत्या अधिकाराने व्यापला ? (२) काश्मीरच्या कोणत्याही भागात राहण्याचा त्याला काही अधिकार आहे का ? (३) काश्मीरचा कोणताही भाग चीनला देण्याचा त्याला अधिकार आहे काय ? (४) पाकिस्तानने काश्मीर-मधून निघून जाण्याकरता मंडळाने काय उपाययोजना केली ? ”

श्री. छगला यांच्या प्रश्नांना मंडळाला काहीही उत्तर देता आले नाही व शेवटी सुरक्षा मंडळाची बैठक काहीही ठराव न करता व काहीही मतप्रदर्शन न करता बरखास्त झाली.

१९६५ चे पाकिस्तानचे आक्रमण

अशा प्रकारे सुरक्षा मंडळाकडून पाकिस्तानच्या आक्रमणाकडे एक-सारखा कानाडोळाच होत गेला व शेवटी ५ ऑगस्ट १९६५ रोजी उघड उघड पाकिस्तानी सैनिक साध्या पोषाखात काश्मीरची सरहद्द ओलांडून आत येऊ लागले. त्यांच्याकडे जे कागदपत्र मिळाले त्यावरून त्यांना हिंदी चलनाचा पुरवठा भरपूर करण्यात आला होता व त्यांना पूल उडविणे, पोलिस स्टेशन्स उध्वस्त करणे, पेट्रोल पंपांची नासधूस करणे व रस्ते बंद करणे अशी कामे सांगितली होती असे दिसून आले. त्यांना आणखी ज्या काही कामगिऱ्या करावयास सांगितल्या होत्या त्यांत श्रीनगरवर चाल करून जाऊन ते ताब्यात घेणे व राजकीय पुढाऱ्यांना ठार करणे, शाळा, इस्पितळे व देवळे यांना आगी लावून लोकांना घाबरवून टाकणे हीही कामे होती. रानावनात छपून यांपैकी काही सैनिक श्रीनगरच्या आसमंतात येऊन पोहोचले. श्रीनगर–लेह रस्त्याचे दळणवळण तोडण्यात आले. नौशेरा व पूंचच्या बाजूस युद्धबंदी रेषेच्या आत दहा मैलांवर या पाकिस्तानी सैनिकांची व आपल्या रक्षक पोलिसांची चकमक उडाली. या सर्व गोष्टी पाहिल्यावर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सरचिटणिसांनी ३ सप्टेंबर १९६५ ला युद्धबंदी रेषेचे दिवाळे वाजले अशी स्पष्ट ग्वाही सुरक्षा मंडळाला दिली. सरचिटणि-

त्यांनी आपल्या अहवालात असेही स्पष्ट नमूद केले की, पाकिस्तानी सरकार कोणतीही गोष्ट समजून घेण्याच्या मनस्थितीत नाही.

श्रीनगर–लेह मार्गाला धोका उत्पन्न झाल्यावर हिंदी सैन्याने पाकिस्तानी मोर्चे असलेला कारगील भाग मेमध्ये व्यापला. लडाखच्या संरक्षणा-करता त्याची अत्यंत जरूर होती. कारण त्या भागापैकी १४,५०० चौ. मैल भाग चीनने आगाऊच घेऊन टाकलेला होता. संयुक्तराष्ट्र संघटनेच्या सरचिटणिसांच्या सांगण्यावरून हिंदी सैन्य त्या भागातून परत घेण्यात आले. पण शेवटी पाकिस्तानने त्या मार्गावर हल्ला केलाच.

९ ऑगस्ट १९६५ रोजी सरचिटणिसांनी राष्ट्रसंघावरील पाकिस्तानच्या कायम प्रतिनिधीस आपल्या सरकारास युद्धबंदी रेषेचा भंग न करण्यास बजावण्यास सांगितले व हिंदुस्थानच्या प्रतिनिधीलाही सबुरीने घ्यावयास सांगितले. पाकिस्तानकडून काहीच आश्वासन सरचिटणिसांना मिळाले नाही. हिंदुस्थानने मात्र आपले सबुरीचे आश्वासन दिले व पाळलेही.

१ सप्टेंबर १९६५ रोजी आगाऊ युद्ध जाहीर न करता पाकिस्तानचे सैन्य युद्धबंदी रेषा ओलांडून काश्मीरमध्ये शिरले. काश्मीरमध्ये पाकिस्तानी सैन्याने ठिकठिकाणी आक्रमण केल्याची गोष्ट संयुक्तराष्ट्र-संघटनेचे जे युद्धबंदी रेषेवर निरीक्षक होते त्यांनी मान्य केले. १६ सप्टेंबरला संयुक्तराष्ट्र संघटनेच्या सरचिटणिसांनी पाकिस्तानी घुसखोरांनी मोठ्या प्रमाणावर सीमा रेषा ओलांडल्याचा अहवाल सादर केला. एवढे सगळे होऊनही सुरक्षा मंडळाची सभा ४ सप्टेंबर १९६५ रोजी भरली व त्यात जो ठराव पास झाला तो पुढीलप्रमाणे —

सुरक्षामंडळ,

३ सप्टेंबर १९६५ रोजी सरचिटणिसांनी सादर केलेला अहवाल ध्यानात घेऊन,

काश्मीरमधील युद्धबंदी रेषेच्या होत असलेल्या उल्लंघनाने चिंतित होऊन,

(१) पाकिस्तान व हिंदुस्थान या दोघांनाही असे आवाहन करते की, त्यांनी युद्धबंदीरेषा तावडतोब आखावी.

(२) दोन्ही राष्ट्रांनी आपापले सैन्य युद्धबंदी रेषेच्या आत ठेवून युद्धबंदी रेषा मानावी.

(३) संयुक्तराष्ट्र संघटनेचे जे युद्धनिरीक्षक आहेत त्यांच्याशी दोन्हीही राष्ट्रांनी सहकार्य करावे.

(४) या ठरावाची अंमलबजावणी कशी काय होते हे सरचिटणिसांनी तीन दिवसांत कळवावे अशी विनंती करीत आहे.

पाकिस्तानकडून होणाऱ्या स्वारीला निराळे वळण लावण्याकरता जेव्हा हिंदी सैन्याने लाहोर व सियालकोटकडे आपला मोर्चा वळविला तेव्हा मात्र इंग्लंडच्या मुख्य प्रधानांनी तावडतोब आपली नापसंती कळविली.

६ सप्टेंबरला सुरक्षा मंडळाची सभा पुनः भरली असता हिंदुस्थानचे प्रतिनिधी श्री. सी. एस. झा यांनी मंडळावर प्रश्नांची सरबत्ती केली. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच राहिले. त्यांनी प्रश्न विचारले : बेकायदा कृत्य करण्याकरता हजारो लष्करी लोक शेजारच्या राष्ट्रात पाठविणे हे समर्थनीय आहे का ? आपल्या संयुक्तराष्ट्र संघटनेच्या सनदेचा या गोष्टीने अवमान होत नाही काय ? शांततामय सहवासाच्या तत्त्वाचे हे सर्व विरुद्ध नाही का ? आणि ज्या वेळोवेळी आंतरराष्ट्रीय घोषणा केल्या त्या सर्वांच्या हे विरुद्ध नाही का ?

या प्रश्नांची सरळ उत्तरे कोणी न देता युद्ध थांबले पाहिजे एवढेच बोलत राहिले. पाकिस्तानने आक्रमण केले अशी भाषा करण्यास कोणी तयार झाला नाही व ६ सप्टेंबरला आणखी एक ठराव सुरक्षा मंडळान पुढीलप्रमाणे पास केला.

सुरक्षा मंडळ.

संघटनेच्या सरचिटणीसांनी ४ सप्टेंबरपासून घडलेल्या हकीकतीचा अहवाल लक्षांत घेऊन युद्धाचे क्षेत्र वाढल्याबद्दल चिंता प्रगट करून दोन्ही राष्टाना असे आवाहन करते की त्या दोघानी आपापसातील लढाया ताबडतोब थांबवून ५ ऑगस्ट १९६८ च्या वेळची जी परिस्थिती होती ती निर्माण करावी.

(२) सर चिटणीसाना अशी विनंती करते की, त्यानी या मंडळाच्या ४ सप्टेंबर व ६ सप्टेंबरच्या ठरावांची अंमलबजावणी दोन्ही राष्ट्रांकडून कशी काय होते हे ताबडतोब कळवावे व युद्धबंदी रेषेची जपणूक करावी.

(३) असे ठरविते की, हा प्रश्न कायम विचाराकरता विषयामध्ये ठेवावा व ज्या काही उपाययोजना करावयाच्या असतील त्या ताबडतोब ठरवाव्या.

हा ठराव पास केल्याबरोबर सुरक्षा मंडळाने सरचिटणिसांना ताबडतोब युद्धाच्या जागेवर पाठविले. त्यांचा अहवाल आल्यावरही मलेशियाच्या प्रतिनिधी खेरीज कोणीही पाकिस्तानला आक्रमण केल्याबद्दल दोष दिला नाही. शेवटी २० सप्टेंबर १९६५ रोजी पुढीलप्रमाणे ठराव केला :

सुरक्षा मंडळ —

पाकिस्तान व हिंदुस्थान सरकारशी विचारविनिमय करून सरचिटणिसांनी जो अहवाल सादर केला आहे त्याचा विचार करून,

४ व ६ सप्टेंबरच्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी सरचिटणिसांनी जे श्रम घेतले त्याबद्दल त्यांची प्रशंसा करून,

पाकिस्तान–हिंदुस्थानच्या प्रतिनिधींची भाषणे ऐकून,

युद्धबंदीविषयी दोन्ही देशांची भिन्न मते पाहून व युद्धबंदी अद्याप होत नाही याबद्दल चिंता व्यक्त करून,

काश्मीर व इतर बाबतींत दोन्ही देशांत शांततामय बोलणी व्हायची असतील तर युद्धबंदी ताबडतोब व्हावयास पाहिजे. याबाबतीत खात्री पटून,

ती अशी मागणी करते की २२ सप्टेंबर १९५५ रोजी सकाळी ७ वाजता, दोन्ही बाजूंनी युद्धबंदी झाली पाहिजे व दोन्ही देशांनी आपापली सैन्ये ५ ऑगस्ट १९६५ रोजी ज्या जागी असतील त्या ठिकाणी परत घेण्यासाठी हुकूम सोडले पाहिजेत.

(२) सरचिटणीसांना युद्धबंदीची पाहणी करण्याकरता योग्य ती मदत देण्याची विनंती करते.

(३) सगळया राज्यांना असे आवाहन करते की, त्यांनी परिस्थिती आणखी चिघळणार नाही याकडे लक्ष पुरवावे.

(४) दोन्ही देशांनी युद्धबंदी जाहीर केल्यावर दोन्ही देशांतील राजकीय मतभेदांचा विचार करण्याचे ठरविले.

(५) सरचिटणीसांना अशी विनंती करते की, त्यांनी या ठरावाची अंमलबजावणी जितकी करता येईल तितकी करावी व आपला अहवाल सादर करावा.

या ठरावांच्या वेळी हिंदुस्थानतर्फे श्री. छगला यांनीच प्रतिनिधित्व केले व त्यानी ठासून सांगितले की काश्मीर हा हिंदुस्थानचा अविभाज्य भाग आहे व त्याला तोडून बाजूला करण्याची भाषा कोणी करता उपयोगी नाही. तसेच आक्रमण करणाऱ्याला दोषी ठरवायला सुरक्षा मंडळाने का भ्यावे ? सुरक्षा मंडळाने असेच जर धोरण ठेवले तर त्याची उपयुक्तता नाहीशी होणार आहे.

२० सप्टेंबर नंतर २७ सप्टेंबर व ५ नोव्हेंबरला युद्धबंदी ताबडतोब करण्याविषयीचे ठराव जास्त जास्त कडक भाषेत होत गेले.

श्री. झेड्. ए. भुट्टो हे यावेळी पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री म्हणून पाकिस्तानच्या वतीने प्रतिनिधी होते. त्यांच्या बोलण्याची शेवटी हद्द झाली व हिंदुस्थानच्या प्रतिनिधीना 'हिंदी कुत्ते' म्हटले व आपली गाली-

प्रदानाची हौस भागवून घेतली व त्याचवेळी ते सर्व राष्ट्रांच्या मनातून उतरले. श्री. भुट्टो यांनी काश्मीरमधील व हिंदुस्थानातील अंतर्गत घडामोडींविषयी बोलण्यास सुरुवात केल्यावरोबर सरदार स्वर्णसिंगांनी सुरक्षा मंडळाला बजावले की आम्ही या ठिकाणीं युद्धबंदीविषयी व सैन्य परत घेण्याविषयी विचार करण्याकरता जमलो आहोत. इतर गोष्टींचा विचार करण्याचे हे स्थळ नव्हे. त्यावेळच्या अध्यक्षाना हे म्हणणे पटले व त्यांनी भुट्टो यांना मुद्याविषयी बोलण्यास चमकाविले.

शेवटी सुरक्षा मंडळाकडून काहीही उपाययोजना झाली नाही व १० जानेवारी १९६६ ला ताश्कंद करार होऊन दोन राष्ट्रांतील भांडणाचा शेवट होण्याची वेळ आली. संयुक्त राष्ट्रसंघटना व सुरक्षा मंडळ या कामी कुचकामी ठरले. रशियाने एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून दोन्ही देशांत मध्यस्थी केली व ताश्कंदचा करार घडवून आणला. संयुक्त राष्ट्रसंघटनेला काश्मीरचा प्रश्न १६–१७ वर्षांत सोडविता आला नाही ही खरोखरीच मोठी लाजीरवाणी गोष्ट आहे व त्याला कारण एकच व ते म्हणजे न्यायाचा तराजू त्यांना सारखा तोलता आला नाही. आगळिक करणाऱ्याची बाजू घेण्याचा त्यांनी अवास्तव खटाटोप केला व तो त्यांच्या अपयशास कारणीभूत झाला. हिंदुस्थानचे ब्रीदवाक्य ‘ सत्यमेव जयते ’ हे शेवटी प्रत्यक्षात आले पण त्याकरता हिंदुस्थानला किती अपमान गिळावे लागले, किती मनस्ताप करून घ्यावा लागला व संयुक्त राष्ट्र-संघटनेकडे जाण्यात आपण मूर्खपणा केला असे तोंडांत मारून घेऊन कबूल करावे लागले. या सर्व प्रकरणात ५ ऑगट १९६५ ही तारीख पुनः युद्धबंदीची झाली म्हणजे १९४७–४८ मध्ये पाकिस्तानने जे उत्तर काश्मीरचे आक्रमण केले ते कायमचे तसेच राहिले. तो देश पाकिस्तानने पचविला. पाकिस्तानने आता आझाद काश्मीरच्या सरकारची उचल-बांगडी करून तो प्रदेश आपल्या खास अधिपत्याखाली आणला व त्यासाठी काश्मीरचा एक मंत्रीही नेमला व कारभार आपल्याकडे घेतला. सुरक्षा समितीतील काश्मीरच्या प्रश्नाची अवस्था ही अशी आहे. ती

क्रमशः साद्यंत यथास्थित कळावी म्हणून या ठिकाणी मुद्दाम शक्य तितके ठराव, सामीलनाम्याची पत्रे, जशीच्या तशी दिली आहेत. त्यावरून वाचकांना एक गोष्ट कळून येईल की न्यायाधीश निःपक्षपाती व न्यायाची चाड बाळगणारा आहे अशी खात्री पटल्यावाचून न्यायदेवतेला कौल लावण्याच्या भानगडीत कोणी पडू नये. तसा प्रयत्न केल्यास न्याय मागणाराचीच गळचेपी होते. हिंदुस्थानने आंतरराष्ट्रीय शांततेचा आता कोणताही बाऊ करू नये. आपल्या शेजाऱ्यांबरोबरचे प्रश्न आपणच सामोपचाराने नाहीतर शस्त्रास्त्रानें मिटवावेत. द्रोणाचार्यांचे वर्णन करतात, त्याप्रमाणे शापादपि शरादपि आपली तयारी ठेवावयास पाहिजे व अभिमन्यूप्रमाणे राष्ट्रसंघाच्या चक्रव्यूहात आपणहून जाऊन अडकून पडू नये व आता राष्ट्रसंघटनेपुढे पाकिस्तानने कोणताही प्रश्न उपस्थित केल्यास आम्हास या संघटनेकडे काही म्हणणे मांडावयाचे नाही म्हणून बाजूला राहावे. संयुक्त राष्ट्र संघटना एकंदरीत दुबळी आहे. आक्रमणाला आक्रमणही म्हणू शकत नाही व त्यास मागेही हटवू शकत नाही. या संदर्भात अध्यात्मवादी एक गोष्ट सांगतात ती ध्यानात धरण्याजोगी आहे.

दोन वाटसरू वाटेने चालले होते. वाटेत एक दगडाची देवाची मूर्ति पडली होती. एक जो देवावर विश्वास ठेवणारा नव्हता त्याने त्या मूर्तिला पाय लावून बाजूस सारले व तो आपल्या रस्त्याने निघून गेला. दुसरा जो भाविक होता त्याने ती मूर्ति उचलली. पुसली. साफसूफ केली व तिची पूजा केली पण एकदा त्या पूजेत त्याचेकडून त्या मूर्तिला धक्का लागून ती पडली. त्याबरोबर देवाचा कोप त्या भाविकावर झाला. भाविकाने देवाला विचारले, तुम्हाला त्या निरीश्वरवाद्याने लाथेने ठोकरले. तेव्हा तुम्ही त्याला काही केले नाही. मी तर तुमची चांगली पूजा करतो मग तुम्ही माझ्यावर का कोपला ? देवांनी उत्तर दिले जो मला मानीत नाही त्याचा विचार करण्याची मला जरुरी वाटली नाही. तू मला मानतोस म्हणून मला तुझ्यावर अधिकार बजवावा सारखा वाटतो भित्यापाठीमागे

ब्रह्मराक्षस म्हणतात ते असे. सुरक्षा मंडळाला आता एकदा सांगून टाकावे की तुमच्याकडे आता आम्हांला काही मागावयाचे नाही. आमचे आम्ही एकमेकांना पुरे आहोत. हिंदुस्थानने आता एकदा समारंभ पूर्वक हिंदुस्थानातूनच सुरक्षा मंडळाकडे ज्या प्रमाणे तार पाठवून आपली फिर्याद गुदरली तशीच तार पाठवून साभार ती फिर्याद काढून घ्यावी व पाकिस्तानने पुनः कुरापत काढल्यास आपल्या आपणच त्याचा समाचार घ्यावा. पाकिस्तानची लढाईची खुमखुम अद्याप जिरली नाही. हिंदुस्थाननेही आता स्वसंरक्षणाचा कायदा एवढा एकच कायदा नीट समजून घ्यावा व पाकिस्तानचा समाचार रणांगणावरच घ्यावा. आंतरराष्ट्रीय कायद्याचा जो कांही भंग अशा कृत्याने होत असेल तो होऊ द्यावा. आपले सार्वभौमत्व एवढे तरी आपण प्रस्थापित करून दाखवू या.

कायदा हा मानणाऱ्यासाठी असतो. कायद्याचा व कराराचा मान दोन्ही पक्षांनी ठेवावयाचा असतो. जशास तसे हेच तत्त्व भिन्न संस्कृतींच्या युद्धात ठेवावे लागते. श्रीकृष्णाचे चरित्र त्या दृष्टीने राज्यकर्त्यांनी डोळ्यासमोर ठेवावे लागते. जिजस ख्राइस्टसारखे क्रूसावर चढुन काही साधत नाही. त्याला महंमदारखी तलवार घेऊनच दुष्टाचे निर्दालन करावे लागते पाकिस्तानची नीतिमत्ता आपल्यास कळून चुकली. त्यांना खऱ्या खोट्याची बिलकूल चाड नाही. अशांशी वागताना आपणही श्रीकृष्णनीतीचा अवलंब करून आपल्या राष्ट्राचा झेंडा उंच फडकवत ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. संयुक्तराष्ट्र संघटने युद्धबंदीच्या रेषा निरीक्षकांना सन्मानपूर्वक निरोप दिला पाहिजे व उत्तर काश्मीर पुनः आपल्यात विलीन तरी करून घेतला पाहिजे नाही तर आहे त्याच काश्मीरमध्ये समाधान मानून त्याबाबत कोणास काही ब्रही काढू देता उपयोगी नाही. श्री. छगलांनी सांगितल्याप्रमाणे काश्मीर हा हिंदुस्थानचाच आहे याच भूमिकेवरून जी काही बोलणी करावयाची असतील ती केली पाहिजेत. आता त्यात माघार उपयोगी नाही. सार्वमत व लोकमत हे झूट आहे व त्याचा विचार करण्याचे काही कारण नाही ही ठाम भूमिका घेतली तरच संयुक्त

राष्ट्रसंघटनेसारख्या संघटनेत आपला निभाव लागणार आहे. शेवटी ताश्कंदच्या कराराचा मसुदा काय आहे तो समजून घेऊन काश्मीरच्या प्रश्नाची सांगता करावयाची आहे.

ताश्कंद करार

हिंदुस्थानचे पंतप्रधान व पाकिस्ताचे अध्यक्ष हे ताश्कंदमध्ये एकमेकांना भेटले व त्यांनी सद्यःस्थितीची चर्चा केल्यावर ते असे जाहीर करतात की, त्यांना दोन्ही देशांत शांतता प्रस्थापित करण्याची इच्छा आहें व देशातील व्यवहार नेहमीप्रमाणे सुरळीत चालविण्याची इच्छा आहे. तसेच दोन्ही देशातील लोकांत मैत्रींचे संबंध वाढावेत व दोघांनाही समंजसपणा प्राप्त व्हावा असे निश्चित वाटत आहे. पाकिस्तान व हिंदुस्थानातील ६० कोटी लोकांच्या कल्याणाकरता या गोष्टीची गरज आहे, असे त्यांना वाटत आहे.

१

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सनदेप्रमाणे दोन्ही देशांत मैत्रीचे चांगले संबंध प्रस्थावित होण्याच्या दृष्टीने दोघेहीजण झटतील. राष्ट्रसंघटनेच्या सनदेनुसार लष्करी सामर्थ्यांचा ते वापर करणार नाहीत व त्या दोघांमधील तंटे शांततेच्या मार्गाने सोडवतील. दोन्ही देशांत तणातणीचे वातावरण ठेवून दोन्ही राष्ट्रातील कोणाचेच भले होण्याजोगे नाही. वरील दृष्टी लक्षात ठेवून दोघांनीही काश्मीरच्या प्रश्नाची चर्चा केली व दोघांनीही आपापली बाजू मांडली.

२

२५ फेब्रुवारी १९६६ पूर्वी दोन्ही देशांनी ५ ऑगस्ट १९६५ पूर्वी जशी परिस्थिती होती तशी निर्माण करण्याच्या दृष्टीने आपापली सैन्ये परत घ्यावीत व दोघांनीही शस्त्रसंधी रेषेचे पालन करावे.

३

एकमेकांच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करावयाची नाहीं.

४

एकमेकांविरुद्ध एकमेकानी खोडसाळ प्रचार कारवयाचा नाहीं. दोन्ही देशांचे मैत्रीचे संबंध वृद्धिंगत होतील असे दोघांनीही वर्तन करावे.

५

हिंदुस्थानचे हायकमिशनर व पाकिस्तानचे हायकमिशनर यानी पुनः आपापल्या जागी रुजू व्हावे व नेहमीची राजकीय स्वरूपाची कामे चालू करावीत. राजकीय व्यवहाराबाबतचे १९६१ व्हिएन्ना कन्व्हेन्शनचे पालन दोघानी करावे.

६

आर्थिक, व्यापारी, दळणवळण व सांस्कृतिकबाबी बाबतचे व्यवहार पूर्वीप्रमाणे चालू करण्याबद्दल काय इलाज करता येतील याचा विचार दोन्ही राष्ट्रांनी करावा व सध्या जे कररमदार दोघांमध्ये झाले असतील ते अंमलात आणावेत.

७

युद्धकैद्यांची अदलाबदल करण्याबाबत दोघांनीही आपापल्या अधिकाऱ्यांना हुकूम द्यावेत.

८

निर्वासित व बेकायदा वसाहत करणाऱ्यांच्या प्रश्नांचा विचार दोघांनी करावा व दोन्ही देशातून लोक बाहेर जाणार नाहीत याबद्दल उपाययोजना करावी व युद्धामध्ये ताब्यात घेतलेल्या एकमेकांच्या वस्तू एकमेकांना परत करण्याबाबत वाटाघाटी कराव्यात.

९

दोन्ही देशांनी हितसंबंध सुचविणाऱ्या बाबींपुरत्या बैठकी घेतल्या जातील व निरनिराळया अधिकाऱ्यांच्या खास संघटना याबाबत विचार-विनिमय करून आपापल्या सरकारांना काय उपाय योजावेत हे कळवीत जातील.

रशियाचे पुढारी व रशियन सरकार व मंत्रीमंडळाचे अध्यक्ष या सर्वांचे हे दोन्ही देश त्यांनी केलेल्या मध्यस्थीबद्दल आभारी आहेत. कारण त्यामुळे समाधानकारक निर्णय घेतले गेले आहेत. उझबेकिस्तानच्या लोकांनी दोन्ही राष्ट्रांचे जे स्वागत व पाहुणचार केला त्याबद्दल अंत:करणपूर्वक दोघेही आभारी आहेत.

या जाहीर घोषणेवर साक्ष घालण्याकरता ते रशियाच्या मंत्रीमंडळाच्या अध्यक्षांना विनंति करीत आहेत.

हिंदुस्थानचे मुख्य प्रधान — पाकिस्तानचे अध्यक्ष

लालबहादुरशास्त्री — महंमद अयूबखान


ताश्कंद, १० जानेवारी १९६६.

ताश्कंदच्या घोषणेने दोन्ही राष्ट्रांतील वादाचा शेवट कागदोपत्री आंतरराष्ट्रीय संघटनेच्या दृष्टीने झाला. दोघांनीही आपले वाद आपापसात मिटवायचे व सलोख्याने राहावयाचे कबूल केले. काश्मीर प्रश्नावर फक्त आपापली बाजू मांडली. निर्णय काहीच घेतला नाही. त्यामुळे काश्मीरचा प्रश्न केव्हाही सुरक्षा मंडळापुढे आणण्याची संधी दोन्ही राष्ट्रांना राहिली आहे. पाकिस्तान अद्यापही कुठे काही खुट्ट झाले की, सुरक्षा मंडळापुढे प्रश्न उपस्थित करण्याची धमकी देत आहे. हे सर्व टाळावयाचे असेल तर वर विवेचन केल्याप्रमाणे काश्मीरमधील घडामोडी या हिंदुस्थानच्या अंतर्गत स्वरूपाच्या बाबी आहेत व आमच्यावर कोणी आक्रमण केल्यास त्याची दाद आमची आम्ही लावून घेऊ असे सांगून हिंदुस्थानने आपले हात काश्मीरची आपली फिर्याद काढून घेऊन झटकून टाकले पाहिजेत. उत्तर काश्मीर जर काश्मीरी लोकांना आपल्यात यावयास पाहिजे असेल तर पाकिस्तानला निर्वाणीचा खलिता पाठवून लष्करी मोहीम चालू करून काश्मीरचा सामावेश करून घेतला पाहिजे. हल्लीच्या काश्मीरी सरकारला अगर जनतेला त्याची गरज नसल्यास तो

नाद सोडून द्यावा व आहे या काश्मीरमध्येच आपले समाधान करून घ्यावे.

सुरक्षा मंडळात यापुढे या प्रश्नाबद्दल विशेष यश येईल असे वाटत नाही.





काश्मीर मध्ये काय घडत होते

श्रीनगरमधील शंकर टेकडी

गेल्या प्रकरणात आपण काश्मीरचा प्रश्न संयुक्तराष्ट्र संघटनेपुढे कसा कसा येत गेला हे कालक्रमानुसार पाहिले. आता त्याच कालावधीत काश्मीर, हिंदुस्थान व पाकिस्तान या तिन्ही ठिकाणी काय काय घटना घडत होत्या हे पाहावयाचे आहे.

काश्मीरच्या संस्थानात तेथील प्रजाजनांची चळवळ संस्थानातील राज्यकारभार लोकनियुक्त प्रतिनिधींच्यामार्फत चालावा म्हणून चालू होती. सर्व हिंदुस्थानातच पं. जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय संस्थानिक प्रजा मंडळ स्थापन झाले होते व त्याच्याच धोरणाने काश्मिरातही १९३२ पासून चळवळ चालू झाली. शेख अब्दुल्लांकडे या चळवळीचे नेतृत्व होते व त्या परिषदेचे नाव प्रथम अखिल जम्मू व काश्मीर मुस्लीम परिषद असे होते. परंतु तेच नाव बदलून १९३९ मध्ये 'नॅशनल कॉन्फरन्स' म्हणजे 'राष्ट्रीय समिती' असे नाव ठेवण्यात आले व या समितीतर्फे १९४६ मध्ये छोडो काश्मीरची चळवळ सुरू झाली. काहींच्या मते या चळवळीला हिंसक वळण लागल्यामुळे काश्मीरच्या महाराजांनी शेख अब्दुल्ला यांना तुरुंगात टाकले. ते सहन न होऊन पं. नेहरू हे स्वतःच काश्मिरात जाण्यास निघाले. परंतु त्यांना काश्मीरच्या सीमेवर अटक करण्यात आली व त्यांना तीन दिवस अटकेत राहावे लागले. परंतु महात्मा गांधींनी त्यांना बोलवून घेतल्यामुळे ते हिंदुस्थानात परत गेले व मग त्यांच्यावरील बंदी काश्मीरच्या महाराजांनी उठवली. त्यानंतर ते तुरुंगात शेख अब्दुल्लांना भेटलेही. शेख अब्दुल्लां-वर रीतसर खटला भरण्यात आला. व त्यांना तीन वर्षांची तुरुंगवासाची सजा देण्यात आली व राष्ट्रीय समितीवरही बंदी घालण्यात आली. ती १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत चालू होती.

लोकांच्या चळवळीचा परिणाम महाराजांवर होत होता व त्यांनी १९३४ मध्येच एक ४६ कलमी जाहीरनामा काढला व लोकांच्या सहकार्याने राज्यकारभार चालविण्याचा आपला मनोदय प्रकट केला. १९३९ मध्ये त्यांनी काश्मीरच्या घटनेचा एक कायदा प्रसिद्ध केला व त्याप्रमाणे संस्थानचा राज्यकारभार चालू होता. परंतु १९४६ मध्ये छोडो काश्मीरची चळवळ सुरू झाली व ती दडपण्याचे काम काश्मीरचे त्या वेळचे मुख्य प्रधान श्री. रामचंद्र काक यांनी सुरू केले व वर सांगितल्याप्रमाणे शेख अब्दुल्लांना तीन वर्षांची सजा दिली. त्यामुळे श्री.

रामचंद्र काक यांचे विरुद्ध बरीच ओरड झाली. व महाराजांनी त्यांना बदलून श्री. महाजन यांना मुख्य प्रधान नेमले. त्यांनी उदार धोरण दाखवून शेख अब्दुल्लांना सोडून दिले व त्यांनीही महाराजांना नजराणा देऊन त्यांच्यावरील निष्ठा व्यक्त केली व काश्मीरचे सामिलीकरण ता. २६-१०-४७ रोजी करताना शेख अब्दुल्लांच्या मदतीने राज्यकारभार करण्याचे आपले धोरण असल्याचे हिंदुस्थान सरकारला कळविले.

काश्मीरवरील स्वारीने लोकांच्या मनात देशभक्तीचे वारे उत्पन्न झाले व त्यांनी पुनः एकदा लोकनिर्णित राज्याची मागणी जोराने चालू केली. लोकांच्या मागणीस मान देऊन महाराजांनी ५-३-४८ रोजी एक जाहीरनामा प्रसिद्ध केला व तात्पुरत्या सरकारच्या जागी कायमचे लोकांचे मंत्रिमंडळ स्थापून लोकशाही स्वरूपाचे गणराज्य चालू केले. ही घोषणा करण्यापूर्वी काश्मीर संस्थानातर्फे हिंदी घटना समितीवर चार प्रतिनिधी पाठविण्यात आले होते.

२०-६-४९ ला महाराजांनी लोकशाही गणराज्याची अंतिम घोषणा केली व आपल्या जागी युवराज करणसिंग बहादूर हे प्रकृती अस्वास्थ्या-मुळे होणाऱ्या आपल्या गैरहजेरीत काम पाहतील, असेही जाहीर केले.

करणसिंगांनी आपल्या हातांत राज्याची सूत्रे घेतल्याबरोबर जी प्रथम घोषणा केली ती म्हणजे भारताची जी राज्यघटना पुढे तयार होणार आहे त्या घटनेअन्वये हिंदुस्थान व काश्मीरचे संबंध ठरविले जातील ही होय. युवराज करणसिंगांना ही जी घोषणा करावी लागली त्याचे कारण म्हणजे काश्मीरचा जो सामीलनामा झाला होता तो १९३९ च्या राज्यकारभाराच्या कायद्यावर आधारून झाला होता व त्यात बदल केल्या-खेरीज हिंदुस्थानची राज्यघटना त्यांच्यावर बंधनकारक होणार नव्हती. या घोषणेने हिंदी संघराज्याचा काश्मीर हा अविभाज्य भाग आहे हे निनादून सांगण्यात आले.

हिंदुस्थानच्या राज्यघटनेत काश्मीरची खास सोय

हिंदुस्थानची राज्यघटना २६ जानेवारी १९५० मध्ये अंमलात आली व त्यात काश्मीरसाठी खास ३७० हे कलम घालण्यात आले. इतर संस्थानांप्रमाणे जरी काश्मीरची गणना ब वर्गात करण्यात आली तरी घटनेची काश्मीरला लागू अशी दोनच कलमे होती व ती म्हणजे कलम १ व ३७०. या ३७० कलमामुळे काश्मीरबाबत कायदे करण्याचा अधिकार संसदेला मिळाला नाही. परंतु २६–१–५० रोजी राष्ट्रपतींनी एक हुकूम काढून संघ यादीतील ३९ बाबी काश्मीरला लागू केल्या. हिंदी घटना समितीतील विचारविनिमयाप्रमाणे काश्मीरला स्वतंत्र सदर–इ रियासत, स्वतंत्र न्यायालय व स्वतंत्र ध्वज देण्यात आला व काश्मीर हे जगू काही स्वतंत्र सार्वभौम राज्य आहे असे मानण्यात आले व त्याचमुळे आपण जे १९५० पासून सर्व हिंदुस्थानकरता कायदे केले त्या प्रत्येक कायद्यात जम्मू व काश्मीरला वगळले आहे. या विशेष स्थानाचा परिणाम असा झाला की, काश्मीरमधील लोकांना मूलभूत हक्क मिळू शकत नव्हते व तेथील भारतीयांना सरकारच्या परवान्याशिवाय काश्मीरमध्ये प्रवेश मिळत नव्हता. काश्मीरसाठी एक स्वतंत्र घटना समिती तयार करण्यात आली व तिच्यामार्फत तेथील घटना स्वतंत्र करण्यात आली.

सन १९५१ मध्ये काश्मीरच्या या घटना समितीची निवडणूक झाली. काश्मीरच्या घटना समितीच्या सदस्यांची संख्या ७५ होती व त्यासाठी शेख अब्दुल्लांच्या पक्षाने ७५ उमेदवार उभे केले. त्यांच्या-विरुद्ध प्रजापरिषद पक्षाने ५९ उमेदवार उभे केले. परंतु त्यातील ४४ उमेदवारांचे अर्जच नाकारण्यात आले. शेख अब्दुल्लांच्या सरकारच्या या धोरणाने प्रजापरिषदेने निवडणुकांवर बहिष्कार टाकला व साहजिकच शेख अब्दुल्ला यांचे सर्वच्या सर्व उमेदवार निवडून आले.

१९५१ च्या दुसऱ्या सहामाहीत शेख अब्दुल्लांनी महाराज हरि-सिंगांना गादी सोडावयास लावली व युवराज करणसिंग यांची सदर–इ–

रियासत म्हणून नेमणूक केली. १९५२ च्या जुलैमध्ये हिंदुस्थान सरकार व काश्मीर यांच्यामध्ये एक करार झाला. त्या कराराचे स्वरूप काश्मीरचे मुख्य प्रधान शेख अब्दुल्ला यांनी ११ ऑगस्ट १९५२ रोजी काश्मीरच्या घटना परिषदेला सादर केले. त्यात मुख्यतः पुढील गोष्टींचा समावेश होता.

(१) शेष अधिकार : इतर संस्थानांच्या बाबतीत शेष अधिकार मध्यवर्ती सरकारकडे आहेत तर काश्मीरच्या बाबतीत ते काश्मीरकडेच ठेवले आहेत व मध्यवर्ती सरकारला जादा अधिकार द्यावयाचे की नाहीत ते काश्मीरमधील जनताच परिषदेमार्फत ठरवील.

(२) काश्मीर व जम्मूच्या नागरिकांना भारतीय नागरिकत्व मिळेल.

(३) हिंदी राज्यघटनेतील मूलभूत हक्क सर्वच्या सर्व काश्मिरी जनतेला मिळणार नाहीत. त्यात काही बाबतींत संकोच करावा लागेल. जमिनीबाबत द्यावयाची नुकसान भरपाई व कसणाऱ्यास जमीन इत्यादी जी काही मूलभूत तत्त्वे या परिषदेने मान्य केली आहेत त्यांस बाध न येता मूलभूत हक्कांची मांडणी करावी लागेल.

(४) हिंदुस्थानचे सुप्रीम कोर्ट हेच काश्मीरचेही सुप्रीम कोर्ट राहील.

(५) हिंदुस्थानचे जे राष्ट्रीय निशाण आहे तेच काश्मीरचेही राहील व काश्मीरची निष्ठा त्याच निशाणाशी राहील. फक्त काश्मीर संस्थानच्या परंपरेला अनुसरून त्याचे एक निराळे निशाण राहील.

(६) हिंदुस्थानच्या राष्ट्रपतींना कैद्यांना द्यावयाच्या शिक्षेची माफी वगैरे देण्याचा अधिकार राहील.

(७) काश्मीरचे आधिपत्य राष्ट्रपती पसंत करतील त्या व्यक्तीकडे राहील. त्यासाठी राज्याच्या विधिमंडळाची शिफारस ध्यानात घेतली जाईल.

(८) आर्थिक प्रश्नाबाबत दूरगामी योजना आखणे जरूर असल्याचे उभयपक्षी मान्य करण्यात आले.

(९) आणीबाणीची तरतूद हिंदी राज्यघटनेतील अनुच्छेद ३५२ नुसार करण्याचे उभयतांनी मान्य केले. मात्र अंतर्गत अव्यवस्थेमुळे राष्ट्रपतींना कायदेमंडळ बरखास्त करून राष्ट्रपतींची राजवट चालू करण्याचे जे अधिकार अनुच्छेद ३५६ ते ३६० मुळे प्राप्त होतात त्यांची अंमलबजावणी केलीच पाहिजे असा आग्रह हिंदुस्थान सरकारनी धरला नाही. बाकीच्या ३५३ ते ३५६ पर्यंतच्या तरतुदींचा विचार पुढे करण्याचे ठरले.

भारतीय राज्यघटनेतील संसदेच्या निवडणुकांचा अनुच्छेद ३२४ काश्मीरला लागू आहेच.

अशा प्रकारे काश्मीरचे जनता-सरकार व हिंदुस्थानचे मध्यवर्ती सरकार यांच्यामध्ये करार झाला व काश्मीरचा राज्यकारभार लोकमतानुवर्ती स्वरूपात सुरू झाला.

डॉ. शामाप्रसाद मुकर्जी यांचा काश्मीरात अंत

काश्मीरची राज्यघटना कशी असावी यावर डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी सारख्या पुढाऱ्यांचे दुमत होते. काश्मीर हा हिंदुस्थानचा अविभाज्य भाग आहे व त्याचे झालेले सामीलीकरण हे अपरिवर्तनीय आहे असे मत त्यानी २८ मार्च १८५१ मध्येच व्यक्त केले होते, १० ऑगस्ट १९५१ रोजी केलेल्या भाषणात त्यानी काश्मीरची फिर्याद संयुक्तराष्ट्र-संघटनेमधून काढून घ्यावी असे मत प्रगट केले होते. श्री. छगला यानी सुरक्षामंडळापुढे १९६४ मध्ये सार्वमताबद्दल जी विचारसरणी मांडली तीच विचारसरणी श्री. श्यामाप्रसाद मुकर्जींनी १० ऑगस्ट १९५१ रोजी मांडली होती व त्यानी त्यावेळी असा स्पष्ट सवाल टाकला होता की, काश्मीरची राज्यघटनाच काश्मीरचे भवितव्य ठरवील असे आपण जगाला स्पष्ट का सांगू नये ? काश्मीरच्या राज्यघटनेने जे आपल्याला स्वतंत्र स्थान

मिळवून घेतलेले आहे ते कितपत योग्य आहे? गणराज्यांतर्गत गणराज्य ही कितपत योग्य गोष्ट आहे? सार्वभौमत्वाची आपण अशी वाटणी करून घेणे कितपत योग्य आहे? शेख अब्दुल्लाना काश्मीरला सार्वभौमत्व द्यावयाचे आहे व आम्हाला त्या कल्पनेशी झगडा द्यावयाचा आहे. शेख अब्दुल्लांच्या मताप्रमाणे जर वागलो तर काश्मीर आपल्या हातातून कायमचा गेला असे समजा. काश्मीरला स्वतंत्र घटनेची व स्वतंत्र दर्जाची काही जरूरी नाही. काश्मीर हा पूर्णपणे हिंदुस्थानातच विलीन झाला पाहिजे त्यातच काश्मीरी लोकांचे हित आहे हे त्यांना आपण पटवून दिले पाहिजे. डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जींनी याप्रमाणे आपले विचार २६ जून १९५२ रोजी प्रगट केले व शेवटी जेव्हा शेख अब्दुल्लांच्या विचारसरणी प्रमाणे काश्मीरला स्वतंत्र स्थान देण्यात आले व काश्मीरमध्ये प्रवेश करावयाचा झाला तरी परवान्याची जरूरी लागू लागली. तेव्हा डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जींनी जनसंघातर्फे आंदोलन सुरू केले व काश्मीर हा अविभाज्य भाग आहे हे पटवून देण्याकरता त्यानी परवानगी न घेता काश्मीरच्या हद्दीत प्रवेश केला. डॉ. श्यामाप्रसादानी परवान्याशिवाय प्रवेश केला म्हणून त्याना शेख अब्दुल्लांच्या सरकारने अटक केली. गुरुदत्त नावाच्या लेखकाने मनोगत नावाच्या मासिकाच्या १९६७ च्या दिवाळी अंकात डॉ. श्यामाप्रसादांच्या अटकेबाबत व त्यांच्या गूढ मृत्युबाबत एक लेख हिंदीत लिहिला आहे. त्या लेखात त्यांचे म्हणणे असे आहे की, परवान्याची पद्धत ही हिंदुस्थान सरकारची होती. अर्थात परवान्याचा भंग करून जर कोणी काश्मीरमध्ये गेला तर त्याला हिंदुस्थान सरकारच्या पोलिसानी अटक केली पाहिजे. परंतु श्यामाप्रसाद व त्यांच्या बरोबरच्या दोन साथीदारानी परवान्यास विरोध करून प्रवेश केला म्हणून अटक मात्र काश्मीरच्या पोलिसानी केली व त्यांना पकडून काश्मीरमध्ये तुरुंगांत आणून ठेविले. काश्मीरच्या पोलिसानी ही जी अटक केली ती गैर कायदा होती म्हणून डॉक्टर श्यामाप्रसाद यानी काश्मीरच्या हाय-कोर्टामध्ये हेबिअस कार्पसचा म्हणजे बंदीवान हजर करण्याचा आदेश देण्यासाठी राज्यघटनेतील अनुच्छेद २२६ अन्वये अर्ज केला. त्या अर्जाची

सुनावणी सुरू झाली. सरकारी वकिलाना डॉक्टरांची अटक कोणत्या कायद्याअन्वये झाली हे सांगता येईना व त्यानी आपले भाषण त्याच दिवशी संपविले असते तर डॉक्टर श्यामाप्रसादांची मुक्तता त्याच दिवशी झाली असती परंतु सरकारी वकिलानी एक दिवस मागून घेतला व त्याच रात्री डॉक्टर श्यामाप्रसाद प्लुरसीच्या विकाराने कालवश झाले. तुरुंगात चिकित्सा बरोबर करण्यात आली नाही व त्यांना दिलेली औषधे बरोबर नव्हती असे पुष्कळांचे मत आहे. त्यांच्या मृत्यूचे गूढ अद्याप उकलले नाही.

श्री. गुरुदत्तांच्या लेखातील हकीकत खरी असो वा नसो एक गोष्ट खरी की, डॉ. श्यामाप्रसाद याना शेख अब्दुल्लांच्या कारकीर्दीत अटक झाली व त्याना मृत्यू जो आला तो तुरुंगवासात ता. २३ जून १९५३ ला आला. ही जी घटना घडली त्यामुळे शेख अब्दुल्लांचे विरुद्ध बरेच वादळ उठले.

शेख अब्दुल्लांच्या सरशीचा व सद्दीचा जोर संपला व सदर–इ–रियासत यांनी शेख अब्दुल्लांना ८ ऑगस्ट १९५३ रोजी अटक केली.

बक्षी गुलाम महंमद यांची कारकीर्द

शेख अब्दुल्लांच्या नंतर बक्षी गुलाम महंमद यांची काश्मीरचे मुख्य प्रधान म्हणून नेमणूक झाली. शेख अब्दुल्ला यांच्यावर अमेरिकन वकील श्री. जी. व्ही. ॲलन यांच्याबरोबर कट केल्याचा आरोप होता. श्री. शेख अब्दुल्लांना अटक झाल्यावर त्याचे पडसाद संसदेत उमटले. त्याला उत्तर देताना पं. नेहरू म्हणाले, शेख यांची अटक ही काश्मीर राज्यातील अंतर्गत बाब आहे. त्याच्याशी मध्यवर्ती सरकारला काहीही कर्तव्य नाही. पाच वर्षांनी शेख अब्दुल्लांवर खटला भरण्यात आला. त्यावेळी त्यांचेवर पाकिस्तानशी कट रचल्याचा आरोप ठेवण्यात आला. इकडे घटना समितीत काश्मीरच्या सामिलीकरणास मान्यता देण्यात आली व २४ जुलै १९५२ ला जो करार झाला त्यालाही संमती

देण्यात आली. अशा रीतीने लोकांची लोकशाही मार्गाने जी संमती सामीलनाम्यास मिळावयास पाहिजे होती ती मिळाली.

काश्मीरच्या सामीलीकरणातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा १९५४ साली घेतला गेला. ६ फेब्रुवारी १९५४ रोजी काश्मीरच्या घटना परिषदेने काश्मीरचा सामीलनामा हा परत न घेता येण्याजोगा सामीलनामा आहे व तो कायम झाला असे शिक्कामोर्तब केले. त्याचवेळी आपल्या राष्ट्रपतींनी राज्यसरकारच्या सल्ल्याने एक हुकूम १९५४ चा म्हणून १९ मे १९५४ रोजी काढला व त्यामुळे राज्यघटनेतील सर्वच्या सर्व संघसूची काश्मीरला लागू करण्यात आली. पूर्वी फक्त संरक्षण, परदेशी राजकारण व दळणवळण एवढेच विषय संघराज्याकडे होते. या नवीन हुकमामुळे इतर राज्यांप्रमाणे काश्मीर हे एक संघराज्यातील राज्य झाले. फरक एवढाच राहिला की काश्मीरला आपल्यापुरती स्वतंत्र घटना करण्याचा जादा अधिकार राहिला. लोकसभेवर जे प्रतिनिधी काश्मीरमधून पाठविले जायचे ते राष्ट्रपतींनी राज्यसरकारच्या शिफारशीने नेमावयाचे. हिंदी राज्यघटनेतील निवडणूकांचा भाग काश्मीरला लागू व्हायचा नव्हता.

काश्मीरच्या घटना समितीचे काम १७ नोव्हेंबर १९५६ रोजी पुरे झाले व ती घटना २६ जानेवारी १९५७ पासून अंमलातही आली. या राज्यघटनेत काश्मीरमधील कायम रहिवासी कोणाला म्हणावे याची जी व्याख्या केली आहे त्याप्रमाणे हिंदुस्थानातील ज्या कोणा नागरिकास काश्मीरचे कायम रहिवासी व्हावयाचे असेल त्याने १४ मे १९५४ रोजी राज्याचे रहिवासी असले पाहिजे किंवा काश्मीरमध्ये त्यापूर्वी स्थावर मिळकत १० वर्षे तरी त्याने घेतलेली असली पाहिजे. भारतीय राज्यघटनेप्रमाणे जे मूलभूत हक्क आहेत ते काश्मीरच्या कायम रहिवाशाना प्राप्त झाले आहेत. काश्मीरच्या या घटनेमुळे आता काश्मीर हे हिंदुस्थानचे एक राज्य झाले आहे व ते कोणालाही तोडून देण्याचे वेळी घटनेतील संबंधित तरतुदींचा विचार करावा लागेल. बेरुबारीच्या

खटल्यात (२ सुप्रीम कोर्ट रिपोर्टर २५०) या ठिकाणी या सर्व संबंधीत तरतुदींचा विचार करण्यात आला आहे.

घटना परिषदेचे कामकाज याप्रमाणे चालले असताना बक्षी गुलाम महंमदांविषयी बराच असंतोष पसरू लागला होता. अशोक मेहता यांचेवर दिवसाढवळया हल्ला करण्यात आला होता व त्यावरून चर्चा करताना आचार्य कृपलानी म्हणाले की, काश्मीरमध्ये एकतंत्री राज्य-कारभार चालू झाला आहे.

काश्मीरच्या राज्यघटनेतील महत्त्वाचा भाग.

१ काश्मीर व जम्मू राज्य हे भारताचा एक अविभाज्य भाग म्हणून राहील (अनु. ३)

(२) १५ ऑगस्ट १९४७ रोजी काश्मीरचा जो भाग काश्मीरच्या महाराजांच्या आधिपत्याखाली होता तो तो सर्व भाग जम्मू व काश्मीर असा समजला जाईल (अनु. ४)

(३) विधिमंडळातील सभासदांची संख्या १०० असेल. (अनु. ४७)

(४) पाकिस्तानव्याप्त काश्मीर प्रदेशातील लोकांकरता २५ जागा रिकाम्या ठेवण्यात आल्या आहेत. (अनु. ४८)

घटना समितीचे काम संपल्यावर त्यानी ठरविल्याप्रमाणे विधिमंड-ळाच्या निवडणूका लगेच १९५७ मध्ये झाल्या व त्यानंतरच्या निवडणुका १९६२ मध्ये झाल्या.

घटनात्मक दृष्टीने यापुढची महत्त्वाची घटना म्हणजे १९६५ मध्ये राष्ट्रपतींनी भारतीय राज्यघटना लागू करण्याबाबत हुकूम काढला व तो हुकूम १७ मे १९६५ रोजी निघाला. त्यानंतर दुसरा हुकूम २४ नोव्हेंबर १९६५ मध्ये काढला. हे हुकूम काढून काश्मीर हे एक हिंदुस्थानमधील इतर राज्यांप्रमाणे राज्य झाले व साहजीकच पाकिस्तानच्या नाकाला

यामुळे मिरच्या झोंबल्या. १९६४ मध्येच काश्मीरमध्ये या घटनात्मक घडामोडी होत असताना पाकिस्तानने सुरक्षा मंडळापुढे हा प्रश्न काढला व त्यावेळी भारताचे प्रतिनिधी श्री. छगला यानी स्पष्ट शब्दांत सुरक्षा मंडळाला बजावले की, काश्मीर व भारत यांतील जे घटनात्मक संबंध आहेत त्यांची चर्चा करण्याचा अधिकार सुरक्षा मंडळाला नाही. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेप्रमाणेच ही बाब वगळलेली आहे. तथापि त्यानी खुलासा केला की, घटनेत काही नाममात्र फरक करण्यात आले आहेत. सदर–इ–रियासत हे नांव बदलून आता राज्यपाल हे नाव राज्याच्या प्रमुखाला देण्यात आले आहे. तसेच प्रधानमंत्री म्हणून पूर्वी काश्मीरच्या मुख्य मंत्र्यांना म्हणत त्याचेऐवजी मुख्य मंत्री असे म्हणू लागले आहेत. तसेच हिंदुस्थानच्या संसदेवर पूर्वी काश्मीरमधील प्रतिनिधी राज्यसरकारच्या शिफारशीने राष्ट्रपती नियुक्त करीत असत त्याऐवजी लोकांतूनच निवडून असे प्रतिनिधी संसदेवर जाणार आहेत. यात तक्रार करण्याजोगी कोणती गोष्ट आहे ?

१९६४ सालामध्ये अनेक महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या. काश्मीरमध्ये जाण्यास पूर्वी परवाना लागत असे तो आता रद्द झाला. दळणवळणाची सर्व साधने सुरळीत चालू झाली. काश्मीरचे हिशेब तपासण्याचे अधिकार भारत सरकारच्या मुख्य तपासनिसास देण्यात आले. काश्मीरच्या सुधारणांच्या योजना हिंदुस्थानातील योजनासमितीकडे आल्या व राष्ट्रपतींनी एक वटहुकूम काढून कायदे करण्याचे अधिकार आपल्याकडे घेतले. १९६५ मध्ये काश्मीर हिंदुस्थानात आले. घटनात्मक दृष्टया साध्या सामीलनाम्यापासून, निराळे राज्य राहण्यापासून, हिंदुस्थानचे इतर राज्यांप्रमाणे साधे राज्य बनविण्यापर्यंत मजल मारली व आता काश्मीर हा भारतीय राज्यघटनेप्रमाणे हिंदुस्थानचा भाग झाला. त्यात बदल व्हावयाचा झाला तर घटनेनेच होईल. ही सर्व मजल बक्षी गुलाम महंमद यांच्या भारतानुकूल धोरणाने घडून आली. परंतु त्यांचा राज्याकारभार वशिलेबाजी व लाचलुचपत यांनी भरलेला

होता असा त्यांच्यावर आरोप करण्यात येऊन खुद्द त्यांनीही स्वतःची मालमत्ता भरपूर केली असा त्यांच्यावर वैयक्तिक आरोपही करण्यात आला व त्यासाठी एक चौकशी मंडळ नेमण्यात आले. त्यांनी त्यांचे- वरील बरेचसे आरोप निराधार ठरविले व काही शाबीत ठरविले. १९६४ मध्ये हजरत बाल चोरीचे प्रकरण झाले व त्या प्रकरणी मोठमोठ्या मिरवणुका निघाल्या. त्यांचा रोख प्रामुख्याने बक्षी गुलाम महंमद यांच्याविरुद्धच होता. या ज्या मिरवणुका, मोर्चे निघाले ते फक्त मुसलमानांचेच नव्हते तर त्यांत शीख व हिंदूही सामील झाले होते. काश्मीरचे भारतात संपूर्ण विलिनीकरण करण्याबाबत जरी बक्षी गुलाम महंमद हे अभिनंदनास पात्र असले तरी लाचलुचपतीच्या राज्य- कारभाराबद्दल व वैयक्तिक स्वार्थ पाहिल्याबद्दल त्यांना दोषीच ठरवावे लागेल. राज्यकर्ते निस्पृह, निःस्वार्थी व निर्लोभी असले पाहिजेत. लोकशाहीत राज्यकर्ते सवंग असल्यामुळे ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. घटनात्मक घटनांचा आपण कालक्रम पाहिला. आता काश्मीर- मधील इतर घटना पाहू.

काश्मीरमधील इतर महत्त्वपूर्ण घटना

काश्मीरने १९४७ पासून १९६१ पर्यंत आपली प्रगती कशी केली हे श्री. छगला यांनी आपल्या ४ फेब्रुवारी १९६४ च्या सुरक्षा मंडळा- पुढील भाषणात पुढीलप्रमाणे दाखविले : १९४७ मध्ये संस्थानचे उत्पन्न ५५ लाख डॉलर्स होते तर १९५९-६० मध्ये तेच उत्पन्न २० कोटी ३५ लाख डॉलर्स होते. १९५०-५१ मध्ये दरडोई उत्पन्न ३८ डॉलर्स होते तर १९५९-६० मध्ये तेच उत्पन्न ४८ डॉलर्स झाले. १९५१ मध्ये अन्नधान्याचे उत्पन्न ३ लाख टन होते, तर १९६१ मध्ये ते ५ लाख टन झाले. १९५१ मध्ये वीज ४३६० किलोवॅट होती, ती १९६० मध्ये १६००० किलोवॅट झाली. कारखान्यांची संख्या १९४७- ४८ मध्ये ४४ होती, ती १९६१ पर्यंत १३८ वर गेली. रस्ते १९५१

मध्ये दर शंभर चौ. मैलांस अडीच मैल होते, ते १९६१ साली ४० मैल झाले. १९५१ मध्ये प्रवाशांची संख्या २७२०७ होती, तर १९६१ मध्ये तीच संख्या ७१,००० झाली आहे. प्राथमिक शाळेत १९५७ पूर्वी ६५००० विद्यार्थी होते तेच १९६१ मध्ये १,९७,००० झाले. हायस्कुलांची संख्या १९४७–४८ साली ५२ होती, ती १९६१ मध्ये २६२ झाली. १९४७ मध्ये शेकडा ६·६ एवढेच साक्षर होते, तर १९६१ मध्ये ती संख्या १२ टक्के झाली. १९४७–४८ साली इस्पितळांची संख्या फक्त ८९ होती तीच १९६१ मध्ये ३४९ झाली. १९५१ मध्ये सरासरी वयोमर्यादा ३२ होती, ती १९६१ मध्ये ४७ झाली. १९६७–६८ मध्ये अंदाजी उत्पन्न ४६ कोटी ९३ लाख रुपये होते.

काश्मीरबाबत ठाम धोरण कसे होत गेले ?

काश्मीरमधील सार्वमताचे लोढणे गळयात अडकवून घेऊन पं. जवाहरलाल नेहरू सुरुवातीपासून काश्मीर प्रश्न हाताळीत होते. त्याला थोडे निराळे वळण प्रथम पं. गोविंद वल्लभ पंत — हिंदुस्थानचे त्या वेळचे गृहमंत्री — यांनी ७ जुलै १९५५ मध्ये श्रीनगरमध्ये केलेल्या भाषणाने दिले. ते म्हणाले, " काश्मीरच्या लोकांनी आपल्या निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या द्वारा काश्मीरचे सामीलीकरण ही वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे. आता त्यात कोणताही बदल शक्य नाही. पं. पंतांनी वार्ताहरांना दिलेल्या मुलाखतीत असे स्पष्ट केले की, " आझाद काश्मीरमधील लोकांनी आता आपले मत प्रकट करावे. काळाच्या ओघात आता इतक्या गोष्टी घडल्या आहेत की, आता आमच्या पूर्वीच्याच मताला चिकटून राहणे शक्य नाही. "

काळाच्या ओघातली एक गोष्ट म्हणजे या सुमारास झालेला अमेरिका–पाक शस्त्रपुरवठा करार. अमेरिकेने पाकला शस्त्रे पुरविण्याचा करार केल्याबरोबर हिंदुस्थान व पाकिस्तानमधील समतोलाला धक्का बसला व हिंदुस्थानची काश्मीरबाबतची विचारसरणी ठाम होऊ लागली. पं. जवाहरलालनींही पं. पंतांची विचारसरणी उचलून धरली.

बक्षी गुलाम महंमद — काश्मीरचे मुख्यप्रधान — यांनीही २४ ऑगस्ट १९५५ रोजी जे भाषण केले त्यात सार्वमताच्या प्रश्नाला पार गाडून टाकले व असे सार्वमत कल्पांतापर्यंतही होणार नाही असे जाहीर केलें. याच वर्षात रशियाचे पंतप्रधान व रशियन कम्युनिस्ट पार्टीचे सेक्रेटरी श्री. बुल्गानीन व क्रुश्चेव्ह हे हिंदुस्थानात आले होते. त्यावेळी १० डिसेंबर १९५५ मध्ये श्रीनगरमध्ये त्यांच्या स्वागतसमारंभाच्या वेळीं त्यांनी असे जाहीर केले की, "काश्मीरच्या लोकांनी काश्मीर हा हिंदुस्थानच्या गणराज्याचा एक भाग आहे हे केव्हाच ठरवून टाकले आहे."

पाकिस्तानमध्येही या सर्व काळात घडामोडी होतच होत्या. पाकिस्तानने आपल्यासारखी परराष्ट्रीय राजकारणात अलिप्तता स्वीकारली नाही. त्याने जमेल त्याच्याशी जमेल त्या पद्धतीने लष्करी करार केले व लष्करी संघटनांत ते सामील झाले. शस्त्रमदतीसाठी पहिला करार त्याने अमेरिकेशी केला. नंतर त्याने 'सीएटो' या संघटनेचे सभासदत्व स्वीकारले. व बगदाद करारातही ते सामील झाले. आता तर ते चीनशीही हातमिळवणी करीत आहे. त्यांच्याकडेही १९५८ पासून राजकारणास नवीन वळण लागले. १९५८ मध्ये प्रेसिडेंट अयूबखान अध्यक्षपदी आले व तेव्हापासून लष्करी सत्तेच्या स्वरूपाची सत्ता पाकिस्तानात नांदू लागली. पाकिस्तानात श्री. भुट्टो हे परराष्ट्रमंत्री म्हणून आले व तेव्हापासून त्यांनी काश्मीरचा प्रश्न उपस्थित करण्याचे प्रयत्न चालू केले. परंतु श्री. छगला यांनी काश्मीरबाबतची ठाम भूमिका मांडली व सार्वमताची आता गरजच राहात नाही असे निक्षून सांगितले. अशा प्रकारे सार्वमताचे जोखड आता भिरकावून दिले गेले आहे व काश्मीरविषयी स्वतंत्र चर्चा करण्याचा प्रश्न शिल्लक राहात नाही.

शेख अब्दुल्लांविषयी फारसा विचार करण्याचे कारण उरले नाही व त्यांनीही सुरुवातीपासून काश्मीरचे सामिलीकरण मान्य केले आहे.

१९५३ मध्ये त्यांना अटक करण्यात आली आणि ६ जानेवारी १९५८ रोजी सोडण्यात आले. परंतु पुन्हा दोन–तीन महिन्यांतच त्यांना २९ एप्रिल १९५८ रोजी अटक करण्यात आली आणि त्यांचेवर व आणखी पंचवीस जणांवर काश्मीरचे प्रस्थापित सरकार उलथून पाडण्याचा व पाकिस्तानात ते सामील करण्याचा प्रयत्न केल्याचा व युद्धाची तयारी करण्याचा असे आरोप ठेवण्यात आले. आणि या सर्व खटल्यांच्या कामास ९ सप्टेंबर १९६२ मध्ये सुरुवात झाली. परंतु शेवटी कोणताही खटला शेवटपर्यंत न चालता त्यांना सोडून देण्यात आले. या मुक्ततेच्या काळात ते अनेक परदेशांना भेटीही देऊन आले. पुन्हा हिंदुस्थानात आल्यावर त्यांना प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याखाली अटक करून ठेवले व हल्ली ते मोकळे आहेत.

त्यानी १०, ऑक्टोबर १९६८ मध्ये काश्मीरमध्ये सर्व जनता परिषद बोलावली व त्याचे उद्घाटक श्री. जयप्रकाश नारायण हे होते. त्यांनी यापूर्वी २७ एप्रिल १९६४ रोजी हिंदुस्थान टाइम्समध्ये लेख लिहून असे प्रतिपादिले होते की, काश्मीरचा प्रश्न अद्याप अनिर्णीत आहे. काश्मीरमधील निवडणुकांनी तो प्रश्न निर्णीत झालेला नाही. कारण त्या निवडणुका शेख अब्दुल्लांना अटकेत ठेवल्यावर झाल्या होत्या. जय-प्रकाशजींच्या या विचारसरणीमुळेच शेख अब्दुल्लांनी आपल्या या जनता परिषदेचे उद्घाटक म्हणून त्यांना बोलाविले होते व ते स्वतः अध्यक्ष झाले होते. श्री. जयप्रकाश नारायणांनी या उद्घटनाच्या भाषणात सर्वांना धक्का दिला. त्यांनी या प्रश्नाचा विचार करताना असे स्पष्ट केले की, हिंदी संघराज्याच्या कक्षेत काश्मीर प्रश्नावर तोड काढावी. उद्घाटकांचे हे भाषण अध्यक्ष शेख अब्दुल्ला यांना पसंत पडले नाही. त्यांनी आपल्या भाषणात अशी सूचना केली की, काश्मीर प्रश्नांत तडजोड शोधून काढण्यासाठी भारत, पाकिस्तान आणि जम्मू-काश्मीर प्रांत यांच्या प्रतिनिधींची गोलमेज परिषद भरवावी. एखाद्या मध्यस्थामार्फत या सर्व प्रतिनिधींना एकत्र बोलाविले पाहिजे. संयुक्त राष्ट्रसंघटनेने हमी

दिलेले स्वातंत्र्य काश्मीरला देण्याची एक योजना त्यांनी मांडली. काश्मीरचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ' करेंगे या मरेंगे 'ची घोषणा त्यांनी त्याचवेळी भरलेल्या जाहीर सभेत केली. अशा प्रकारे काश्मीरचे सामिलीकरण पूर्ण मान्य करण्याच्या भूमिकेपासून घसरत शेख अब्दुल्ला स्वतंत्र काश्मीरच्या भूमिकेपर्यंत व तेही परकीय हमीने मिळणाऱ्या स्वातंत्र्यापर्यंत आले. अद्यापही आझाद काश्मीरबाबत हमी येतच नाही. एकंदर मेळाव्याचा रोख हिंदुस्थानमध्ये राहून काश्मीरच्या प्रश्नांची सोडवणूक करावी असाच दिसून आला. शेख अब्दुल्लांचे प्रयत्न स्वतंत्र काश्मीरच्या दृष्टीने यशस्वी होतील असे वाटत नाही. शेख अब्दुल्लांवर जो खटला भरण्यात आला त्याला ३१ लाख ५४ हजार रुपये खर्च आला.

काश्मीरच्या प्रश्नातील अत्यंत दुःखद घटना : लालबहादुर शास्त्रींचा अंत

काश्मीरच्या या प्रश्नातील अत्यंत दुःखद घटना म्हणजे लालबहादुर-शास्त्रींचा अंत ही होय. १० जानेवारी १९६६ रोजी त्यांनी ताश्कंद करारावर सही केली व त्याच रात्री त्यांना ताश्कंद येथेच मृत्यू आला. त्यावेळी त्यांच्याजवळ कोणीही नव्हते. ताश्कंदला जाण्यापूर्वी त्यांना हृदयविकाराचा झटका आला होता व त्यामुळे त्यांनी काही दिवस विश्रांतीही घेतली होती. एकंदरीत त्यांची प्रकृती अत्यंत नाजूक झाली होती. परंतु एकंदर आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा विचार करून ते रशियाच्या आग्रहाने ताश्कंदला गेले. त्यांचेबरोबर आपल्या मंत्रिमंडळात संरक्षणमंत्री असलेले श्री. यशवंतराव चव्हाण हेही गेले होते. एकंदर वाटाघाटींचा त्यांच्यावर बराच ताण पडला व करारावर ता. १० जानेवारी १९६६ रोजी सह्या झाल्यावर त्यांच्या मनावरील ओझे कमी झाले पण त्याच रात्री त्यांना खोकल्याची उबळ आली. त्यावेळी त्यांच्या खोलीत दुसरे कोणीही नव्हते. आणि शेवटी एकाकी व एकटेच ते

कालवश झाले. त्यांच्या मृत्यूने हिंदुस्थानला लाभलेला कणखर वृत्तीचा पंतप्रधान नाहीसा झाला. त्यांनी दुसऱ्या कोणाची वाट न पाहता व कोणास काय वाटेल याची क्षिती न बाळगता सरळ लाहोरवर हल्ला करण्यास सेनापतींना परवानगी दिली. त्यामुळे पाकिस्तानला शिस्तीची माघार घेणे भाग पडले. जे काम करण्याकरता पंडित जवाहरलाल संयुक्त-राष्ट्र संघटनेकडे गेले तेच काम लालबहाद्दूरांनी आपल्या हिंमतीवर आपल्या सैन्याकडून करवून घेतले. १९६५ मधील सप्टेंबरचे ते २१ दिवस सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्याजोगे झाले व ते केवळ लालबहाद्दुर यांच्या निश्चयी धोरणामुळे. असा हा बाणेदार पंतप्रधान परदेशात एकाकी निधन पावल्याची वार्ता ऐकून सर्वजण स्तिमीत झाले. त्यांच्या निधनात काही तरी गूढ असावे असा तर्कवितर्क चालू झाला व ऑर्गकी, नायझर पत्राने त्याच वेळी खूप गंभीर चर्चा केली. त्यांचे म्हणणे असे "कौल नामक एका बड्या धेंडाने आपला एक मुसलमान परिचारक शास्त्रीजींच्या दिमतीला दिला होता. आणखी एक चिनी युवतीही तेथे घोटाळत होती. शास्त्रीजींच्या अंत्यसंस्काराच्या वेळी त्यांच्या अंगावर हिरव्या – पिवळया रंगाचे मोठे चट्टे दिसले. शास्त्रीजींना अखेरचा दुधाचा पेला दिला तो त्या मुसलमान परिचारकानेच !

अशा प्रकारे गूढ वातावरणात शास्त्रींचा मृत्यु झाला व तोही ताश्कंद करारावर सही केली त्याच दिवशी झाला. लालबहाद्दुर शास्त्रीजी हे पंतप्रधान झाल्यापासूनच परकीय देशात थोडी गडबड उडाली होती, कारण लालबहाद्दुर हे भारतीय वातावरणात वाढले होते व त्यांचे विचार राष्ट्रीय वृत्तीला धरून होते. त्यांना पाश्चिमात्य संस्कृतीची भूल वा भुरळ नव्हती व त्यामुळे त्यांचा कट्टरपणा अनेकांना बोचू लागला होता व त्यामुळेच त्यांचा अंत हा नैसर्गिक समजण्यात येत नसून घातपाती असावा असा संशय घेण्यास पुष्कळांना जागा मिळाली आहे. लाल-बहाद्दुर शास्त्री यांचा मृत्यू ही काश्मीर प्रश्नातील अत्यंत दुःखद घटना आहे असे जे वर म्हटले आहे ते यामुळेच होय. त्यांच्या एकाकी

मृत्यूवर त्यांच्या मंत्रिमंडळातील एक मंत्री श्री. टी. एन्. सिंग यांनी कै. शास्त्री यांच्या तोंडी असलेला मिर्झा गालीबचा एक दोहरा एका जाहीर सभेत म्हणून दाखविला तो असा —

पडिये अगर बीमार तो कोइ ना हो तिमारदार ।
और अगर मर जायें तो नोहे खाँ कोइ ना हो ॥

याचा अर्थ असा की, जर मी आजारी पडेन तर माझी शुश्रूषा करणारे कोणी नसावे व जर मी मरण पावलो तर कोणीही माझा शोक करू नये. आणि खरोखरीच या अर्थाप्रमाणेच त्यांच्या शेवटच्या आजारी पणात त्यांची कोणी शुश्रूषा केली नाही. व ते मरत असताना कोणी शोक केला नाही. आता मात्र आपण सर्व शोकसागरात बुडून गेलो आहो.

काश्मीर प्रश्नाबाबत निघणारे निष्कर्ष

काश्मीर प्रश्नाबाबत जे निष्कर्ष निघतात त्यातील सर्वप्रथम निष्कर्ष हा की, यापुढे काश्मीरचा प्रश्न संयुक्तराष्ट्र संघटनेपुढे काढू देतां उपयोगी नाही. काश्मीर किंवा हिंदुस्थानात काहीही घडामोडी झाल्या तरी त्या अंतर्गत स्वरूपाच्या आहेत सबब त्या सुरक्षामंडळाच्या कक्षेत येत नाहीत असे श्री. छगला यांनी सुरक्षामंडळाला ज्याप्रमाणे १९६४ मध्ये हजरतबाल प्रकरणी सुनावले तसे सुनावले पाहिजे व आपण आपल्या संयुक्तराष्ट्र संघटनेच्या कायम प्रतिनिधीस तशी समज देऊन ठेवली पाहिजे.

१९६५ च्या पाकिस्तानबरोबरच्या लढाईत ज्याप्रमाणे आपण कोणाच्या अनुज्ञेची वाट न पाहता पाकिस्तानच्या सियालकोट व लाहोर विभागात घुसण्याचा निर्णय घेतला व हा निर्णय आपल्या दिल्लीच्या मुख्य लष्करी कचेरीने घेतला त्याप्रमाणे तो यापुढेही त्याच कचेरीने घेत जावा व सुरक्षामंडळाकडे कोणत्याही परिस्थितीत आपण धाव घेऊ

नये. आपल्या फौजदारी कायद्यात म्हणतात त्याप्रमाणे आरोपी व्हावे परंतु फिर्यादी होऊ नये. तशी गत या सुरक्षा मंडळाची आहे. आक्रमकांनी घेतलेले देश संयुक्तराष्ट्र संघटनेच्या मध्यस्थीने आतापर्यंत मिळाल्याचा दाखला नाही. आक्रमक देश गिळतो व मग संघटना फार तर ती लढाई थोडी थांबवते. संयुक्तराष्ट्र संघटनेच्या फौजा प्रत्यक्ष जाऊनही लढाई थांबत नाही. अंतर्गत प्रश्न म्हणून त्यांना उत्तर देऊन आपण आपला मार्ग स्वीकारला पाहिजे.

पाकिस्तानने जो काश्मीरचा भाग व्यापला आहे तो आपल्याला परत मिळवावयाचा असल्यास तो आपण लढाईच्या मार्गानेच मिळवू शकणार आहो. त्यासाठी लढाई करण्याची आपळी तयारी आहे की नाही हे ठरवावे व सरळ गोव्यावर अगर हैदराबादमध्ये ज्याप्रमाणे आपण लष्करी कारवाई केली तशी ती एकदम न कळत करून टाकली पाहिजे. काश्मीरच्या राज्यघटनेने तो प्रदेश आपला आहे असे समजून त्यातून निवडून येणाऱ्या प्रतिनिधींसाठी जागाही मोकळ्या सोडल्या आहेत. हा मार्ग आपल्यास पसंत नसल्यास सार्वमताची भुणभुण आपण त्यांच्यामागे प्रत्येक खेपेस लावली पाहिजे. आपल्याकडील काश्मीरने तीन निवडणुका घेऊन स्वयंनिर्णय घेतला आहे हा आपला आग्रह कायमच ठेवावा व त्याचे जोडीला आझाद काश्मीर मधील जनतेची दुःखे गोळा करून त्यांच्या सार्वमतासाठी पाठपुरावा करावा. या पैकी जर आपल्यास काहीच साधत नसेल तर पाकव्याप्त काश्मीर ही इतिहासजमा गोष्ट समजून सोडून द्यावी व पाकिस्तानला सुखासुखी शेजारी राहाण्याचे आवाहन करावे.

ब्रिटीश सरकारने ज्याप्रमाणे वायव्य सरहद्दीवर टोळीवाल्यांशी लढण्याकरता कायमचे सैन्य ठेवले होते व त्यांच्या तेथे कायम चकमकी चालत असत तशाच आपल्या फौजा कायम सुसज्ज ठेवाव्यात. २३ सप्टेंबर १९६५ रोजी आपले सरसेनापती चौधरी यांना छांब आखतून भागात रणगाड्यांचा वापर का केला नाही. असे विचारण्यात आले

असता त्यांनी सांगितले की, "आपल्याजवळ पाकिस्तान इतके रणगाडे नाहीत. दुसरे असे की, युद्धबंदी करारानुसार आपण जम्मू काश्मीर-मध्ये किती सैन्य ठेवावे यावर बंधन आहे. जवळच्या सियालकोट खरियन व गुजरात या तळांवरून जम्मूमध्ये रणगाडे व पायदळ आणण पाकिस्तानला सोपे गेले. याउलट आपले लष्करी तळ जम्मूपासून बरेच दूर आहेत."

आपल्या सरसेनापतींचा हा खुलासा रणमर्दाला शोभेसा नाही. युद्धबंदी रेषा आता नाममात्रच आहे. हे आपण आता जितक्या लौकर समजू तितक्या लौकर आपण आपला भाग्योदय करून घेणार आहो; पाकिस्तानने त्याची चाड बाळगली नाही व त्याने चाड न बाळगल्याबद्दल सुरक्षा मंडळाने त्यास काहीच प्रायश्चित दिले नाही. त्याची माजोरी तशीच चालू राहिली व आपण मागे चोराप्रमाणे हात बांधून फिर्यादी असताना आरोपी म्हणून उभे राहिलो. युद्धबंदी निरीक्षक परत घेण्या-बद्दल आपण तावडतोब सुरक्षा मंडळाला कळवून टाकावे. युद्धबंदी रेषा व तहनामा आता सुरक्षा मंडळाच्या ठराव–पुस्तकातच राहू द्यावा. छोट्या पाकिस्तानची लष्करी तयारी आपल्याहून मोठी आहे अशी कबूली आपल्या सेनापतींनी देणे ही थोडी लाजीरवाणी गोष्ट आहे. आपल्या सरहद्दीवरील चीन व पाकिस्तान या राष्ट्रांच्या अंगात लढाईची खुमखुमी आहे. हे ध्यानात घेऊन त्या ठिकाणी गुप्तहेर दल व लष्करी दल नेहमी जागरूक ठेवले पाहिजे व युद्धास सुरवात झाल्याबरोबर आपल्या सेनापतींना आपण कोणत्याही मार्गाने युद्धाचा बंदोबस्त करण्यास पूर्ण स्वातंत्र्य दिले पाहिजे. लष्करी डावपेच त्यांनी आखावेत मग त्यासाठी शत्रूवर आक्रमण करावे लागले तरी हरकत नाही. अशी त्यास प्रथमच आज्ञा देऊन ठेवावी व आतापासूनच या दोन्ही सरहद्दीवरील शत्रू पक्षाच्या कमकुवत जागा पाहून ठेवाव्यात. शत्रू पक्षाची आक्रमणाची नुसती चाहूल लागली तरी आपणही दुप्पट मुसंडी मारावी व शत्रूच्या शहाला काटशह द्यावा.

पाकिस्तानने काश्मीरचा प्रश्न काढला की आपणही आझाद काश्मीरचा प्रश्न काढावा व ती चर्चा तेथेच थांबवावी. ताश्कंद करा- रात म्हटल्याप्रमाणे उभयपक्षी काश्मीरची चर्चा झाली या पलीकडे वाद जाऊ देऊ नये.

पाकिस्तानबरोबरचे जे इतर पाण्याचे, रहदारीचे वगैरे प्रश्न आहेत ते आपला हातचा ठेवून सोडविण्यावर भर द्यावा. प्रश्न नाही सुटले तर त्याची खंत मानू नये.

काश्मीरच्या प्रश्नावरून हेच निष्कर्ष काढता येतात व त्या दृष्टीने आपण आपले धोरण भविष्यात ठेवणे राष्ट्राच्या दृष्टीने इष्ट आहे.

आतापर्यंत आपण १९४७ पासूनचा आजपर्यंतचा काश्मीरचा इतिहास जगाच्या संघटनेपुढील व देशापुढील घटनांचा अभ्यास करून समजून घेतला.

बक्षी गुलाम महंमदानी काश्मीरला आपल्या देशातील एक राज्य एवढाच दर्जा प्राप्त करून दिल्याने काश्मीरमधील सृष्टिसौंदर्य पाहा- वयास आपल्याला पूर्ण मुभा मिळाली आहे. एवढे खरे की, काश्मीरला आंतरराष्ट्रीय राजकारणात जर आपण खेळत ठेवले नसते तर काश्मीरचा विकास झाला असता. काश्मीरचे पुढारी राजकारणच खेळत राहिले त्यामुळे सर्वसाधारण जनता जितकी सुधारावयास पाहिजे होती तितकी सुधारली नाही.

आम्ही या १९६८ सालच्या मेमध्ये काश्मीरला गेलो असता आम्हास काय आढळले हे पुढील प्रवास वर्णनावरून वाचकांना कळून येणार आहे. काही राजकीय पुढाऱ्यांनी आपले उखळ पांढरे केले असले व भारताच्या पैशाने त्यांचे इमले उठले असले तरी त्या पैशांचा उपयोग सर्वसाधारण जनतेला फारसा झालेला दिसत नाही. त्यांची हलाखी आहे तशीच आहे. राजकीय चळवळचांमुळे अद्यापही हिंदु- स्थानातील लोकांना काही वेळा 'तुम्ही हिंदी कुत्रे' असे संबोधले

जाते. असे प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्ष ना. ग. गोरेंनी जाहीर सभेत सांगितले. आम्हाला तसा अनुभव आला नाही. हिंदुस्थान व परदेशी प्रवासी हेच अद्यापही त्यांचे उत्पन्नाचे साधन आहे. उद्योगधंदे शेती वगैरेत जशी वाढ व्हावयास पाहिजे. तशी झाली नाही. असो. काश्मीर कसा दिसला हे पुढील प्रकरणी पाहू.

काश्मीरविषयी लता मंगेशकर

लता मंगेशकर (काश्मीरहून कानन मेहरूला लिहिलेल्या पत्रांत)

" इथे जागोजागी वाहणारे खळखळते पाहिले की, त्यांच्या जागी मला इथल्या लोकांचे अश्रू वाहतांना दिसतात कानन; आणि इथे उमलणारी सुंदर रंगीबेरंगी फुले पाहिली की, इथल्या दरिद्री जनतेकडे पाहून निसर्गदेवता निष्ठुर उपहासानें खदखदा हसत आहे असा मला भास होतो ! इथे काश्मीरमध्ये भारी भारी कपडे घालून हिंडायची शरम वाटते मला. आपल्या सुखविलासांसाठी गरिबांच्या तोंडावर चार चांदीचे तुकडे फेकून त्याना कष्ट करायला लावणं निदान मला तरी सर्वस्वी अशक्य आहे. कधी कधी मनांत येते, इथे येणाऱ्या अनेक प्रवाशांप्रमाणे माझेहि हृदयचे पाषाणा असतें, तर फार बरे झाले असते. मग मी त्यांच्याप्रमाणेच येथें चैनीत आणि मजेत दिवस काढत राहिले असते !

सालके दिन हो पचास हजार,
तुम जिवो हजारो साल !

पाकिस्ताननने काश्मीरचा प्रश्न काढला की आपणही आझाद काश्मीरचा प्रश्न काढावा व ती चर्चा तेथेच थांबवावी. ताश्कंद करारात म्हटल्याप्रमाणे उभयपक्षी काश्मीरची चर्चा झाली या पलीकडे वाद जाऊ देऊ नये.

पाकिस्तानबरोबरचे जे इतर पाण्याचे, रहदारीचे वगैरे प्रश्न आहेत ते आपला हातचा ठेवून सोडविण्यावर भर द्यावा. प्रश्न नाही सुटले तर त्याची खंत मानू नये.

काश्मीरच्या प्रश्नावरून हेच निष्कर्ष काढता येतात व त्या दृष्टीने आपण आपले धोरण भविष्यात ठेवणे राष्ट्राच्या दृष्टीने इष्ट आहे.

आतापर्यंत आपण १९४७ पासूनचा आजपर्यंतचा काश्मीरचा इतिहास जगाच्या संघटनेपुढील व देशापुढील घटनांचा अभ्यास करून समजून घेतला.

बक्षी गुलाम महंमदानी काश्मीरला आपल्या देशातील एक राज्य एवढाच दर्जा प्राप्त करून दिल्याने काश्मीरमधील सृष्टिसौंदर्य पाहावयास आपल्याला पूर्ण मुभा मिळाली आहे. एवढे खरे की, काश्मीरला आंतरराष्ट्रीय राजकारणात जर आपण खेळत ठेवले नसते तर काश्मीरचा विकास झाला असता. काश्मीरचे पुढारी राजकारणच खेळत राहिले त्यामुळे सर्वसाधारण जनता जितकी सुधारावयास पाहिजे होती तितकी सुधारली नाही.

आम्ही या १९६८ सालच्या मेमध्ये काश्मीरला गेलो असता आम्हास काय आढळले हे पुढील प्रवास वर्णनावरून वाचकांना कळून येणार आहे. काही राजकीय पुढाऱ्यांनी आपले उखळ पांढरे केले असले व भारताच्या पैशाने त्यांचे इमले उठले असले तरी त्या पैशांचा उपयोग सर्वसाधारण जनतेला फारसा झालेला दिसत नाही. त्यांची हलाखी आहे तशीच आहे. राजकीय चळवळचांमुळे अद्यापही हिंदुस्थानातील लोकांना काही वेळा 'तुम्ही हिंदी कुत्रे' असे संबोधले


जाते. असे प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्ष ना. ग. गोरेंनी जाहीर सभेत सांगितले. आम्हाला तसा अनुभव आला नाही. हिंदुस्थान व परदेशी प्रवासी हेच अद्यापही त्यांचे उत्पन्नाचे साधन आहे. उद्योगधंदे शेती वगैरेत जशी वाढ व्हावयास पाहिजे. तशी झाली नाही. असो. काश्मीर कसा दिसला हे पुढील प्रकरणी पाहू.

काश्मीरविषयी लता मंगेशकर

लता मंगेशकर (काश्मीरहून कानन मेहरूला लिहिलेल्या पत्रांत)

" इथे जागोजागी वाहणारे खळखळते पाहिले की, त्यांच्या जागी मला इथल्या लोकांचे अश्रू वाहतांना दिसतात कानन; आणि इथे उमलणारी सुंदर रंगीबेरंगी फुले पाहिली की, इथल्या दरिद्री जनतेकडे पाहून निसर्गदेवता निष्ठुर उपहासानें खदखदा हसत आहे असा मला भास होतो ! इथे काश्मीरमध्ये भारी भारी कपडे घालून हिंडायची शरम वाटते मला. आपल्या सुखविलासांसाठी गरिबांच्या तोंडावर चार चांदीचे तुकडे फेकून त्याना कष्ट करायला लावणं निदान मला तरी सर्वस्वी अशक्य आहे. कधी कधी मनांत येते, इथे येणाऱ्या अनेक प्रवाशांप्रमाणे माझेहि हृदयचे पाषाणा असतें, तर फार बरे झाले असते. मग मी त्यांच्याप्रमाणेच येथें चैनीत आणि मजेत दिवस काढत राहिले असते !

सालके दिन हो पचास हजार,
तुम जिवो हजारो साल !



काश्मीरमधील शिकारा

काश्मीरचा पुर्वेतिहास व भौगोलिक रचना

काश्मीर हे हिंदुस्थानातील एक पहिल्या प्रतीचे संस्थान असून ते हिमालय पर्वताच्या पश्चिम भागात वसलेले आहे. याच्या उत्तरेला चीनच्या ताब्यातील तुर्कस्थानचा भाग व काराकोरम पर्वत असून दक्षिणेस पंजाबचा प्रदेश आहे. पूर्वेस तिबेटचे संस्थान असून पश्चिमेस सरहद्दीवरील प्रांत आहेत. चिनाब, झेलम व सिंधू या नद्यांच्या खोऱ्यात हे संस्थान वसलेले आहे. असे ठोकळ रीतीने म्हणता येईल. या देशाचे वर्णन करणाऱ्या 'राजतरंगिणी' या संस्कृत ग्रंथात पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे.

कल्पारंभापासून सहा मन्वंतरांच्या काळात हिमालयाच्या पोटातील भूमी पाण्याने तुडुंब भरली होती व तिला 'सतीचे सरोवर' असे म्हणत. पुढे हल्ली चालू असलेला वैवस्वत मनू सुरू झाल्यावर प्रजापती कश्यपाने द्रुहिण, उपेन्द्र आणि रुद्र इत्यादी देवांना खाली आणवून त्यांचे हस्ते त्या सरोवरात राहणाऱ्या जलोद्भव राक्षसास मारविले व त्या भूमीवर काश्मीर या नावाचा देश निर्माण केला. (हल्लीच्या भाषेत काश्मीरमध्ये पूर्वी सर्व पाणी होते परंतु वारंवार होणाऱ्या भूकंपांमुळे काही काळाने पर्वत वर आले.)

वनस्पती — काश्मीरमध्ये पुष्कळ दऱ्या व विपुल पाणी असल्यामुळे त्या ठिकाणी हरतऱ्हेची झाडेझुडपे आहेत. निरनिराळे रंग ज्यांपासून तयार करता येतील अशा वनस्पती पुष्कळ आहेत. अस्टर तहसिलीमध्ये हिंगाची झाडे मुबलक आहेत. भूर्जवृक्षाच्या राया पसरलेल्या आहेत. भांग वनस्पतींचीही समृद्धी आहे. सुगंधी वनस्पतींचीही येथे पैदास होते. निरनिराळ्या प्रकारची फळे काश्मीरमध्ये विपुल होतात. देवदार, अक्रोड, तुती इत्यादी झाडांची जंगलेच्या जंगले आहेत. निरनिराळी मनोहर कमळेही या ठिकाणी आढळतात.

पक्षी व प्राणी — काश्मीरच्या डोंगराळ प्रदेशात निरनिराळ्या प्रकारचे प्राणी आढळून येतात. हंगळ नावाचे काळवीट, काळी अस्वले,

कस्तुरी मृग इत्यादी प्राणी या ठिकाणी पुष्कळ आढळतात. त्याचप्रमाणे पांढऱ्या कोंबड्या, कूकण पक्षी, काळे तित्तिरपक्षी, लावे पक्षी, बदके, कोकिळा, राघू, कावळे इत्यादी अनेक प्रकारचे पक्षी काश्मीरमध्ये सापडतात. सापांच्या अनेक जाती येथे असून त्यात गुण व पेहर या जातींचे सर्व विषारी आहेत.

भूस्तर — वायव्य व आग्नेय भागात पर्वतांच्या रांगांना समांतर असे पाषाणांचे थरच्या थर पसरलेले आहेत. नैर्ऋत्य भागात तिसऱ्या युगातील पाषाणथर उपलब्ध आहे. झन्स्कर, धौलधर व परिपंजाल पर्वतांच्या रांगात वज्रतुंड, जवंर इत्यादी दगड सापडतात. बाल्तिस्तान व व लडाख या प्रांतातील पर्वतांच्या रांगातही वज्रतुंड दगड सापडतात. सरप दरीत खडूच्या दगडांचे थरच्या थर आहेत. श्रीनगरच्या दरीत प्लीस्टोसीन पाषाणांचे थर सापडतात.

हवामान व पर्जन्य — काश्मीरची दरी, पीरपंजाल ओळींच्या योगाने संरक्षित असल्याने या दरीमध्ये पर्जन्य नियमित पडत नाही. बर्फ वितळल्यामुळे उन्हाळयामध्ये या ठिकाणी पर्जन्य पडतो. काश्मीर-दरीच्या आसपासच्या पर्वतराजीमध्ये ऑक्टोबर ते मार्च महिन्यात अतोनात बर्फ पडते. जुलै, ऑगस्ट व अर्धा सप्टेंबर या महिन्यात काश्मीरमध्ये बराच उन्हाळा असतो. विशेषतः श्रीनगरमध्ये तर उष्णतामान शे. ९५° इतके असते. जानेवारी व फेब्रुवारी या महिन्यात कडक थंडी पडते.

नैसर्गिक संकटे — दुष्काळ, पूर, धरणीकंप, आगी इत्यादी नैसर्गिक संकटे काश्मीरला सोसावी लागतात. जम्मू प्रांतात दुष्काळाची बाधा वरचेवर होते; पण त्याच्या उलट १९०३, १९०५ व १९०९ या साली मोठा पूर आल्यामुळे पिके नासून गेली. १८९३ च्या पुरामुळे तर झेलम नदीवरील सात पूल, वाहून गेले. त्यामुळे अतोनात नुकसान झाले. धरणीकंपही मधून मधून होत असतातच. लडाख

प्रांतात या धरणीकंपाची नेहमी बाधा होते. तसेच हा धरणीकंप काश्मीरला वरचेवर भेट देत असतो. इ. १९१३ मध्ये पाच धक्के बसले.

काश्मीरच्या इतिहासातील पहिला कालखंड

आपल्या हिंदुस्थानात इतिहास हा इतिहास म्हणून लिहिलेला क्वचित् आढळतो. साधारणतः असा इतिहास पौराणिक ग्रंथातून शोधून काढावा लागतो. व त्या पौराणिक कथेतील सत्याचा भाग किती व कल्पनेचा भाग किती हे निवडणे फार कठीण जाते. काश्मीरची गोष्ट या बाबतीत थोडी आगळी आहे. या देशाचा इतिहास कल्हण कवीने आपल्या राजतरंगिणी या ग्रंथांत दिला आहे. हा ग्रंथ काव्यमय आहे. यातील पहिल्या तीन तरंगात दंतकथात्मक इतिहास आहे. कल्हण हा स्वतः सन ११२८ ते ११५५ च्या सुमाराच्या राजा जयसिंह याचा समकालीन आहे. तो चंपकप्रभू नावाच्या मोठ्या मुत्सद्दी मंत्र्याचा मुलगा होता. चंपकप्रभू हा राजा हर्ष याच्या पदरी होता. यामुळे त्याला त्याच्या काळची प्रत्यक्ष माहिती होती व त्या पूर्वीची ५० वर्षांची माहिती त्याला मिळवता आली. या राजतरंगिणी ग्रंथाचे आठ तरंग आहेत. त्यातील तीन तरंगांनी पहिला पौराणिक स्वरूपाचा कालखंड पुरा होतो.

काश्मीरचा पहिला राजा गोनंद हा होता व तो कौरव-पांडवांचा समकालीन होता. तो जरासंधाचा मित्र होता. जरासंधाने श्रीकृष्णाच्या मथुरेवर स्वारी केली त्यावेळी गोनंद जरासंधाच्या मदतीला गेला होता. पण तो त्या लढाईत मारला गेला. गोनंदाचाच वंश पुढे काश्मीरमध्ये अनेक वर्षे राज्य करीत होता. ख्रिस्तपूर्व २४५ च्या सुमारास सम्राट अशोकाने काश्मीर मेथे बौद्ध धर्माचा उपदेश करण्याकरता भिक्षुमंडळ पाठविले. या भिक्षूंनी बुद्धधर्माचा बराच प्रसार केला. परंतु अशोकाच्या मरणानंतर बौद्ध धर्माला उतरती कळा लागली.

या गोनंद घराण्यातील राजा अशोक याने काश्मीरात पुष्कळ स्तूप, चैत्य व विहार बांधले व त्यानेच श्रीनगर वसविले. परंतु सध्याचे श्रीनगर ते हे नव्हे. हल्लीच्या श्रीननर राजधानीची स्थापना दुसरा प्रवरसेन म्हणून जो राजा होऊन गेला, त्याने केली व अशोकाच्या श्रीनगरला पन्दरतन हे नाव मिळाले.

राजतरंगिणीच्या तिसऱ्या तरंगात दहा राजांची हकीकत सांगितली आहे, त्यातील मेघवाहन या नावाच्या राजाने थेट लंकेपर्यंत स्वारी केली होती. लंकेत त्याचा फार आदरसत्कार झाला.

उज्जैनच्या विक्रमादित्य राजाने काश्मीरच्या राजाचा पराभव केला व ते राज्य मातृगुप्त नावाच्या आपल्या आज्ञाधारक विद्या-भक्ताला पारितोषिक म्हणून दिले. त्याने फारच उत्तम रीतीने राज्य केले. काश्मीरचा राजा तोरमण याचा पुत्र प्रवरसेन याने मातृगुप्ताला राज्यावरून काढून टाकण्याचा प्रयत्न केला नाही. कारण मातृगुप्त हा फार चांगल्या रीतीने राज्य करीत होता. परंतु मातृगुप्ताला प्रवरसेनचे राज्यपद मान्य असल्यामुळे त्याने विक्रमादित्य मेल्यावर आपणहून राज्यत्याग केला व प्रवरसेनाला राज्य दिले. पण प्रवरसेन मातृगुप्ताइतकाच उदार व सत्यवादी होता. तो राज्याचे सर्व उत्पन्न मातृगुप्ताकडे पाठवी व मातृगुप्त ते सर्व धन परोपकारात खर्च करी. गोनंद राजघराण्यातील शेवटचा राजा बालादित्य झाला व त्यांच्या मृत्यूनंतर गोनंद घराण्याचा शेवट झाला व कर्कोटक नाग घराण्याचा अंमल सुरू झाला व राजतरंगिणीचा पहिल्या तीन तरंगांचा अध्याय संपला.

हिंदू राजांची कारकीर्द (सन ५९९ ते १३३८)

काश्मीरच्या या सुमारे साडेसातशे वर्षातील हकीकत कल्हणाने आपल्या राजतरंगिणीच्या चार ते आठ तरंगात दिली आहे.

या कालपर्वातील पहिला प्रख्यात राजा म्हणजे ललितादित्य मुक्ता-

पीड हा होय. हा इसवी सन आठव्या शतकात उदयास आला. ह्याने ३६ वर्षे मोठ्या वैभवाने राज्य केले. तो अत्यंत पराक्रमी होता. त्याने मध्य आशियाच्या मोंगली मुलूखापर्यंत मजल मारली. त्याने चीनच्या राजाकडे वकील पाठविला होता. तो जसा पराक्रमी होता, तसाच तो ललितकलाप्रेमी व विद्वज्जनांचा आश्रयदाता होता. त्याचे खरे स्मारक त्याने बांधलेल्या काश्मीरमधील मार्तंडाच्या देवालयाच्या स्वरूपात उभे आहे. तसेच त्याने काश्मीरमधील निर्जल भागात शेती-करता पाटाचे पाणी आणले. तो बौद्ध भिक्षू व हिंदू ब्राह्मण यांचा सारखा परामर्ष घेत असे. त्याने हिंदुस्थानातील कलिंग, कर्णाट, कावेरी, कोकण, सौराष्ट्र, द्वारका, अकंगं इत्यादी प्रदेशांवर स्वाऱ्या करून ते सर्व प्रदेश आपल्या अंमलाखाली आणले. उत्तरेकडील दरद व तिबेट हे देश सहज रीतीने जिंकून तुर्कांवर स्वारी केली व त्यांचा तीनदा पराभव केला व अपार संपत्ती मिळवून आणली. त्याने ११ कोटी रुपये खर्च करून भूतेश नावाचे एक शिवमंदीर बांधले. वितस्था नदीवर पूल, परिहासपूर नावाचे नगर व ५४ हात उंचीच्या अखंड पाषाणाच्या स्तंभावर उभारलेला गरूड ही त्याच्या कलाकृतीची उत्तम उदाहरणे आहेत. परंतु जगज्जेत्या शिकंदराप्रमाणेच तीही फार दारू पीत असे. अशाच दारूच्या अमलांत असताना त्याने आपल्या मंत्र्यांना श्रीनगरला आग लावून देण्याचा हुकूम केला. मंत्र्यांनी त्याच्या समाधानाकरता एका गवताच्या गंजीला आग लावली. परंतु ललिता-दित्य हा जात्या चांगल्या वृत्तीचा असल्यामुळे त्याने दारूची धुंदी उतरल्यावर आपल्या मंत्र्यांना दारूच्या धुंदीतले हुकूम न पाळण्याची आज्ञा दिली.

यानंतरचा मोठा राजा (८५५ ते ८८३) अवंतीवर्मा हा होऊन गेला. त्याने प्रजेचा दंग्याधोप्यांपासून व अंदाधुंदीपासून बचाव केला व आपली सांपत्तिक स्थिती सुधारण्याची संधी प्रजेला मिळवून दिली. सूर नावाचा त्याचा मुख्यमंत्री होता व त्याच्या सल्ल्याने राजा चालत

असे. दोघांचाही एकमेकांवर गाढा विश्वास होता. या अवंतीवर्म्याने सूर्य नावाचा एक निष्णात इन्जिनियर नेमला व त्याच्या साहाय्याने काश्मीर खोऱ्यातील फाजील पाणी काढून टाकून ते खोरे सुपीक बनविले व केरवा नावाच्या पठारातील कोरड्या जमिनी पाटाच्या पाण्याने सुपीक बनविल्या.

अवंतीवर्म्यानंतर नाव घेण्याजोगा राजा म्हणजे जयसिंह हा झाला. (११२८ ते ११५५) जयसिंह हा धैर्य, शौर्य या गुणांनी युक्त होता तरीसुद्धा तो साम, दाम, दंड व भेद या राजनीती तत्त्वांच्या साधनांनी आपला हेतू सिद्धीस नेत असे. त्याचा चेहरा सदा हसरा व शांत दिसे. पण त्याच्या अंतःकरणात गूढ गुह्य लपलेले असे. त्याने आपल्या सर्व शत्रूंवर विजय मिळविला व आपल्या अमदानीत त्याने प्रजेला शांततेचा व संपन्नतेचा लाभ करून दिला.

यानंतर कोणी राजा पराक्रमी निपजला नाही. काश्मीरवर दोन्ही बाजूंनी हल्ले झाले. कंदाहाराकडून सेनापती सुलकदार खान याने स्वारी केली परंतु त्यांचे सर्व सैन्य बर्फात गडप झाले.

तिबेटच्या रिंचन नावाच्या राजकुमाराने हल्ला केला. त्याला हिंदु धर्मात येण्याची इच्छा होती पण ब्राह्मणांनी त्याला हिंदू करून घेतले नाही. म्हणून त्याने मुसलमानी धर्म स्वीकारला. तो तीन वर्षातच मेला व त्याच्यानंतर १३३८ मध्ये शहामीर या मुसलमानाचे राज्य सुरू झाले व हिंदु राजांची कारकीर्द संपुष्टात आली.

मध्यंतरी तार्तर लोकांनी काश्मीरात घुसून श्रीनगर शहर बेचीराख केले होते.

मुसलमानांची कारकीर्द (१३३८ ते १८१९)

शहामीरने सत्ता बळकावल्यावर शमसुद्दीन असे नाव घेतले. त्याने जमिनीवरील सारा एकंदर उत्पन्नाच्या एक षष्ठांश ठरविला. या काळात प्रजेपैकी पुष्कळांनी मुसलमानी धर्म स्वीकारला. तरीसुद्धा

जुनी यात्रास्थाने पवित्र गणली गेली. फरक इतकाच झाला की, हिंदू देवांच्या मूर्तीऐवजी त्या ठिकाणी पीर आले.

शहामीरच्या पश्चात शहामुद्दीन हा गादीवर आला. त्याला त्याच्या एका मंत्र्याने बृहद्बुद्धाची धातूची मूर्ती वितळवून नाणी पाडण्याचा सल्ला दिला. पण त्याने तो मानला नाही. शहाबुद्दीननंतर कुतुबुद्दीन गादीवर आला. त्याचेनंतर शिकंदर बुटाणीकन (१३९० ते १४१४) हा गादीवर आला. तोही प्रथम प्रथम हिंदुधर्मीयांबरोबर सहिष्णुत्वाने वागत होता. परंतु त्याने आश्रय दिलेल्या परदेशस्थ मौलवींनी व बाटलेल्या हिंदू मंत्र्यांनी त्याला एकसारखा बदसल्ला देण्यास सुरुवात केली व शेवटी त्याने हिंदूंचा अनन्वित छळ करण्यास सुरुवात केली. त्यांना प्रेते जाळण्यास मनाई केली. जेव्हा हिंदू लोक या जाचाला कंटाळून देशांतर करू लागले तेव्हा त्याने सर्व वाटा बंद केल्या व मरण किंवा धर्मांतर असा पेच निर्माण केला व त्यांना कैचीत पकडले. अर्थात पुष्कळांनी आलेल्या प्रसंगाला तोंड देऊन धर्मांतर केले पण थोड्या महात्म्यांनी मरण पत्करून अजरामर कीर्ती संपादन केली. याच काळात काश्मीरातील अनेक मूर्ती छिन्नविच्छिन्न करण्यात आल्या. परंतु त्याचा मुलगा अत्यंत समजूतदार निघाला. त्याचे नांव झेनउल अब्रिदीव आज काश्मीरमध्ये जे प्रमुख उद्योगधंदे, शाली, कागदी लगद्यापासून बनणाऱ्या वस्तू, गालीचे, रेशमी कापड वगैरे दिसतात ते या बादशहाच्या कारकीर्दीत सुरू झाले. आजही ह्याचे नाव काश्मीरमधील सर्वसाधारण नागरिक घेतो. त्याचे दुसरे नांव 'बडशा' असे आहे. त्याने हिंदू लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे धर्माचरण करण्यास मुभा दिली. त्याने पुष्कळ संस्कृत ग्रंथांचे पर्शियन भाषेत भाषांतर करविले. तो स्वतः योगवासिष्ठ हा ग्रंथ नेहमी वाचीत असे परंतु त्याच्या मुलांनी पुन्हा हिंदूंचा छळ करण्यास सुरुवात केली व शेवटी अकबराने १५८७ मध्ये तो कायमचा काबीज करून हिंदुस्थानमधील मोगल बादशाहीचा

घटक करून सोडला. बादशहाने नेमलेल्या सुभेदारामार्फत काश्मीरचा राज्यकारभार चालू झाला.

शहाजहान व जहांगीर यांच्या अमदानीत काश्मीर खोरे बादशहाचे उन्हाळ्यातील शीतल निवासस्थान झाले. याच अमदानीत काश्मीरात ठिकठिकाणी बागा करण्यात आल्या व आजच्या काश्मीरचे ते एक प्रमुख आकर्षण आहे. औरंगजेबाने काश्मीरला एकदाच भेट दिली होती. परंतु तेवढ्यातही त्याने हिंदूंना बाटविण्याचे काम केलेच.

मोंगलांच्या नंतर पठाणांच्या ताब्यात काश्मीर गेले. या पठाणांनी काश्मिरी जनतेला हरएक प्रकारे छळले. शेवटी रणजीतसिंगाने लोकांचा छळ वाचविण्याकरता काश्मीरवर स्वारी करून तो पादाक्रांत केला. रणजीतसिंगच्या स्वारीत जम्मूचा सरदार गुलाबसिंग हाही होता. हाच गुलाबसिंग हल्लीच्या प्रचंड काश्मीर संस्थानचा संस्थापक आहे.

काश्मीरचा संस्थापक गुलाबसिंग

गुलाबसिंग हा डोग्रा जातीचा रजपूत असून त्याचे जम्मू येथे लहान संस्थान होते. जम्मू प्रांत हा पंजाबला लागून असून त्यातला काही भाग झेलम, गुजरात, सियालकोट आणि गुरूदासपूर या जिल्ह्यांच्याच सपाटीवर आहे. जम्मू हे शहर समुद्रसपाटीपासून साडेबाराशे फूट उंच आहे. जम्मू प्रांताची हवा पंजाबप्रमाणे उष्ण आहे व पावसाची सरासरी ४१ इंच आहे. या भागात हिंदूंची बहुसंख्या आहे. गुलाबसिंगाने रणजितसिंहाकडे नोकरी धरली व आजूबाजूची लहान लहान संस्थाने काबीज केली. ' जम्मूचा राजा ' म्हणून रणजितसिंगाने त्याचा गौरव केला. लडाख भाग त्याने १८४० साली काबीज केला. लडाखमध्ये बौद्ध धर्मीयांची वस्ती आहे. आपल्या काश्मीरच्या वर्णनात सौनामार्गचे वर्णन आहे. तेथूनच पुढे लडाखला रस्ता आहे. लेहही तेथील व्यापाराचे ठिकाण आहे. येथे हिंदुस्थानचे व्यापारी व मध्य आशियातील व्यापारी एके ठिकाणी जमतात. लोक बौद्ध धर्मीय असले

तरी मंगोलियन वंशाचे आहेत. त्यांच्यामध्ये हिंदूप्रमाणे चातुर्वर्ण्य आहे. लडाख प्रांताला लागून असलेला बाल्टस्तानही त्याने १८४० साली जिंकला.

१८४५ सालात शीख व इंग्रज यांचे युद्ध झाले. त्या युद्धात त्याने भाग न घेतल्यामुळे इंग्रजांचा जय झाला व त्यांनी काश्मीरचा प्रांत काही रक्कम घेऊन ताब्यात घेतला किती रकमेला काश्मीर घेतला याबद्दल मतभेद दिसतात. श्री. गो. चिं. भाटे यांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनात ती रक्कम ७५ हजार दिली आहे. तर सर्वसाधारण समज ७५ लाख दिल्याबद्दल आहे. अमृतसरला शीख व इंग्रज यांच्यामध्ये १८४६ मध्ये तह झाला व त्यात ईस्ट इंडिया कंपनीने १ कोटी रुपयांची मागणी व पंजाबमधील बराच मुलूख मागितला. १ कोटी रुपये देणे शीखाना शक्य नसल्यामुळे त्यात २५ लाखांची सूट देण्यांत आली. पण तेही शक्य दिसेना तेव्हा गुलाबसिंगानें त्या खर्चाची हमी घेतली व काश्मीर प्रांत आपल्याकडे ठेवून घेतला. या ७५ लाखांच्या जोडीला दरबारने ब्रिटिशांना दरसाल एक घोडा, १२ शालींच्या बकरी व तीन शालींचे जोड द्यावयाचे खास कराराने ठरले. परंतु पुढे यात बदल होऊन दोन काश्मिरी शाली व रुमाल देण्याचे ठरले. श्री. गजेंद्र गडकरांनी आपल्या पुस्तकात दरसाल ७५ लाख देण्याचे कबूल केले असे म्हटले आहे. परंतु ते बरोबर दिसत नाही. एकंदरीत ७५ लाखच बरोबर दिसतात. श्री. व्ही. पी. मेनन यांनीही ७५ लाख व शाली यांचाच उल्लेख केला आहे. अशा रीतीने हल्लीच्या काश्मीर संस्थानची संस्थापना १८४६ मध्ये कायदेशीररीत्या झाली.

महाराज गुलाबसिंग १८५७ मध्ये मृत्यु पावले व त्यांच्यानंतर रणवीरसिंग हे गादीवर आले. रणवीरसिंगानी १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धात इंग्रजांना मदत केलीं व त्यांनी १८६० मध्ये गिलगिट प्रांत परत जिंकून घेतला. काश्मीर हे विद्वान पंडितांचे आश्रयस्थान या जम्मूच्या राजांच्या कारकीर्दीत झाले होते. राजे रणवीरसिंग यांच्या कारकिर्दीत

एकदा काश्मीरच्या मुसलमानांनी आपल्याला हिंदू करून घ्यावे अशी राजे रणवीरसिंगाकडे विनंती केली होती. त्यांना ती पसंत पडली, पण दुर्दैवाने काश्मिरी पंडितच त्यास विरुद्ध गेले. वास्तविक या पूर्वी शीखांच्या सरदार हरिसिंग नलुआ याने १८२० साली जेव्हा काश्मीर जिंकला त्यावेळी धर्मांतरित हिंदूंना परत स्वधर्मात येण्याची मुभा ठेवली. त्याचा परिणाम चांगला होऊन ५० हजार बाटलेले लोक हिंदू धर्मात आले. रणवीरसिंग १८८५ मध्ये वारले व त्यांच्या जागी त्यांचे मोठे चिरंजीव प्रतापसिंग गादीवर आले. या महाराजा प्रतापसिंगाच्याच कारकीर्दीत ब्रिटीश सरकारचा प्रतिनिधी म्हणून 'रेसिडेंट इन काश्मीर' या हुद्याचा अधिकारी कायमचा श्रीनगरमध्ये राहू लागला. प्रतापसिंगाच्याच कारकीर्दीत आणखी एक महत्त्वाची घटना घडली व ती म्हणजे गिलगीट हा प्रांत ब्रिटिश पोलिटिकल एजंटच्या खास अधिकाराखाली आला. प्रतापसिंग महाराजांच्या कारकीर्दीत संस्थानात अनेक सुधारणा झाल्या. त्यातील मुख्य म्हणजे उत्तम रस्ते ही होय. काश्मीर आपल्याला सुलभ झाला याचे बरेचसे श्रेय प्रतापसिंग महाराजांना आहे. प्रतापसिंग हे १९२५ मध्ये वारले व त्यांच्या गादीवर लेफ्टनंट जनरल महाराजा सर हरिसिंग हे आले.

महाराजा हरिसिंग यांच्या कारकीर्दीतील काश्मीर हा सरहद्दीवरचा एक प्रमुख प्रदेश झाला होता. पूर्वेस तिबेट, ईशान्येस चीनचा सिक्यांग प्रदेश, व वायव्येस अफगाणिस्थान, गिलगीटच्या उत्तरेस अफगाणिस्थानचा भाग वाखान हा आला होता. तेथून थोड्याच मैलांच्या अंतरावर रशियाचा तुर्कस्थान हा प्रदेश हरिसिंग यांच्या कारकिर्दीचेवेळी होता.

१९३५ मध्ये रशियाने सिक्यांगचा जवळ जवळ कब्जा केला होता. त्यामुळे ब्रिटिशांनी गिलगीट प्रांताचा कारभार साठ वर्षांच्या भाडेपट्ट्याने घेतला. गिलगीट स्काऊट म्हणून लष्करी संरक्षणाकरता एक खास सैन्याची तुकडी तयार करण्यात आली. ३ जून १९४७ ला हा सर्व भाग महाराजांना परत करण्यात आला त्यावेळी सर्व राज्यात आनंदोत्सव साजरा

करण्यात आला. १९२१–२२ मध्ये प्रिन्स ऑफ वेल्सने जेव्हा हिंदुस्थानचा दौरा केला त्यावेळी युवराजांच्या खास दिमतीस असलेल्या असामींमध्ये महाराजा हरिसिंग हे एक होते. ते मोठे धूर्त व चाणाक्ष होते. १९४७ मध्ये पाकिस्तान्यांनी जेव्हा बंडाळी करण्यास सुरवात केली तेव्हा त्यांनी सर्व काश्मीरमध्ये दौरा काढण्याचे ठरविले. त्यांच्या दौऱ्याचा कार्यक्रम प्रसिद्ध झाल्यायर पाकिस्तानच्या सरहद्दीपाशी आल्यावर त्यांना पकडण्याचा विचार पाकिस्तान सरकारने केला होता. महाराजांच्या मंत्र्यांना याची खबर लागल्याबरोबर त्यांनी महाराजांना आपला दौरा रद्द करण्यास विनविले, परंतु महाराजांनी तो दौरा रद्द केला नाही तर त्यात थोडासा फरक करून ठरलेल्या गावी ठरलेल्या वेळी न जाता एक दिवस अगोदर ते गेले व आपला जनतेला दिलासा देण्याचा हेतू त्यानी सिद्धीस नेला. परंतु पुढे कालाची गती विचित्र होती. त्यांना स्वतःचा बचाव स्वतः करणे शक्य झाले नाही व त्यांनी हिंदुस्थानकडे मदतीची याचना केली व त्याना १९५१ मध्ये गादी सोडून जावे लागले. डोग्रा राजघराण्याचे राज्य या ठिकाणी संपले व पुढे लोकशाहीप्रधान राज्यकारभार चालू झाला व त्या हरिसिंगाचे पुत्र करणसिंग हे काही काळ गादीवर आले तरी ते क्षणमात्रच म्हणावयाचे. ते आता इतर संस्थानिकांप्रमाणे संस्थानिक आहेत. प्रत्यक्ष राज्यकारभाराशी त्यांचा संबंध उरलेला नाही. अशाप्रकारे काश्मीरच्या भूगोलाची व इतिहासाची थोडक्यात हकीकत आहे. कालाय तस्मै नमः

* * *



काश्मीरमधील हौसबोट

मी पाहिलेला काश्मीर

खूप दिवसांचा मनसूबा

१९४५-४६ सालचे ते दिवस असावेत. त्यावेळी आपला हिंदुस्थान खैबर घाटापर्यंत पसरला होता व पंजाब हा पश्चिमेकडील सरहद्दी-जवळचा प्रांत होता. त्यावेळी लाहोर हिंदुस्थानात मोडत होते. मला लाहोरला जाण्याचा योग आला होता. ऑल इंडिया मोटर ओनर्स असोसिएशनचे अधिवेशन त्या ठिकाणी भरले होंते. १९४२ चा मोटार व्हेईकल ॲक्ट झाल्यापासून खाजगी उतारू वाहतूक करणाऱ्या बसच्या मालकांमध्ये एक नवे चैतन्य निर्माण झाले होते. एकेकट्याच्या माल-कीच्या मोटारी जाऊन त्या ठिकाणी लिमिटेड कंपन्या तयार होऊ लागल्या होत्या व त्या कंपन्यांचेही राष्ट्रियीकरण करण्याबाबत सरकारी वर्तुळात फार मोठी हालचाल चालू झालेली होती. त्यावेळी राष्ट्रियी-करणाला विरोध करण्यासाठी सगळ्या मालकांची ही संघटना बांधण्यात आलेली होती व त्यात राष्ट्रीयकरण करण्यास विरोध करण्यात आला होता. आमच्या पुण्याच्या दोन-तीन कंपन्यांचा मी कायदेशीर सल्लागार असल्यामुळे मलाही त्यांनी या अधिवेशनाला नेले होते. अधिवेशन आटोपल्यावर ही सर्व मंडळी ठिकठिकाणी हिंडून पुण्यास येणार होती व त्यातील काही काश्मीरला जाणार होती. त्याचवेळी माझ्याही मनात काश्मीरला जावयाचे होते. परंतु या अधिवेशनासाठी जाण्या-येण्यात व तेथे राहण्यात आठ दहा दिवस मोडल्यामुळे व आम्ही त्यावेळी ऑगस्टमध्ये गेलो असल्यामुळे आमचे कोर्टाचे काम फार दिवस सोडून मला रहाणे शक्य होत नव्हते. त्या सर्व मंडळींना तेथेच सोडून मी एकटा परत पुण्यास आलो. त्या वेळचा काश्मीर पहाण्याचा मनसुबा तसाच राहिला. तो यंदा १९६१ मध्ये पार पडला. तोही अत्यंत तडका-फडकी. त्याचे असे झाले......

जावईबुवांची साथ :

आमची बहीण अलकनंदा ही डॉक्टर आहे. तिचा सध्याचा दवा-

खाना भाज्याच्या जागेत मुंबईत आहे. तिला प्रसंगवशात् एक मालकीचा ब्लॉक मिळाला. त्यात नवीन दवाखाना चालू करण्यासाठी तिने वास्तुशांतीचा समारंभ केला. त्यासाठी आम्ही सर्वजण जमलो होतो. त्यांत आमचे जावई श्री. बाळासाहेब गोडबोलेही आले होते. नवीन जागा कॅडेल रोडवर असल्यामुळे समुद्राची दादरची चौपाटी जवळच येते. तेथे आम्ही भोजनोत्तर रात्रीच्या वेळी फिरण्यास गेलो असता तेथे सहज विषय निघाला. त्यांना २२ मेपासून रजा मिळणार होती व त्यानंतर काश्मीरला जाण्याचा मनोदय त्यांनी प्रकट केला. माझ्याही मनात अनेक दिवसांपासून हा विचार घोळतच होता, आमचीही दिवाणी कोर्टाची सुट्टी १० जूनपर्यंत होती. म्हणजे दोन तीन आठवडे मलाही बिनघोर पुण्याबाहेर काढता येत होते. मी त्यांना ताबडतोब काश्मीरच्या जाण्याच्या तयारीला लागावयास सांगितले. आमचे चिरंजीव नंदू या कामात तरबेज. फिरून आल्याबरोबर त्याला २२–२३ तारखेचे रिझर्व्हेशन करावयाचे सांगितले. पण हल्लीच्या दिवसात सांगितल्याबरोबर काम थोडेच होते ! मध्यंतरी ८–१० दिवस गेले तरी त्याचेकडून काहीच वार्ता कळली नाही. आम्ही याही खेपेस रचलेले मनोरे ढासळतात की काय, म्हणून आतून निराशेने परंतु बाहेरून स्थितप्रज्ञवृत्तीनें इतर कार्यक्रमांची मनात जुळणी करू लागलो. इतक्यात—

एके दिवशी रात्रीच्या वेळी नंदूकडून मुंबईचा टेलिफोन आला व त्याने थेट श्रीनगरपर्यंतची तिकिटे रिझर्व्ह केल्याची व २३ तारखेला फ्रॉंटियर मेलने निघायला पाहिजे असे सांगितले. त्याबरोबर सुटींतील कार्यक्रमांना पुन्हा तजेला आला व त्या दृष्टीने कामाची व्यवस्था करण्यास प्रारंभ करून ता २१ लाच आम्ही मुंबईला रवाना झालो. एक दिवस अगोदरच जाण्याचा उद्देश एवढाच की, काश्मीरमधील कार्यक्रमाबाबत काही आखणी करावयाची असल्यास करता यावी. कारण आमचा सर्वच कारभार अंधारात उडी मारण्यासारखा होता. आपल्याला श्रीनगरला

जायचे आहे या माहितीखेरीज मला काहीच माहिती नव्हती. सर्वच पुढाकार बाळासाहेब गोडबोल्यांकडे सोपविला होता.

फ्रॉंटियर मेलचा प्रवास

फ्रॉंटियर मेलच्या स्लीपर कोच शयनागाराची तिकिटे रिझर्व्ह केलेली होती व ती सुटीच्या सवलतीच्या दराने दीडपट भाड्यात दोन्ही वेळ जायची-यायची होती. त्यातही रिझर्व्हेशनची गंमत झाली होती. तीन तिकिटे थेट पठाणकोटपर्यंत शयनाच्या सवलतीची होती. पण उरलेली दोन दिल्लीपर्यंतच्या शयनाच्या सवलतीची होती. दिल्ली ते पठाणकोट प्रवास झोपून होतो की नाही याची शंका होती. पश्चिम रेल्वेच्या बॉम्बे सेंट्रल या स्टेशनवरून फ्रॉंटियर मेल रात्री ९-१५ वाजता निघणार होती. तिकिटे सवलतीची थेट श्रीनगरपर्यंतची मिळालेली होती. या तिकिटाची अट अशी असते की, जाताना ज्या हवेच्या ठिकाणी तुम्ही जाणार असाल त्या ठिकाणी सरळ जायचे. मध्ये कुठे उतरावयाचे नाही. येताना मात्र आपल्याला प्रवासाच्या नियमाप्रमाणे उतरावयाची सवलत घेता येते. आम्ही पाचजण होतो. मी, सौभाग्यवती, आमची मुलगी, जावई व त्यांची आई. तीन तिकिटें एका ठिकाणची जवळ जवळ होती व बाकीची दोन बाजूची होती. तीन तिकिटांजवळ ज्यांची तिकिटे होती त्यांना आमच्या जागा देऊ करून आम्ही त्यांच्या जागा घेतल्या व त्यांनी संमती दिली. अशा रीतीने प्रवास सुरू झाला. आम्हांला निरोप द्यायला आमची मुंबईची सर्व मंडळी स्टेशनवर आल्यामुळे आनंददायक वातावरणात आम्ही मुंबई सोडली. हळूहळू झोपेची सोय करू लागलो व मी मधल्या फळीवर झोपलो. ही मधली फळी थोडी गैरसोयीची आहे. डब्याच्या खिडकीत व फळीत बरीच फट राहाते व त्यातून आपली चीजवस्तू खाली तरी पडण्याचा संभव असतो किंवा खालील खिडक्या उघड्या असल्या तर त्या त्यांतून बाहेर पडण्याचा संभव असतो. मी झोपताना मला ही भिती वाटलीच व 'भित्यापाठी ब्रह्मराक्षस' म्हणतात

त्याप्रमाणे आमची भीती खरी ठरली. मी उशाशी माझा जो चष्मा काढून ठेवला होता तो खिडकीतून रात्री पळून गेला व आम्हांला त्याच्याशिवाय सर्व प्रवास पार पाडावा लागला. मला वाचायला चष्मा लागत नसल्यामुळे फारसे अडले नाही म्हणून आमचा प्रवास सुखरूप झाला. फ्रँटियर मेलच्या प्रवासातला पहिला फटका बसला पण तो वर्मी लागला नाही एवढेच.

बरोबर दुसऱ्या दिवशी रात्री ९ च्या सुमारास आम्ही दिल्लीला पोचलो. तेथून आमचा डबा (पठाणकोटचा) बाजूला काढून दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर उभ्या असलेल्या काश्मीर मेलला जोडला गेला. मध्यंतरी आम्ही कंडक्टरला भेटून आमच्या शयनाची सोय करून घेतली होती.

सबॉर्डिनेट लेजिस्लेशनचा अभ्यास

काश्मीर मेलचा प्रवास रात्री ९–३५ ला सुरू झाला. त्यावेळी आतापर्यंतचे असलेले काश्मीरी प्रवाशांचे वातावरण थोडे बदलले मराठी भाषा बोलणारे कोणीतरी गाडीत बसले आहेत याची जाणीव झाली व जरा बरे वाटले. परकियांच्या गराड्यात स्वकीयांचे अस्तित्वही मोठे आल्हाददायक वाटते. तसे पाहिले असता हे परभाषा बोलणारे लोक मोठया आस्थेने आपली माहिती सांगत होते, व आमची ते ऐकत होते. मधून मधून स्टेशनवरील वस्तू घेण्यात, पाणी आणण्यात वगैरे सहभागी होत होते. त्यात बोचद काहीच नव्हते. त्या प्रवाशांपैकी एक महंमदी धर्माचे उर्दू पुस्तक वाचीत होता. त्यावरून आपल्याकडे जसे दशावताराने जगाचा विकासक्रम समजतो त्याप्रमाणे त्यांच्याकडे आदम, अब्राहम, नोहा मोझेसक जीजस खाईस्ट व महंमद असे विकास क्रमाने प्रेषित दाखविले होते. म्हणजे मुसलमानी धर्म हा पूर्णपणे स्वतंत्र धर्म नसून ख्रिश्चन धर्माच्या परंपरेतलाच धर्म आहे हे समजून येण्याजोगे आहे. शास्त्रीयदृष्टया जरी ही परिस्थिती असली तरी आपल्याला इतिहासात मात्र या दोन धर्मानुयायांची धर्मयुद्धे झालेली आढळून येतात.

प्रेषक व अनुयायी यांच्यांत हा मेळ नेहमी असाच असतो व म्हणूनच मूळ तत्त्वे बाजूला राहून व्यवहार भलत्याच मार्गाला नेलेला आढळून येतो.

परभाषा किंवा परकीय यांच्यापासून जरी काही बोचत नव्हते तरी रोचकता मात्र आपली भाषा ऐकल्यावरच आली. याच परकीयांमध्ये एकजण हिरा, पाचू, नीळ वगैरे खड्यांचा व्यापार करणारा होता. मुंबईला त्याचे दुकान कुलाबा भागात आहे. काश्मीरमध्ये जर चांगल्या रीतीने पहाणी केली तर खड्यांचा व्यापार फार मोठ्या प्रमाणावर चालू करता येईल असे त्याचे मत पडले. काश्मीर पाहिल्यावर त्याची थोडीफार प्रचीती सर्वसाधारण प्रवाशाला येते. या प्रवाशाने निरनिराळ्या खड्यांचे गुणधर्म, जन्मतारखेपासून छापून कार्ड तयार केले होते. पण ही सर्व माहिती परकीयांपासून मिळालेली व आमच्या मोडक्या तोडक्या हिंदीच्या वापरातून मिळालेली होती. मराठी बोलणारांचा आवाज ऐकल्याबरोबर आपल्याला मनमोकळेपणाने बोलायला मिळणार म्हणून आनंद वाटला. त्या मराठी बोलणाऱ्यांत मिसळल्याबरोबर अशी माहिती मिळाली की, ही सर्व १०-१२ मंडळी मुंबईहून महाराष्ट्र विधिमंडळातर्फे काश्मीरमध्ये सबॉर्डिनेट लेजिस्लेशनचा अभ्यास व पाहणी करण्याकरता निघाली आहेत. या कार्यासाठी नेमलेल्या समितीतील इतर सभासद श्रीनगरला परस्पर विमानाने येणार होते. कायदा व्यवस्थित व निर्दोष व्हावा म्हणून आपण किती काळजी घेत आहो, हे पाहून मनाला बरे वाटले. अशाच स्वरूपाच्या कामाला यापूर्वी दोन-तीन वर्षांपूर्वी आपले कायदा तज्ज्ञ येऊन गेले होते, असे कळले.

सबॉर्डिनेट लेजिस्लेशनसाठी ही मंडळी १५-२० दिवस राहणार होती. त्यावरून मला आपल्या घटनेसाठी सामुग्री गोळा करण्यासाठी देशोदेशी रवाना झालेल्या अधिकाऱ्यांची आठवण झाली.

पठाणकोट ते श्रीनगर

पठाणकोट ते श्रीनगर हा सर्व प्रवास आम्ही बसने केला. या बसेसमध्ये थोडा भेद आहे, सर्व उतारूंना जरी थेट श्रीनगरपर्यंतची तिकिटे दिलेली असतात व त्यांच्याकडून जरी रेल्वेचे आगाऊ बसचे पैसे घेत असले तरी सर्वच उतारूंना एकजात चांगल्याच बसेस मिळतात असे नाही. बसेसची सोय मात्र सगळयांची केली जाते. काहींना स्टेट ट्रान्स्पोर्ट मिळतो व काहीना खाजगी कॉन्ट्रॅक्टर्सच्या गाडया दिल्या जातात. त्या सर्वांना जरी आरामगाडयाच म्हटले जाते तरी त्यातल्या बैठका व बैठकीची रचना आरामशीर असतेच असे नाही. गाडया घेताना यांकडे लक्ष देऊन स्टेट ट्रॅन्स्पोर्टच्या गाडया घेतल्या तर त्या जास्त आरामशीर असतात. आम्हाला हे काहीच माहीत नव्हयामुळे ज्या बसमध्ये लौकर जागा मिळाली ती बस आम्ही घेतली. ती खाजगी कंत्राटदाराची होती. ती तितकीशी आरामशीर नव्हती. प्रवास तर सकाळी १०–३० लाच सुरू झाला व आम्ही १२ च्या सुमारास जम्मूला येऊन पोहोचलों त्या ठिकाणी रहदारी बंगल्यातील कॅन्टीनमध्ये आम्ही जेवण घेतले व दोन वाजता आमचा श्रीनगरचा प्रवास पुढे सुरू झाला. तो सर्व १५०–२०० मैलांचा घाटातला प्रवास आहे. रात्री घाटातून जाण्यास मनाई असल्यामुळे एका पराट नावाच्या लहान गावी आम्हाला रात्रीचा मुक्काम करावा लागला, हॉटेलातली एक खोली ३ रु. भाडयाने मिळाली. पण त्यात संडास–बाथरूमची व इतर कांहीच सोय नव्हती. प्रथम सोय आहे म्हणून सांगण्यात आले. पण नंतर ती सोय सांगण्यापुरतीच होती. एकच गोष्ट चांगली होती की, त्या खोलीत डास, पिसवा किंवा ढेकूण यांचा उपसर्ग नव्हता. कसाबसा रात्रभर तेथे मुक्काम करून आम्ही सकाळी ५–३० ला पुन्हा प्रवासास सुरुवात केली. हे जे पराट गाव आहे त्या ठिकाणीं बसेस बहुशः मुक्काम करतात. अशा ठिकाणी प्रवाशांसाठी चांगल्या अतिथिगृहाची सोय वाहतूक खात्याने करणे जरूर आहे. सर्व प्रवास घाटातला असल्याने आता रस्ता रुंद केला

आहे व एक जाणारी व एक येणारी बस अशी दुहेरी वाहतूक बरीचशी व्यवस्थित होते. त्या प्रचंड पर्वतराजीतून हा रस्ता काढलेला असल्यामुळे ठिकठिकाणी तो वारंवार नादुरुस्त होत असतो व त्या ठिकाणी दुरुस्तीचे काम चाललेले असते. अशा या रस्त्यावर गाडीला कोणी मागे टाकून पुढे जाण्याचा प्रयत्न करायचा नसतो. पण समोरून येणाऱ्या एका ट्रकवाल्यानें दुसऱ्या ट्रकवाल्याला मागे टाकण्याचा प्रयत्न केलाच व त्याची गाडी नेमकी त्याने आमच्या बसवर घातली. एकावेळी तीन गाड्या जाणे दुरापास्त होते पण मेहरबानी एवढीच झाली की मध्ये गाडी घालणाऱ्याने न घाबरता गाडी रेटून तशीच दोन्ही गाड्यांमधून पुढे नेली. त्यामुळे आमच्या गाडीला धक्का बसण्यापलीकडे विशेष काहीही झाले नाही. समोरच्या गाडीच्याही काही फळ्या मोडण्यापलीकडे नुकसान झाले नाही. दोघाही मोटारवाल्यांनी आपसांत फैसला करून आमच्या मोटारवाल्याला त्याच्या नुकसानीबद्दल १०० रुपये दिले व पुन्हा प्रवास सुरू झाला. पुढे मात्र प्रवास सुखरूप झाला. वाटेत परोटे व भाजी घेतली. चहा व कॉफी मिळण्याची सोय झाली. सकाळीं १२ वाजण्याच्या सुमारास श्रीनगरच्या प्रवासी अतिथीगृहात व कार्यालयात येऊन पोहोचलो.

सर्व काश्मीर म्हणजे सैनिकी तळ व छावणी.

पठाणकोटला आपण पोचल्याबरोबरच आपल्याला जे त्या भागाचे विशेष स्वरूप दिसते ते म्हणजे लष्करी छावणीचे. जिकडे तिकडे सैनिक फिरत असतात. त्यांच्या छावण्याही उभारलेल्या आहेत. सर्व काश्मीरभर या सर्व पहाडांमधून व उंच ठिकाणी सैनिकांच्या चौक्या जागोजागी आहेत. रानावनात, पहाडांत व निर्जन जागी अशी एखादीच चौकी बांधलेली असते. त्या ठिकाणी दोनचार सैनिक गस्त घालीत असतात. त्यांचे ते जीवन पाहून मला आपल्याकडील रेल्वे रस्त्यावरील फाटकांचे रक्षण करण्याकरता वस्ती करून राहिलेल्या गेटमनची आठवण झाली. बिचारे एकाकी जीवन कंठीत असतात ! खुद्द श्रीनगरमध्ये

कित्येक एकर जमीन या लष्करी छावण्यांनी व्यापलेली आहे. आपल्याकडील देहूरोडच्या देखाव्यासारखे देखावे तर जागोजाग आहेत. जिप्स रणगाडे व इतर रणसाहित्य मोठ्या प्रमाणावर दृष्टीस पडते. ठिकठिकाणी अशा प्रकारे लष्करी चौक्या व तळ दिसत असले तरी प्रवाशांना काहीच त्रास होत नाही. त्यांचे सामान तपासले जात नाही की सैनिकांकडून त्यांची विचारपूस होत नाही. हल्ली काश्मीरमध्ये जाण्यास कोणालाच प्रतिबंध नाही. मुक्तपणाने संचार करता येतो. युद्धबंदी रेषेजवळ मात्र प्रवाशांना जाता येत नाही. या लष्करावर आपला दररोज लाखावारी खर्च होत आहे व या खर्चामुळे काश्मिरी लोकांच्या जीवनात बदल झाला आहे. लष्कराला जे जीवन साहित्य लागते ते भारी किंमतीला विकत घेतले जाते व काश्मीरमध्ये होणारे अन्नधान्य व भाजीपाला हा लष्कराकडेच बहुतेक खपतो. त्यामुळे तेथील जमीनदार म्हणजे शेतकरी वर्ग चांगला सधन झाल्याचे सांगण्यात येते. अर्थात या गोष्टीचा परिणाम इतर नागरिकांना या वस्तू महाग मिळण्यात होतो. पण सैनिकांच्या वास्तव्यामुळे हिंदुस्थानचा पैसा मोठ्या प्रमाणावर खर्च होत असल्यामुळे काश्मीरमध्ये पैशाची ऊबही चांगली दिसून येते.

काश्मीरमधील या सार्वत्रिक लष्करी सिद्धतेमुळे १९६५ मध्ये जेव्हा पाकिस्तानी घुसखोर व हल्लेखोर आले तेव्हा त्यांना ठिकठिकाणाहून हुसकून लावणे सोपे गेले.

पहाडतला घाट म्हणजे नदीचा काठ

काश्मीरचा पहाड हा हिमालयाच्या रांगातील पहाड असल्यामुळे तो अत्यंत प्रचंड असा आहे. आपल्याकडील सह्याद्री घाटाच्या दुपटी तिपटीने हे पहाड उंच आहेत व खाली दरी म्हणजे खोलच खोल दिसत असते. ह्या पहाडांमध्ये निरनिराळ्या रंगांचे दगड दिसतात व ही पर्वतराजी वनराजीने हिरवीगार दिसते. संध्याकाळचा सूर्य ज्यावेळी आपल्या हातातील कलमाने सर्व सृष्टी रंगवीत असतो त्यावेळी या पहाडावरील

वर्णसंगती फारच आल्हाददायक दिसते व त्यात इतरत्र क्वचित आढळून येणारा हिरवा रंगही पांढऱ्या, पिवळ्या व तांबड्या रंगांच्या मधून मधून दिसतो. हे पहाड वनराजीने युक्त आहेत व हे वृक्ष उंचच्या उंच सरळसोट असून मुद्दाम कोणीतरी ते आखून लावलेले असावेत असे ओळीने उभे असतात. आपण पहाडातल्या रस्त्याने जाऊ लागलो म्हणजे नदीच्या काठाने जातो की काय असे वाटते. आपल्याकडच्या घाटातील रस्त्याने जाताना आपल्या बाजूला खोल दरीचे दृश्य दिसते, तसे दृश्य इकडेही अनेक पटीने खोल दिसते. पण त्याबरोबर आपल्याकडे न आढळणारे नदीचे पात्रही त्या खोल दरीत दिसते. कित्येक वेळा ते पात्र बरेच उथळही होते व आपण डोंगराच्या घाटातून जात नसून मैलच्या मैल नदीच्या काठाने चारपाचशे फुटांच्या उंचीवरून जात आहोत असे वाटते. खोल दरीतील ही नदी मध्येच वळण घेते व तेवढ्यापुरता एखादा छोटासा पूल टाकून आपली बस या काठावरून त्या काठावर जाते व पुनः आपला प्रवास नदीच्या काठाकाठाने चालू होतो. या पहाडाच्या सर्व प्रवासात आणखी एक गोष्ट प्रामुख्याने दिसून येते ती म्हणजे ठिकठिकाणी बांधलेले छोटे छोटे रेल्वे पद्धतीचे पूल. लोखंडी हौद दोन खांबावर टाकला की, पूल झाला. काही ठिकाणी दोन पूल बांधले आहेत व श्रीनगरच्या जवळपास मात्र मोठे पाचसहा कमानी व मत्स्याकार असलेले पूल आहेत. प्रचंड व भव्यपणा, जलसमृद्धी व हिरवीगार वनराजी यामुळे काश्मीरच्या पहाडातून जातानाही मन प्रसन्न राहते.

हाऊस बोटींची हौस

आम्ही श्रीनगरला येऊन पोहोचलो. सामान खाली उतरवून घेतले नि हाऊस बोटवाल्यांनी आम्हांला घेरले. तीर्थक्षेत्री ज्याप्रमाणे पंडये अगर बडवे येऊन प्रवाशाला घेरतात व त्याला काही सुचू देत नाहीत, तसेच येथेही झाले. जो तो आपल्या बोटीचे वर्णन करून आपलीच बोट कशी चांगली आहे हे सांगू लागला. त्या गोंधळात बोट निश्चित करणे अवघड

होते. बाळासाहेबांनी त्यातून शेवटी मार्ग काढला. आमचे जेवण झाल्यावर आम्ही काय ते ठरवू असे म्हणून त्या सर्वांना वाटेला लावले व टूरिस्ट ऑफिसमध्ये जाऊन काय ते ठरवण्याचे आम्ही मनाशी ठरविले.

आम्ही तिथल्या हॉटेलमध्ये जेवण्यास गेलो. त्या ठिकाणी थाळीतले जेवण नाही. प्लेटवर जेवण. आपण जेव्हा भात पोळी, भाज्या यांची मागणी करू तेव्हा ते ते पदार्थ एका एका प्लेटमधून यावयाचे. प्लेट मात्र मोठी होती. त्यामुळे आम्ही भाताची एकच प्लेट मागवून तिघांनी घेतली. भाज्यांच्या प्लेट्सही अशाच मोठ्या होत्या. त्यातील आलुमटार ही भाजी म्हणजे बटाटे व मटार. सर्वत्र ही भाजी विशेष होती. काश्मीरमध्ये मटार चांगला होतो व त्यामुळे स्वस्तही असतो. आम्ही गेलो त्या वेळी ठिकठिकाणी ६५ पैशांपासून एक रुपयापर्यंत चांगला, ताजा, हिरवागार व कोवळा मटार मुबलक मिळत होता. दुसरी पालकच्या भाजीची प्लेटही अशीच चांगली होती. दह्याची एक प्लेट मिळाली. असे एकंदर ६ प्लेट जेवण आम्ही पाचजणात घेतले व त्याचे एकंदर बिल मागवले तर ते चांगले ३१ रु. आले. आम्ही खाल्ले काय तर चपात्या, भात, भाजी नि दही. काश्मीरच्या पुढील खर्चाची नांदी तर चांगलीच झाली.

जेवण झाल्यावर आम्ही हाऊसबोटीच्या शोधाकरता टूरिस्ट ऑफिसमध्ये गेलो. तेथे एक पंधरा-सोळा वर्षांचा छोटा मुलगा चांगला नीटनेटका पोषाख करून उभा होता. त्याची ए क्लासची हाऊस बोट होती. काश्मीरला आल्यावर हाऊस बोटीतच राहावयाचे असे आम्ही ठरविले होते व मुंबईहून आम्हांला निरोप देताना आमच्या बंधुराजांनीही जलतरंगिणीच्या मजेचे सूतोवाच केले होते. त्यामुळे हाउस बोटीवरच राहावयाचे आम्ही ठरविले होते. पण ते कोणत्या ? त्या ठिकाणी तीन प्रकारच्या हाऊस बोटी असतात. एकॉनामिक, फर्स्ट-क्लास व स्पेशल क्लास. आम्ही प्रवासाला निघतान बोट रिझर्व्ह केलेली नसल्यामुळें आपल्याला बोट मिळते की नाही याची शंका वाटत

होती. त्या ऑफिसरने आम्हाला त्या मुलाच्या बरोबर जायला सांगितले व त्याने आपली बोट दाखवून पसंत असल्यास तेथे राहा असे सुचविले. आम्ही ताबडतोब टॅक्सी करून त्याच्या बोटीच्या ठिकाणी गेलो. बोटीमध्ये दोन झोपावयाच्या खोल्या, त्यांना लागूनच संडास–बाथरूम, त्यातील एकीत आपल्या पद्धतीचा संडास व दुसरीत पाश्चात्य पद्धतीचा होता. बाहेर बेसिन, पुढे जेवणघर व त्याच्या बाहेर लागूनच बसायची सुसज्ज खोली. ड्रॉइंगरूम किंवा हॉल. सगळीकडे विजेचे दिवे. बेडरूममध्ये दोन दोन पलंग. एकंदरीत आपण एखाद्या चांगल्या फ्लॅटमध्ये राहावयास आलो आहोत असे वाटावे, अशी ती रचना होती. सर्वच नीटनेटके शोभिवंत होते. आम्हांला जागा तर पसंत पडली. आता भाड्याचा प्रश्न आला. त्या ठिकाणी त्या मुलाचा एक वृद्ध नातलग होता. त्याच्याशी बोलणे करून आम्ही ८० रु. रोज जेवणखाण व राहाणे यांचे द्यावयाचे ठरले. चांगली बोट मिळाली म्हणून आम्ही खुशीत परत टूरिस्ट सेंटरला सामान घेऊन जायला आलो. तेथे आल्यावर पुनः सगळ्या रंगाचा बेरंग झाला.

आम्ही हाऊस बोट ठरवून आल्याचे कळल्याबरोबर जो माणूस पहिल्यापासून आमचे मागे होता तो खवळला. त्याने ८० रु. फार कमी होतात, तुम्हांला ती बोट मिळणार नाही, असे म्हणून त्याने त्या मुलाला बाजूला घेतले. लगेच तीनचार लोक जमा झाले. शेवटी ९० रु. वर तडजोड झाली व आमचे सामान हमालांनी हलवून टॅक्सीत ठेवले. या सर्व प्रकारात टॅक्सीचे मीटर फिरतच होते व पैशाचा आकडा पाच रुपयांवर गेला. शेवटी दोन टॅक्सींतून आम्ही त्या बोटीच्या जागी आलो. ती बोट दाल लेक मधली चांगल्या वस्तीतील होती, असे आम्हांला त्याने सांगितले होते. परंतु ती बोट प्रत्यक्ष उभी होती चिनार बागेतल्या नदीच्या पात्रात. आम्ही दाल लेक संबंधी विचारताच दुसऱ्या दिवशी तिकडे घेऊन जायचे त्याने कबूल केले. संध्याकाळी बाहेर दुकानातून फेरी मारली. वातावरण उत्साहजनक नव्हते. पाऊस बराच झाला होता.

हवाही थंड पडली होती. चिखल होता. वारे झोंबत होते. प्रसन्नता नाहीशी झाली होती. रात्री बोटीत मुक्कामाला आलो व जलतरंगिणीचा पहिला दिवस सुरू झाला.

आमची जलतरंगिणी

आपल्याकडे ज्याप्रमाणे घरेदारे, जमीनजुमला हे घरंदाजपणाचे लक्षण समजले जाते त्याप्रमाणे या जलतरंगिणी या लोकांमध्ये घरंदाजपणाचें लक्षण समजल्या जातात व त्यामध्ये हिस्सेदारीही निर्माण होते. ओडियन नावाची आमची ही बोट पूर्वी एका इंग्रज अधिकाऱ्याची होती. हे बोटीचे खूळ इंग्रज लोकांनी इकडे आणले. जर्मन नाव त्यांनीच ठेवले होते. त्या इंग्रज अधिकाऱ्याकडे आमच्या या बोटमालकाचे आजोबा नोकरीस होते. त्यांना स्वयंपाकपाणी चांगले येत असे. त्यामुळे त्या अधिकाऱ्याची त्यांच्यावर चांगली मर्जी बसली. पुढे तो अधिकारी युद्धात मरण पावला. तेव्हा त्याच्या बायकोने ही बोट या मुलाच्या आजोबाला बक्षीस म्हणा, सवलतीच्या किंमतीने म्हणा दिली व तेव्हा-पासून या लोकांचा हा हाऊस बोटीचा धंदा चालू आहे. या बोटीला २० हजार रुपये लागले असे त्यांच्या सांगण्यात आले. बोटीत दिवाण-खान्यात चांगले गालिचे घातलेले होते. उत्तम कोच होते. डायनिंग टेबल छान होते. काम सगळे झोकदार होते. तेव्हा ते म्हणत होते त्या सुमारास त्यास ती किंमत पडली असेल असे म्हणावयास हरकत नाही.

संध्याकाळी घरी आल्यावर आमच्या बोटीचे मालक आपला परिचय करून देऊ लागले. त्यांनी सांगितले, आपण या बोटीत निःसंकोचपणे राहा. इथे बाहेरचा कोणी येणार नाही. आमच्या या बोटीला लागूनच या मालकाची छोटीशी बोट होती. ते आमच्या बोटीचे स्वयंपाकघर. त्यातच ही मालक मंडळी राहत होती. आमच्या बोटीचा मालक ५–६ महिन्यांपूर्वीच वारला होता. त्याला दोन बायका होत्या. अर्थात आता

जिवंत एकच होती. तिची मुलेबाळे, पूर्वीच्या बायकोची मुलेबाळे असा मोठा परिवार होता व त्या सर्वांची गुजराण या पथिकाश्रमावर चालत असे व हा धंदाही वर्षातून आठ महिने जेमतेम चालतो. ऑक्टोबर नोव्हेंबरला एकदा बर्फ पडू लागले की, सर्व व्यवहार थंडावले. बाहेरून कोणी येत नाही. सर्वजण गावात असतात. तेही घरातच कांगडी (शेगडी) घेऊन आपल्याला ऊब आणीत असतात. एकंदरीत हे कुटुंब अगदी गरीब होते. घरी खायला म्हणजे जाडया भरडया तांदळाचा भात. त्या भाताला ना तूप ना कालवण. थोडीफार भाजी केली तर केली. बोटीचा मालक चांगला खानसामा होता. त्यामुळे तोच सर्व स्वयंपाक पूर्वी करीत असे. घरच्या बायकामाणसांना पुरेसे पदार्थ करणे माहीत नव्हते. त्यांच्यावर एकदमच या धंद्याचे ओझे पडले होते. तरी पद्धत मात्र साहेबी थाटाची होती.

सकाळी उठल्याबरोबर ब्रेकफास्टची तयारी टेबलावर सुरू व्हायची. आमच्यामध्ये मी व विजू—आमची मुलगी — कॉफी पिणारे व बाकीचे तिघेजण चहा पिणारे. दोघांच्या दोन तऱ्हा. थंड हवेमुळे गरम पाणी ताबडतोब थंड होत असे. पुनः पुनः दूध गरम करून आणावे लागे. हे सर्व ते लोक न कंटाळता करीत असत; मालकाच्या डोक्यावर जी फरची टोपी होती तिची किंमत म्हणे २५० रु. होती. त्याच्या सांगण्यात आले की, अशा टोप्या हजार हजार रुपये किंमतीच्या असतात. अगदी गर्भातल्या कोवळया बकरीच्या-मेंढीच्या कातडयाचा उपयोग अशा टोप्यांसाठी केलेला असतो. त्याच्या अंगावरील केसांचा कोटही असाच पोकळ शिवणीचा ३५०-४०० रु. चा होता. एकंदरीत येथील लोकांचे कपडे पोकळ शिवणीचे दिसले. लोकही गोरे व रेखीव अंगाबांध्याचे व चेहऱ्याचे असतात. आम्ही आता त्या गरीब कुटुंबातच रहात होतो. पण त्यांच्या कुटुम्बातील माणसे चांगली सुस्वरूप होती.

आम्ही पाण्यावर होतो पण पाण्यावर असल्यासारखे विशेष वाटत नव्हते. ती बोट काठावर दोरांनी चांगली गच्च बांधून ठेवली होती. फारशी हालत नव्हती. म्हणजे दगड-मातीच्या घरात राहण्याऐवजी लाकडी घरात रहात होतो एवढेच. फळ्यातून खाली पाणी दिसावयाचे. पाऊस पडल्यामुळे त्या दिवशी गारठाही होता. आमच्या हाऊस बोटीत रेडिओही होता. पण त्यावर आझाद काश्मीर व पाकिस्तान यांचेच कार्यक्रम ऐकावयास मिळत.

दुसऱ्या दिवशीही पाऊस चालूच होता. आम्ही सकाळी कुठे बाहेर पडलो नाही. आमची बोट डललेकला जायला पाहिजे असे आम्हांस वाटत होते. कारण कोणीतरी सांगितले होते की, चिनारबागेपेक्षा दाल लेक चांगले ! त्यामुळें आपण चिनारबागेतून दाल लेकला कधी जातो असे होऊन गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी आमची बोट चिनार-बागेतून डललेकला जायला निघाली. आमचे घर आता तरंगू लागले. वल्ह्याच्या अनुरोधाने आम्ही दाल लेककडे चाललो. मध्ये जरा आमची बोट थांबली. एका पुलाखालून ती जायची होती. दाल लेकची पाण्याची पातळी उंच होती. पाणी उतारावरून खाली जाते. पण आता आम्हांला ते चढणीवर चढायला पाहिजे होते. त्यासाठी त्यांनी युक्ति केली होती. दाल लेकमध्ये पाणी दरवाजातून सोडले होते व त्यामुळे त्या पुलाच्या तेथे पाण्याची पातळी वाढत होती व ती वाढली कीं दाल लेकमध्ये प्रवेश करणे सुलभ होते. मानवाने आपल्या बुद्धिचातुर्याच्या जोरावर निसर्गा-कडून अशी सेवा परोपरीने करुन घेतली आहे व आपले जीवन सुसह्य व आल्हाददायक करून घेतले आहे. शेवटी आम्ही दाल लेकमध्ये तरंगत्या घरातून स्थिर घरापर्यंत आलो. म्हणजे आमची बोट एका ठिकाणी स्थिर झाली. पावसाचा रंग असल्यामुळे आम्ही घरातच राहिलो. दुपारी निगिन लेकच्या फेरीस निघालो. पावसाचे मान कायमच होते. थोडी उघडीप अधून मधून होत होती.

तळ्यातील फेरफटका

निगिन लेकला जाण्याचा कार्यक्रम दुपारी आमच्या बोट मालकानी आखला. आमच्या बोटीच्या दारात पाण्यातच एक शिकारा म्हणजे छोटी बोट दुपारी ४ च्या सुमारास येऊन उभी राहिली. या शिकाऱ्याचे नाव होते सोनेरी निशाण–गोल्ड फ्लॅग. ही बोट आमच्या बोटीच्या पायऱ्यांशी येऊन लागली. बोटीत वर थोडेसे आच्छादन होते. आत चांगल्या प्रशस्त गाद्या घातल्या होत्या. त्यांवर मागे रेलून पाय सोडून गादीवर लोळल्या-सारखे पडावे लागत होते. आभाळ भरून आले होते. आदल्या दिवसा-पासून चालू झालेला पाऊस त्या दिवशी सकाळी पडतच होता व आता केव्हा पडेल हे सांगता येत नव्हते. परंतु आम्ही निघालो त्यावेळी मात्र आमच्या सोनेरी निशाणाला सूर्याच्या सोनेरी किरणांची साथ मिळत होती हे निश्चित. आमची फेरी निगिन लेककडे होती. नाव वल्हवणारा एकटाच होता. आम्ही सर्वजण ऐटीत पडलो होतो. तासन् तास पाण्यावर तरंगत जाण्याचा माझा पहिलाच अनुभव ! खाली पाणी व वर आकाश असे किती वेळ तरी होते. निगिन तलावात प्रवेश करीपर्यंत आम्हाला नाल्यांतून जावे लागले. आजूबाजूला थोडी वस्ती दिसत असे. पण अगदी तुरळक भाजीपाला चांगला लावलेला दिसला. जवळच कमळाची बने दिसत होती व असे आम्ही पाण्यावर तरंगत जात असतानाच समोर एका अगदी छोट्या होडीत गुलाबाची व इतर फुले घेऊन जाणारा माणूस दिसला. तो फुले विकणारा माळीच होता. आपल्याकडे गाडीत भाजीपाला विकणारा जितक्या लीलेने येतो तितक्याच लीलेने तो होडीवाला आमच्या शिकाऱ्याकडे आला व त्याने आमच्या शिकाऱ्याला आपली होडी भिडविली. ओसरीवर येऊन आपण भाजी घ्यावी तितक्याच सहजतेने तो आमच्याबरोबर फुलांचा व्यापार करीत होता. त्याने मोठमोठी गुलाबाची रंगी-बेरंगी फुले तर दिलीच पण इतरही रंगी-बेरंगी अनेक जातीची फुले दिली. फ्लॉपच्या जातीची ती फुले होती. या फुलाबरोबरच त्याने त्या फुलाच्या बियांची

पाकिटेही दिली व आम्ही जवळ जवळ १० रुपयांचा व्यापार शिकाऱ्यात बसून शिकाऱ्यातून जाता जाता केला. बोटी-बोटीची धडक बसणे यात त्यांना काहीच वाटत नाही. आपण थोडेसे भ्याल्यासारखे दाखविले तर ते आपल्याला 'कुछ परवा नही' असे म्हणून पुढे चालायला–वल्हवायला लागायचे. नाल्यातून आम्ही निगिन लेकमध्ये आलो. तेथूनच त्या शिकारावाल्याने आम्हांस काश्मीरच्या राजाचा राजवाडा दाखविला व त्याची कमळाची बागही दाखविली. त्या बागेला पाण्यातच कंपौउन्ड होते व त्याच्या जवळपास जाण्यास इतरांना बंदी होती. तेथूनच आम्हांला एक बोटीवर एक बाई अशी लांब जाऊन उडी मारून पाण्यावर फेऱ्या मारताना दिसली. ह्या बोटीला स्नानाची बोट किंवा 'बेदिंग बोट' म्हणतात. बराच वेळ पाण्यावर राहिल्यावर जमिनीवर कुठे तरी उतरावे असे वाटले. समोरच एक इमारत दिसत होती. ती इमारत एका क्लबची होती. आमच्या सोनेरी निशाणातून आम्ही खाली उतरलो. वर चढून गेल्यावर एक क्लब व बऱ्याच इमारती दिसल्या. आम्हाला अशी माहिती लागली की, ही सर्व जागा सरकारने लाख रुपयाला घेतली. सौदा फारच स्वस्तात झाल्यासारखा वाटला.

प्रवासात एक उद्योग म्हणजे खाणे, पिणे, फिरणे व झोपणे. नवीन क्लब दिसल्याबरोबर चहा-कॉफी मिळते की काय व तो आमच्यासारख्या परस्थांना देतात की नाही याची चौकशी केली. तेथल्या व्यवस्थापकाने अगदी हलक्या आवाजात सोय असल्याचे सांगितले. आम्हांला बरे वाटले. बाहेरच्या गॅलरीत आऊन आमच्या बाळासाहेबांनी समोरच्या देखाव्याचे फोटो घेतले व आत येऊन बसलो. थाट सगळा युरोपियन पद्धतीचा. चहा–कॉफीची ऑर्डर दिली व खायला पकोडे मागविले. बिल आले ६ रु. च्या आसपास. एकंदर मामला महागाईत गेला की काय पाहू लागलो. तो गंमत आढळून आली की, चहा–कॉफीचे दर घेताचेच लावले होते परंतु त्या बिलात त्यांनी मेंबरशिपचे ३ रु. लावले होते. पण शेवटी चहा महागातच पडला.

जमीन चोरी

निगिन लेकच्या प्रवासातून परत येत असताना आमच्या सोनेरी निशाणाच्या मालकाने आम्हाला जमीन चोरी दाखविली. जमिनीची चोरी कशी करणार नि अशी चोरी केली तर ती अशी दर्शनीय वस्तू कशी असणार ? जमीन चोरी म्हणजे या तळ्यातल्या पाण्यात लावलेली शेती होय. आजूबाजूला सर्व पाणी पसरले असताना मध्येच एका तुकड्यात धान्य आलेले दिसत होते. ही जमीन तशी टणक नव्हती. परंतु मातीची ढेकळे टाकून व ती एकमेकांजवळ घेऊन एक भूभाग तयार झालेला दिसत असे व त्यावर जमीनदार लोक भाजीपाला वगैरे लावीत असत. हाऊस बोट म्हणजे ज्याप्रमाणे पाण्यावर उभे असलेले लाकडी घर त्याप्रमाणेच ही जमीन चोरी म्हणजे पाण्यावर तरंगत राहिलेली शेतीची जमीन. कुतूहल उत्पन्न करणारी गोष्ट होती यांत शंका नाही.

फॅक्टरीला भेट

काश्मीरला आल्यावर पाण्याचे प्राचुर्य ज्याप्रमाणे सर्वत्र आढळते; त्याचप्रमाणे फॅक्टरी या शब्दाचेही प्राचुर्य सर्वत्र आढळते. आमच्या सोनेरी निशाणवाल्याने एक मोठी फॅक्टरी दाखविण्यास आम्हास नेले. आम्ही फॅक्टरीत शिरलो नि मोठा पाऊस यावयास सुरुवात झाली फॅक्टरीत तळ मजल्यावर कागदाच्या लगद्यापासून निरनिराळ्या वस्तू कशा बनवतात ते सप्रयोग आम्हांस दाखविण्यात आले व आम्ही वर शाली-साड्या व गालीचे यांच्या संग्रहालयात गेलो. त्याने हरतऱ्हेच्या शाली व साड्या दाखविल्या. त्यांत एक गालीचा २२०० रु. पर्शियन गालिच्याच्या पद्धतीचा दाखविला. दुसरा १५०० रु. चा दाखविला. या दोन्हींवरील हरहुन्नर प्रेक्षणीय होते. आमच्यातील अशा वस्तूंची हौशी म्हणजे आमची मुलगी विजू. तिने निरनिराळी नावे घेऊन निदान शंभर प्रकारच्या शाली व साड्या पहिल्या असतील; पण कोणतीच

तिला पसंत पडली नाही. शेवटी मी रिकाम्या हाताने परत कसे जावयाचे म्हणून एक छोटासा आसनवजा पांढरा गालिचा खरेदी केला व आम्ही परत आलो. पाऊस पडतच होता. त्यातच आम्ही आमचा जलप्रवास सुरू केला व आमच्या हाऊस बोटीवर परत आलो. काश्मीरमधील एक दिवस पाण्यावर तरंगण्यात गेला.

झेलम नदीचा उगम

काश्मीरच्या जवाहर बोगद्यातून बाहेर पडल्यावर झेलम नदीच्या उगमाकडे जावयास मिळते. हा एक प्रचंड बोगदा आहे. जाण्याकरता व येण्याकरता असे दोन बोगदे तयार होत आहेत. ते दोन-तीन मैल लांबीचे आहेत. आता सध्या एकाच बोगद्यातून ये-जा चालू आहे. हा बोगदा पूर्ण झाल्यावर तो जगातील मोठ्या बोगद्यांपैकी एक बोगदा होणार आहे.

झेलम ही काश्मीरमधील एक मोठी नदी आहे. तिचा उगम श्रीनगरच्या अलीकडच्या पहाडात आहे. झेलम नदीचे पूर्वीचे नांव वेतस्था, असे आहे. झेलम नदीच्या उगमाच्या ठिकाणी देवाची दोन देवळे आहेत. पुजारी-पंडित तेथे देवाची पूजा सांगतात. जहांगीर बादशहाने या ठिकाणी चष्मा बांधला आहे. नदीचा उगम ५४ फूट खोल आहे व चष्मा वर ५४ फुटावर बांधला आहे. पाणी स्वच्छ आहे. पण आजूबाजूला हिरवीगार झाडी असल्याने सर्व पाणी हिरवेगार दिसते व गार लागते. उन्हाळ्यात बादशहा या चष्म्यातील जागेत येऊन रहात असे. समोरचे मैलभरचे दृश्य सुंदर दिसावे म्हणून त्यांनी कमानीच्या कमानी बांधल्या आहेत. एका कमानींतून दुसरी कमान, त्यातून तिसरी कमान असे सर्व कमानमय मनोहारी दृश्य दिसते. नदीचे पाणी बांधलेल्या कालव्यातून खेळविले आहे व त्याच्या आजूबाजूस रंगीबेरंगी अनेक प्रकारची फुले दिसून मन हरखून जाते. या उगमाच्या मागच्या बाजूस पॉलर झाडाचे बन आहे व ही झाडे एका रांगेत व एका रांगेमागे

दुसरी रांग अशा रीतीने चढत चढत उंच डोंगरभर आहेत. सर्व काश्मीर-भर हीं पॉलर जातीची उंचउंच झाडे व मोठ्या प्रचंड बुंध्याची चिनार झाडे दिसतात. ही झाडे जहांगीर व अकबराने मुद्दाम लावलेली आहेत. काश्मीरमध्ये प्रवेश करताना झेलम नदीचा हा उगम पहिले प्रसन्न स्वागत करतो.

क्षीरभवानीचे देऊळ

वुलर तळे, मानसबाल तळे व क्षीरभवानी ही सर्व ठिकाणे एक दिवसाच्या मोटारीच्या खेपेत पाहावयास मिळतात. काश्मीरमध्ये प्रवाशाना प्रेक्षणीय स्थळे दाखविणे हाच एक मोठा धंदा आहे. त्यामुळे अशी स्थळे दाखविण्याकरता प्रवाशांच्या मोटारी पुष्कळ आहेत. सर्व मोटारींनी आपला संघ केला आहे व निरनिराळी स्थळे दाखविण्याकरता बसेस क्रमाक्रमाने पाठविल्या जातात. साधारणपणे पन्नास–साठ मैलांच्या प्रवासाची आखणी या मार्गावर असते व सकाळी बस निघून परत आपल्यास श्रीनगरला आणून सोडतात. तिकिटे अशी परतीच्या प्रवासाचीच असतात. बऱ्याचशा बसेस नवीन व कोऱ्या होत्या. त्या आतून चांगल्या सजविल्या होत्या. परंतु त्यातल्या बसावयाच्या जागा मात्र तितक्या सोयीस्कर नव्हत्या. पहिल्या दिवशी आम्ही वर लिहिल्याप्रमाणे वुलर तळ्याच्या बाजूने निघालो व प्रदक्षिणा घालून परत श्रीनगरला आलो.

वुलर तळे आम्ही पहाडावरून पाहिले. आम्ही उंच जागी व तळे खाली दूरवर पसरले होते. नजर टाकावी तेथपर्यंत पाणीच पाणी दिसत होते. असे म्हणतात की, काश्मीर हे स्वतःच एक मोठे तळे फार वर्षे होते व पुढे झालेल्या भूकंपामुळे खालून वर पर्वतराजी आली. काश्मीरचा भूभाग आज आपल्याला दिसतो असा तळी व पर्वत यांचा एक उत्कृष्ट सांधा दिसतो.

वूलर तळे पाहून आमची बस खाली उतरली व मानसबाल सरोवराच्या बाजूला आली. तेथे एक सरोवराच्या काठी प्रवाशासाठी उतरण्याची

सोय केली आहे. तेथल्या बागेत जागतिक आरोग्य संघटनेची मंडळीं आलेली दिसली. खेडेगावांतील आरोग्याविषयी त्यांची चर्चा चालू होती. ही चार पाच मंडळी होती व त्याचेंमध्ये स्थानिक अधिकारीही असावेत. समोर टेबल होते व वर दारुच्या बाटल्या दिसत होत्या. चषकातून मद्याचा घोट घेत व चषक रिकामा करीत खेडेगावच्या जनतेच्या आरोग्याचे तक्ते तेथे तयार होत होते !

त्याच ठिकाणी प्रथम काश्मीरमधली जनता दिसली. शाळेतील काही मुले बूट, पॅंटस् व टाय घालून सहलीला आलेली दिसली. बाकीचे सर्व जण प्रवासी होते. थोडचा अंतरावर एका छोटचा खेडचातून गेल्या वर शालीमार बाग दिसली. ती बाग उंच टेकडीवर लावलेंली आहे. वरून खालीं थंडगार पाणी सर्वत्र खेळविले आहे. रंगीबेरंगी फ्लॉप जातीची व इतर फुले मनोवेधन करीत होती. बागेत पाणी खूप होते पण ते पिण्याचे पाणी नव्हते. त्यासाठी दुसरीच सोय करावी लागली.

त्या बागेतील फुलझाडे पाहून आम्ही श्रीनगरला परत यावयास निघालो. एका खेडयात शिरता शिरता कमानी लावलेल्या ठिकठिकाणी दिसल्या. एका जागी लोकही जमलेले दिसले. चौकशी करता शेख अब्दुल्लांची सभा तेथे होती असे समजले. पुढे आमच्या बसमधून जाताना खुद्द शेख अब्दुल्ला उघडचा मोटारीतून जाताना दिसले. तीन-चार मोटारी त्यांच्या मोटारीच्या मागे होत्या व सर्वांच्या मागे पोलीसांची मोटार होती. शेख अब्दुल्लांच्या सर्व डोक्यास टक्कल पडलेले दिसले.

ज्या गावात ही सभा भरली त्याच गावात क्षीरभवानीचे देऊळ आहे. देवळाच्या आत शिरण्यापूर्वी थंडगार पाण्याचा पाट वाहात होता. देवळाचा परिसर खूप विस्तीर्ण व स्वच्छ होता. देवीचे देऊळ तलावात मध्यभागी बांधले आहे. आजूबाजूला आरशांची आरास होती. बाहेरच्या बाजूस ओटीवर पंडित पूजा सांगत होते व मंदिराच्या बाजूच्या पाण्यात फुले टाकू नयेत असे लिहिले आहे तरी सर्व पूजा संपल्याबरोबर पंडितजी ती फुले पाण्यातच टाकीत होते ! ते पाणी स्वच्छ करण्यासाठी

नोकरांची नेमणूक होती सर्व पूजासाहित्यांचे ताट विकत मिळण्याची सोय असल्यामुळे पूजा प्रसन्न चित्ताने करण्यास चांगली सोय होते.

क्षीर भवानीची आख्यायिका आमच्या मुसलमान हाऊस बोटवाल्यानेच सांगितली. ती अशी "क्षीरभवानी ही जागृत दैवत आहे व तिच्या दर्शनाला जायच्या आधी रात्री मांस, अंडी वगैरे काही खायचे नाही व सकाळी आंघोळ करून दर्शनाला जायचे. या नियमाविरूद्ध वर्तन करून एकदा एक जण गेला तर त्याची हाऊस बोट जळून गेली ! क्षीर भवानीचा हा प्रताप मुसलमान लोक सांगतात व त्याप्रमाणे आचरण करण्यास आपणांस भाग पाडतात हे विशेष आहे.

पहिल्या दिवशीची प्रेक्षणीय स्थळे फारशी काही प्रेक्षणीय वाटली नाहीत. म्हणजे त्यात सृष्टीसौंदर्याचा विलास असला तरी काश्मिरचे वैशिष्ठ्य असे वाटले नाही. दुसऱ्या दिवशीचा सोनामार्गाचा कार्यक्रम त्या दृष्टींने वैशिष्ट्य पूर्ण होता.

सोनामार्ग व बर्फ

सोनामार्ग हे श्रीनगरहून ५१ मैल लांब आहे व तेथून साऱ्या २१ मैलावर कारगील ही खिंड आहे. ही कारगीलची खिंड जिंकूनच आपल्या सैन्याने पाकिस्तानला पहिला हादरा १९६५ च्या लढाईमध्ये दिला होता. या वेळचा आमचा चक्रधर फारच धिम्मा होता. परंतु तितकाच समजदार होता. बर्फाच्या डोंगराबद्दल इतक्या दिवस जी आमच्या मनात एक प्रकारची विलक्षण ओढ उत्पन्न झाली होती ती आता पूर्ण होणार होती. श्रीनगरला जाणाऱ्या मोटारीत बसल्यापासून डोंगरावर कुठे बर्फ दिसते की काय म्हणून आम्ही मोठ्या उत्सुकतेने पाहत होतो. आता आम्ही खुद्द डोंगराच्या सान्निध्यातच आलो होतो व बर्फाच्या राशी म्हणण्यापेक्षा बर्फाचे खडकच आम्ही पाहत होतो. बर्फाच्या गाडीत जसे दिसतात तसे अखंड बर्फांचे खडकांच्या खडक पडले होते. अशाच एका बर्फाच्या डोंगराजवळ आमची गाडी आमच्या मोटारहाक्याने

उभी केली होती. गाडीतून माणसे भराभर बाहेर पडली व लहानमोठ्या सर्व उतारूंनी भराभर मनाला येईल तेवढे बर्फ त्या बर्फाच्या डोंगरातून काढून घेतले. तेथे पौंडांचा हिशेब नव्हता. आम्हीही मनसोक्त बर्फ घेऊन खाल्ला व आणखी थोडी मजा केली. लहान मुले बर्फाच्या गोळया-वर रंगीबेरंगी सरबत घालून ती जशी खातात त्याचप्रमाणे आम्हीही बर्फाच्या गोळयावर आमच्या बरोबरचा सुधारस घालून मजेत खाल्ला. आमच्यापैकी काहीजण वर बर्फाच्या माथ्यावर चढून गेले व त्यावरून घसरत खाली आली. बर्फमय डोंगराचे ते प्रथम दर्शन व सान्निध्य मन हरखून टाकणारे असेच झाले.

अर्धा पाऊण तास तेथे घालविल्यावर मंडळी पुनः बसमध्ये बसली व बसमध्येही बर्फाचा संचार सुरू झाला. पुष्कळांनी बर्फाचे गोळे तयार करून हातात आणले होते ते एकमेकांवर टाकण्यास सुरुवात केली. ज्या कोणाच्या अंगावर असा गोळा यावयाचा तो ते गोळे घेऊन दुसऱ्यावर फेकावयाचा बर्फाच्या गोळयाचा हा खेळ दहा-पंधरा मिनिटे चांगला पुरला. जमुना तिरी राम खिलें होरी ही चीज आपल्या पुष्कळांच्या ऐकण्यात आली असेल. त्याचे प्रत्यंतर त्या ठिकाणी चांगले आले.

बस पुढे निघाली ती सोनामार्गाला येऊन पोचली. या ठिकाणी पहिल्या प्रथम आम्हांला घोडयावर बसण्याची संधी मिळाली. तेथे तंबू ठोकून प्रवाशांना एक पंजाबी चहापाणी पुरवीत होता. दरही तसा चापून घेत होता. आपण ज्या कॉफीच्या कपाला चार आणे देतो त्याला तो बारा आणे घेत होता. कारणही उघड आहे. त्याला चार सहा महिन्यात सर्व वर्षाची वेगमी करावयाची होती व प्रवाशांनाही अशा डोंगरकपाऱ्यात आपली शहरी हौस भागवयाची होती ! सगळा काळ काम व वेग !

अवघड जागी जायचे असल्यामुळे घोड्यावरून गेले पाहिजे असे सांगण्यात आल्यामुळे आम्हांला घोड्यावर स्वार होणे भागच पडले. घोडा म्हणून तट्टेच होती ती परंतु त्यावर तरी आम्ही कशाला बसलो

आहे! तसे अगदीच काही आम्ही लवकुशांप्रमाणे 'मागे पुच्छ विशाल त्यास अमुनी ते सारखे हालते' असे अगदीच अनभिज्ञ नव्हतो. आमचे वडील जळगावला पोस्टमास्तर म्हणून काही दिवस होते व तेथे टपाल न्यायला एका घोडेवाल्याला कंत्राट दिलेले होते, त्यामुळे स्टेशनवर टपाल पोचवून आल्यावर ते घोडे मोकळे असावयाचे व आम्ही मुले-मुले मागे लागलो म्हणजे तो घोडेवाला आम्हांला घोड्यावर बसवून आणावयाचा. घोड्यावर बसावयाची प्रथम हौस वाटते पण तो एकदा का थोडा थोडा का होईना पळायला लागला की, सगळी हौस पळून जाते व जीव मुठीत धरून घोडा केव्हा थांबतो व आपण केव्हा खाली उतरतो असे होऊन जाते. पण त्या गोष्टीला ४०-५० वर्षे होऊन गेलेली. त्यानंतर घोडेस्वार होण्याची संधी एखादेवेळी यायची पण तीही आली नाही. त्यामुळे आज घोड्यावर बसायचे कसे तेथून सुरुवात.

पीछे बोजा आगे पाव

तट्टांची उंची तशी काहीच नव्हती. रिकीब व लगाम दोन्ही चांगली होती. परंतु एक पाऊल उचलून दुसरे पलीकडे कसे टाकायचे याची पंचाईत वाटू लागली. शेवटी त्या तट्टाच्या छोट्या मालकाने आमचा भार आपल्या अंगावर घेऊन एकदाचे घोड्याच्या पाठीवर बसविले व लगाम आमचे हाती दिला. तो मुलगा घोड्याबरोबर चालत होता तोपर्यंत ठीक होते. पण थोडासा मागे राहिला व आमच्या स्वाऱ्या पुढे गेल्या. घोडा थोडासा धावू लागला त्याबरोबर आमची घाबरगुंडी उडू लागली. होता होता घोडा एका चढणीवर आला त्याबरोबर आमच्या त्या मुलाने इशारा दिला, "आगे बोजा पिछे पांव" म्हणजे जॉकी जसे बसतात तसे पुढे थोडेसे ओणवे होऊ मागे रिकिब घ्यावयाच्या. चढण संपल्यावर उतरण आली व ती थोडी खबदाडीतली होती. त्याबरोबर आणखीच भीतीने गाळण उडाली. छाती धडधडू लागली. आमच्या त्या मित्राने आता इशारा उलटा दिला "पीछे बोजा आगे पाव" रिकिबी पुढे करा-

वयाच्या व मागे छाती काढून बसावयाचे. ते घोड्याचे मालक छोटी मुले होती पण मोठी रसिक होती. एकाची होती घोडी व दुसऱ्याचा होता घोडा. त्याने त्यावर छोटीशी काव्य-पंक्ति तयार केली.
'हमारी घोडी, तुम्हारा घोडा, पिछे पिछे चाल रहे है, साथी साथी नही नहीं चलेंगे ॥ "

अशा रीतीने आमच्या स्वाऱ्या बर्फाच्या डोंगराच्या माथ्यावर आल्या व आम्ही बर्फाच्या डोंगराला यथेच्छ तुडवून घेतले. वरून थंडगार बर्फाचे पाणी येत होते व आम्ही त्या बर्फावरून इकडून तिकडे जात होतो. ज्यांच्या पायांत नुसत्या चपला होत्या त्या घसरून पडत होत्या. माझे बूट असल्यामुळे मी घसरून न पडता सहीसलामत रिंगण घेऊन परत सुखरूप पोचलो. पुन्हा घोडेस्वार आला. थोडीशी भीती कमी झाली. घोड्यावर सफाईने स्वार झालो. उतरलोही सफाईनेच.

एकंदरीत सोनामार्ग सोन्याचा ठरला !

हीच ती दूधगंगा

सोनामार्गाने उल्हासित झालेले आम्ही तिसऱ्या दिवशी दूधगंगेकडे गेलो. श्रीनगरहून ३० मैलांवर ७८०० फूट उंचीवर हे स्थळ आहे. तेथेही घोडी तयार होती. आता घोड्याची भीती कमी झालेली होती. घोड्यावर बसायला थोडी उमेद वाटत होती. आम्ही गेलो त्यावेळेला पाऊस खूप झाला होता. दूधगंगा फारशी लांब नव्हती, तरी चिखल सगळीकडे झाला होता म्हणून घोड्यावरून जाण्यासाठी मन वळविण्यात येत होते. घोड्यावर स्वार होऊन निघालो. प्रथम सोनामार्गाइतकी चढण लागली नाही. सपाटीवरूनच जवळ जवळ आम्ही घोडचाल केली. पुढे मात्र फार अवघड रस्ता म्हणजे दरडच होती ती. घोड्यावर बसून अशा दरडीवरून खाली जायचे म्हणजे पुनः जीव मुठीत धरून बसावे लागे. अशा खडतर प्रवासातून एका डोंगराच्या टोकावर आलो. तेथून खाली पाण्याचा खळखळणारा प्रवाह दिसू लागला. घोडा तेथेच सोडून

आम्ही चालत खाली उतरलो. पलीकडच्या बाजूला उंच डोंगर होता व आमच्या बाजूला उंच दरड होती. या दोन डोंगरांमधून हा पाण्याचा प्रवाह खळखळाट करीत येत होता व प्रवाहामधील दगडावरून पडताना दुधासारखा पांढरा प्रवाह कोसळत होता. पाणी अगदी थंडगार होते. कितीतरी वेळ त्या थंडगार पाण्यात पाय सोडून बसल्यावर आम्ही वनभोजनास मागे गेलो. दूध व पाणी व पाणी व दूध यांचा संगम एकमेकांत कसा होतो हे दृश्य शहरवासीयाना अपरिचित नाही. पाण्यासारखे दूध नेहमीच पहावयास मिळते. पण दूधासारखे पाणी मात्र येथेच पाहावयास मिळते व दूधगंगेचे माहात्म्य त्यामुळे विशेष वाटते!

दूधगंगेच्या त्या अवघड वाटेने पुनः परत आलो व समोरच हिरवीगार गवताने आच्छादलेली टेकडी होती त्यावर पायी चढून गेलो. वर चढायला फारच मजा वाटत होती. स्टेडियमवर जशा लांबच लांब पायऱ्या व बसायची सोय असते, त्याप्रमाणे त्या टेकडीला आपोआप प्रशस्त पायऱ्या झाल्या होत्या. उतरतानाही एकदम उतरण नसल्यामुळे सुरक्षितता वाटत होती. अशा हिरव्यागार पाचूच्या गवती टेकड्या काश्मीरमध्ये ठिकठिकाणी दिसून येत होत्या व मनाला आल्हादहि देत होत्या.

गुलमर्ग : बाबा ऋषी

चौथ्या दिवशी आम्ही गुलमर्गला जायचे ठरवले. गुलमर्ग हे ७–८ हजार फूट उंचीवर. तंगमार्गापर्यंत आम्ही बसमधूनच गेलो. तेथून दोन मार्ग गुलमर्गला जायला होते. एक जवळचा पण अडचणीचा आणि अवघड होता व दुसरा सरळ पण लांबचा व वळणावळणाचा होता. मागील दोन्ही खेपेस आम्ही घोड्यावरून गेलो पण तेथे घोड्याची गर्दी नव्हती. या ठिकाणी एका आवारात चार-पाचशें घोडे त्यांच्या त्या खिदमतगारांबरोबर होते. आपल्याकडे अजूनहि जशी बऱ्याच ठिकाणी एस्. टी. पकडण्यासाठी गर्दी व झिम्मड उडते तशीच आम्ही

प्रवाशांची या घोड्याच्या ठिकाणी गर्दी उडाली. या घोड्यांची वाटणी व्यवस्थित व्हावी म्हणून तेथे पोलिस होते. परंतु त्यांनाही अद्याप व्यवस्थित शिस्त लावण्याचे धोरण ठरविता आले नव्हते. दादरला किंवा बोरीबंदरला आता टॅक्सी मिळण्याची व्यवस्थित सोय झाली आहे तशी येथे झालेली दिसली नाही. त्यामुळे पंक्तित शिरून पाट पकडल्याखेरीज जेवण मिळत नाही तसे आम्हालाही गर्दीत शिरून आपली सोय लावण्याखेरीज गत्यंतर नव्हते. तेथे घोड्यांचा एकच आरडाओरड व गोंधळ चालू होता. त्यातच आम्हीही आमचा सूर मिसळला व पाच घोडे पाच घोडे असे मागायला सुरुवात केली. शेवटी अर्ध्या तासाच्या झगड्यानंतर आम्हा पाची जणांना घोंडे मिळाले व आम्ही आमची घोडदौड चालू केली. दोन दिवसांच्या सरावाने आज घोड्यावर बसण्यात इतके अवघड वाटले नाही. घोड्याला आपण लगाम खेचून आपल्या ताब्यात ठेवू असा आत्मविश्वास आला. घोडं थोडंसं पळालं तरी तितकी धास्ती वाटेनाशी झाली व घोडेस्वाराची थोडीशी ऐट आणता आली. आम्ही सर्व प्रवासी घोडेस्वार गुलमर्गच्या मार्गाला लागलो. आमची प्रवाशांची एकमेकांची इतकी ओळख नव्हती. परंतु त्या घोड्यांची होती. त्यामुळे ती घोडी एकमेकांना चावायला यायची नि मग आमची भंबेरी उडायची. रस्ता घाटातला तसा अरुंदच. थोडंसं घोडं उधळल तर खाली दरीत कोसळण्याची भीती. पण शेजारी तो खिदमतगार असायचा. त्याला हांक मारली की मग काम भागत असे.

घोड्यावर बसण्यात सौकर्य होते पण मजल फार लांबची व चढणीची होती. त्यामुळे घोड्यावर बसण्याचा काळ फार दीर्घ होता. इतका वेळ मला काही घोड्यावर बसवले नाही. मी मध्येच उतरून थोडा वेळ पाय मोकळे केले. इतक्यात तो खिदमदगार आला व म्हणाला, "इथे जवळच बाबा ऋषीचे स्थान आहे. तिथे सर्वच पाय मोकळे करणार आहेत. तर आपण तेथपर्यंत जाऊन थांबू या." त्याप्रमाणे त्या स्थानापर्यंत आम्ही गेलो.

नावावरून बाबा ऋषी म्हणजे कोणीतरी हिंदू बाबा असावा असे वाटले. पण तो आहे एक पीर. त्या पिराच्या जवळ बायकांना जायची बंदी आहे. आम्ही आत गेलो. प्रतापगडावर ज्याप्रमाणे अफजुलखानाची कबर सजविली आहे, त्याप्रमाणेच हा पीरही सजविला आहे. आत दिवाबत्ती आहे. एकंदर वातावरण पवित्र व सुगंधमय होते. बायकांना जरी आत प्रवेश नसला तरी बाहेरच्या आवारातून त्यांना झरोक्यातून दर्शन घेता येते व तेथे त्या मोठमोठ्याने रडून आपला नवस सांगतात. ही कबर बरीच जुनी असल्याचे सांगण्यात येते. तेथे प्रवासाचा अर्ध-विराम होता.

तेथून पुन्हा प्रवासास सुरुवात झाली. मग मात्र घोड्यावरचा प्रवास छान झाला. एका दमात वर गेलो. घोड्यावरून उतरल्याबरोबर पहिली गोष्ट जेवणाची. बाहेरच एका हॉटेलवाल्याने सोय केली होती. तेथे आम्ही आमच्या शिदोऱ्या सोडल्या व त्याच्याकडून काही ताजे पदार्थ मागविले. जेवण झाल्यावर थोडी सुस्ती आली. तो वर बंगला रिकामा होता. तेथे विश्रांती घेण्याची त्या हॉटेलवाल्याने परवानगी दिली. या बंगल्याचे भाडे दरमहा हजार रुपयांपर्यंत असते. गुलमर्गला मला वाटले नावाप्रमाणे गुलाबाची फुले खूप असतील पण तसे काहीच आढळून आले नाही. तेथे गोल्फ क्लबसारखे क्लब आहेत. बाकी मग टेकड्या व पटांगणे. एक देऊळ आहे. बाकी मानवी संस्कृतीची फारशी स्थाने दिसली नाहीत. फौजी अंमल जास्त दिसला. तो साहजिकही होता. येथून जवळच युद्धाच्या चकमकी झाल्या होत्या.

वादळात सापडलेला सोमदत्त

काश्मीरच्या प्रवासात आठवण राहण्यासारखी गोष्ट घडली ती पुढेच. वर असतानाच पाऊस पडायला सुरवात झाली होती. घोडेवाल्यांची खाली जायची घाई सुरू झाली. खाली जायला दोन–तीन तास तरी लागणार होते. तसेच पावसात आम्ही घोड्यावर तर बसलो. अपेक्षा

अशी होती की, पाऊस जाईल व आपण थोडेसेच भिजू. परंतु अपेक्षेचा भंग झाला. पावसाने उग्र स्वरूप धारण केले. आम्हाला धड खालीही उतरता येईना व पुढेही जायचे जमेना. तसेच रेटत चालले होतो. हात अगदी गारठून गेले. बोटेही वळेनात. लगामाची खेच करणे कठीण जाऊ लागले. त्यातूनच माझा घोडा दरीच्या बाजूच्या कडयावरून जाऊ लागला. नि इतक्यात गारांचा वर्षाव सुरू झाला. 'गंडस्योपरि पीटिका संवृत्ता' आधीच गळू होते त्यात आता गाठ उत्पन्न झाली. डोक्यावर, अंगा–खांद्यावर गारांचा मार बसू लागला. पावसाचा जोर काही कमी होईना. आश्रय घ्यायलाही जागा मिळेना. शेवटी एका झाडाच्या आश्रयाने आम्ही उभे राहिलो व कुडकुडत पुन्हा घोडयावर बसलो. त्या घोडेवाल्याला विचारले तर तो म्हणाला, असे अचानक पाऊस नेहमीच येतात. पण त्यात आम्ही भिजलो तरी ते आम्हांला बाधत नाहीत. हा गारांचा पाऊस इतका मोठा होता की, त्याची बातमी मुंबईपर्यंत गेली होती. आम्ही मुंबईला गेल्यावर आम्हांला पहिला प्रश्न हाच विचारला गेला. गुलमर्गला जाताना पावसाळी कोट जरूर बरोबर घ्यावा. आम्हा प्रवाशांपैकी एकजण या धांदलीत घोडयावरून खाली पडला. एकजण घोडयाच्या मानेला बिलगून बराच वेळ तसाच लोंबकळत राहिला. बरेच जण जे पायी येत होते ते गारांच्या ढिगावरून जाता जाता खाली घसरून पडले. अशी अनेकांची अनेक प्रकारची दैना झाली. पण आम्ही खाली येईपर्यंत पुन्हा ऊन पडले. सृष्टीदेवी स्मितहास्य करू लागली. वाटेत एका औषधी वनस्पतीची लागवड केलेली आम्हांस आढळून आली.

पहेलगाम

श्रीनगरहून पहेलगाम हे ६१ मैलांवर आहे. हे एकंदरीत माथेरान-महाबळेश्वरासारखे हवा खाण्याचे ठिकाणच जास्त वाटले. तेथे मोठमोठी हॉटेल्स आहेत व राहण्याचीही सोय आहे. काही ठिकाणी वळणे

फार अवघड आहेत. पहेलगामला जाताना मला वाटेत मेंढपाळ ठिकठिकाणी मेंढ्या घेऊन चाललेले दिसले. त्यावरून त्यावेळीच मला एक कविता सुचली ती त्या वेळीच मी लिहून ठेवली ती अशी :

काळावर स्वार

जगास बदलतो भीष्म प्रतिज्ञा करी अशी काळा मेंढपाळ हा तसाच राहिला काळावरचा स्वार ॥ राजा बदले काळास, काळ बदलतो सत्तेस, जग बदलते मानवास, मानव बदलते स्वतःस, मेंढपाळ हा तसाच राहिला स्वस्थपणाने पाहात ।। येती गाड्या-घोडे विमाने, राजे नि सैन्य, मेंढ्या घेऊनी मेंढपाळ हा पाहि तया, सुमने मेंढपाळ हा काळावरती स्वार राहिला कायमचा ॥

दि. १-६-६८ पहेलगामाहून परत आल्यावर श्रीनगरमध्ये मुक्काम करून काही खरेदी केल्यावर आमचा काश्मीरचा प्रवास संपला.

काश्मीरमधल्या बागा

पहेलगामाहून आल्यावर दुसऱ्या दिवशी आम्ही शिकाऱ्यातून श्रीनगरच्या सर्व बागा पाहिल्या. त्या मोंगलांच्या कारकीर्दीत तयार झाल्या आहेत. त्या मोंगलांच्या विलासी स्वभावाच्या साक्ष देणाऱ्या आहेत. या बागांतून पाणी निरनिराळ्या धबधब्याच्या स्वरूपात खेळविले आहे. बागा कायमच्या रंगीबेरंगी फुलानी खुलेलल्या व फुललेल्या दिसतात. या सर्व बागा विस्तीर्ण आकाराच्या आहेत. कौतुक एवढेच वाटते की, मोंगलांच्यानंतरही काश्मीर अनेक राजांच्या हाती गेला तरी या बागांतली कारंजी तशीच थुयीथुयी नाचत राहिली, पाण्याचे धबधबे इंद्रधनुष्यी रंगांनी धो धो पडत राहिले व रंगी-बेरंगी फुले तोच रंग भरत राहिली. मूळ व्यवस्था करणारांची शहामत जशी त्यात आढळून येते तशी त्या बागा राहू देण्याची व त्यांची शान राखण्याची दक्षता सर्व राजांनी घेतली ही मोठी भूषणावह गोष्ट आहे. नाहीतर बागांचे वैराण ओसाड रान व्हावयास काहीच वेळ लागला नसता !

हजरत बाल

हल्लीच्या काश्मीरच्या इतिहासात हजरत बाल चोरीचे प्रकरण बरेच रंगलें होते. हजरत बाल म्हणजे महमंद पैगंबराचा केस. हा केस मदिरेहून सय्यद अब्दुलाने १६११ मध्ये आणला. तो एका पेटीत ठेवला आहे. वर्षांतून चार वेळा या ठिकाणी जत्रा भरते व त्यावेळी या केसाचे लोकांना दर्शन मिळते. मशीदीची वास्तु भव्य आहे व आवारही प्रचंड आहे. आम्ही गेलो त्यावेळी दर्शनाचा दिवस नसल्यामुळे खिडकीतून लांबून केस आहे असे सांगण्यात आले. सर्वसाधारण माणसाच्या केसाने म्हणे गळा कापला जातो. परंतु या हजरत बाल चोरीनें एका मंत्रीमंडळाचा गळा कापला गेला व दुसरे मंत्रीमंडळ आले. मोठयांचे सर्वच मोठे !

काश्मीर मधली खरेदी

काश्मीरमध्ये गेल्यावर डोंगरा-पहाडातून हिंडावयाचे व श्रीनगरमध्ये आल्यावर खरेदी करावयाची. ही खरेदी विशेषतः काश्मीरी शाली व साडया यांचीच चालते. या खरेदीच्या मामल्यात बायकांचे वर्चस्व सर्वत्र आढळते. पुरुषांसाठी एक दोन ठिकाणीही माल ठेवलेला आढळत नाही. झोपायच्या वेळची पांघरायची शाल बऱ्याच ठिकाणी चौकशी केल्यावरच मिळते. काश्मीरचे भरतकाम हेच या सर्वांतले वैशिष्ठय व त्यांचीच सारी किंमत.

एकंदरीत काश्मीरची ओढ पुरी झाली. पण शेवटी असे वाटले की धावपळ करून काश्मीर पाहण्यात विशेष काही नाही. महाबळेश्वर माथेरानसारखे ज्यांना हवा पालट करण्यासाठी जायचे असेल त्यांनीच जावे. महिना पंधरा दिवस राहावे व मनमुराद त्या हवा पाण्याचा फायदा घ्यावा.

समाप्त



ही रेषा आझाद काश्मीरची आहे.